


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सव्य

■ अमरावती, शनिवार ४ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




## इराणच्या सर्वात मोठ्या ब्रिजवर हल्ला, 8 मृत्यू 95 जखमी

### युद्ध आणखी पेटले



**तेहरान/वृत्तसंस्था :** आखाती देशात अमेरिका इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेले युद्ध आणखी पेटण्याची चिन्हे दिसत आहेत. आताच वेळ आहे, इराणनं तडजोड करावी अन्यथा त्यांच्याकडे काहीच शिल्लक राहणार नाही अशी धमकी डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली होती. त्यानंतर या दोन्ही देशात तणाव वाढला. ट्रम्प यांच्या धमकीला इराणचे राष्ट्रपती मसूद पझेश्कियन यांनी प्रत्युत्तर दिले. इराण अमेरिका आणि इस्त्रायलच्या हल्ल्याचा सामना करण्यासाठी पूर्ण तयार आहे. आम्ही पूर्ण क्षमता वापरू . इराण मागे हटणार नाही असं त्यांनी स्पष्ट सांगितले. अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केलाय की, अमेरिका इस्त्रायलने इराणमधील सर्वात मोठा उंच पूल नष्ट केला आहे.

(पान २ वर)

## 'माझा आवाज दाबण्यासाठीच अटकेचा कट; मी घाबरणारा नाही'

### माजी राज्यमंत्री बच्चू कडूंची सरकारवर टीका



**अमरावती/प्रतिनिधी :**माझ्यावर हत्येच्या कटाचा आरोप लावून मला अडकवण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा निव्वळ मला बदनाम करण्याचा आणि माझा आवाज दाबण्याचा राजकीय कट आहे, असा आरोप प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी केला आहे. आज एका व्हिडिओ संदेशाद्वारे त्यांनी प्रशासकीय यंत्रणेचा गैरवापर होत असल्याचा दावा करत सरकारवर जोरदार टीका केली. बच्चू कडू यांनी राजकीय वैमनस्यातून आपल्याला अपघातात ठार मारण्याचा कट रचल्याची तक्रार भाजपचे आमदार प्रवीण तायडे यांचे चुलत बंधू अभिजीत तायडे यांनी दिल्यानंतर पोलिसांनी बच्चू कडू यांच्यासह तिघांविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्यावर प्रतिक्रिया व्यक्तकरताना मी अटकेला घाबरत नाही, असे प्रत्युत्तर बच्चू कडू यांनी दिले आहे.

■ **डिसेंबरमधील घटना एप्रिलमध्ये उघड?**

बच्चू कडू यांनी या प्रकरणाच्या 'टायमिंग'वर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ते म्हणाले की, ही कथित घटना डिसेंबरमधील आहे, असे तक्रारकर्ते म्हणतात, मग चार महिन्यानंतर एप्रिलमध्येच गुन्हा कसा दाखल झाला? आमदाराच्या पुतण्याच्या हत्येच्या कटाचा आरोप लावून मला आत टाकण्याचे नियोजन सुरू आहे. ज्या तत्परतेने पोलिसांनी पहाटेपासून कारवाई सुरू केली, त्यावरून हे सर्व पूर्वनियोजित असल्याचे स्पष्ट होते. मी शेतकरी, शेतमजुरांसाठी येत्या काळात आंदोलन उभारणार असल्याने माझा आवाज दाबण्यासाठी हे सर्व केले जात आहे.

■ **प्रशासकीय यंत्रणेवर आरोप-**बच्चू कडू यांनी पोलिसांच्या निष्पक्षेतवरही संशय व्यक्त केला. ते म्हणाले, सत्ता तुमची आहे, यंत्रणा तुमच्या हातात आहे. कुणालाही कशाप्रकारे फसवता येते, हे तुमच्यासाठी चुटकीसरशी होणारे काम आहे. माझ्या एका कार्यकर्त्याला पैशांचे आमिष दाखवून आणि धमकावून माझ्या विरोधात पुरावे गोळा करण्याचा प्रयत्न झाला, त्याचे रेकॉर्डिंग आमच्याकडे आहे, असा दावाही त्यांनी यावेळी केला.

**एव्हरेस्ट मोहिमेवर जाणार-** बच्चू कडू म्हणाले की, ते उद्यापासून एव्हरेस्टच्या बेस कॅम्प मोहिमेवर जात आहेत. हे नियोजन १५ ते २० दिवसांपुर्वीच झाले होते. मी पळून गेलो, असा अर्थ कोणीही काढू नये. मी संविधान सोबत घेउन या मोहिमेवर जात आहे. आम्ही रक्तदान करणारे लोक आहोत, कोणाचा जीव घेणारे नाहीत. शेतक-यांच्या आणि दिव्यांगांच्या हक्कांसाठी मी लढत राहीन आणि कोणत्याही अटकेला घाबरत नाही, असे बच्चू कडू म्हणाले.

## चाकणकर-खरातमध्ये 177 कॉल; 33,727 सेकंदाचे संभाषण






■ **एकनाथ शिंदेंसह अनेकांचे कॉल, दमानियांच्या हाती सीडीआर**

■ **मुख्यमंत्री, डीजीपी, एसआयटी प्रमुखांकडे पाठवली माहिती**

**मुंबई/प्रतिनिधी :**भोंदूबाबा अशोक खरात याचे अनेक काळे कारनामे बाहेर येत असून महिला लैंगिक शोषणासोबतच आर्थिक फसवणुकीचे देखील गुन्हे आता समोर येत आहे. याचदरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अशोक खरात प्रकरणी खळबळजनक आरोप केले आहेत. १ एप्रिल २०२५ ते १७ मार्च २०२६ पर्यंतचा अशोक खरातचा सीडीआर अंजली दमानियांच्या हाती लागला आहे. त्या सीडीआरची कॉपी आणि तदानुषंगिक माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पोलीस महासंचालक आणि एसआयटीच्या प्रमुख तेजस्वी सातपुते यांच्याकडे पाठवण्यात आली आहे, अशी माहिती दमानिया यांनी दिली. दमानिया यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचे १७७ कॉल्स हे अशोक खरात यांना झाले. बहीण प्रतिभा चाकणकर यांचे २३६ कॉल्स, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे १७ कॉल्स खरातला नॉर्मल मोबाईलवरून झाले. यामध्ये १० इनकमिंग, ७ आउट गोईंग होते. यात साधारण २१ मिनिटं अशोक खरात आणि एकनाथ शिंदे यांच्यात संभाषण झालं, असा गंभीर आरोप अंजली दमानिया यांनी केला. भाजप नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांचे ८ कॉल्स, मंत्री आणि भाजपचे नेते आशिष शेलार यांचा एक कॉल खरातला झाला. अशोक खरातसोबत सगळ्यात जास्त वेळ कोण बोललं याची माहिती घेतली. यामध्ये तृप्ती

(पान २ वर)

### डोनाल्ड ट्रम्प यांना विरोध केल्याचे फळ!

## इराणने उघडला फ्रान्ससाठी होर्मुझचा रस्ता




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धात अमेरिकेला लष्करी मदत देण्यास फ्रान्सने स्पष्ट नकार दिल्यानंतर, इराणनेफ्रान्सला मोठी भेट दिली आहे. जागतिक व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाच्या आणि सध्या बंद असलेल्या 'हार्मुझच्या सामुद्रधुनीतून' एका फ्रेंच कंटेनर जहाजाला सुरक्षित प्रवासाची परवानगी इराणने दिली आहे.

२८ फेब्रुवारी रोजी युद्ध सुरू झाल्यापासून इराणने हा सागरी मार्ग बंद केला होता. केवळ भारत, चीन आणि रशिया यांसारख्या इराणच्या मित्रराष्ट्रांच्या जहाजांनाच येथून प्रवेश मिळत होता. मात्र, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रान यांनी 'आम्ही या युद्धात अमेरिकेला मदत करू शकत नाही,' असे जाहीर केल्यानंतर, मार्चपासून अडकलेले फ्रेंच जहाज अखेर मार्गस्थ झाले आहे. जहाजाच्या ट्रॅकिंग डेटानुसार, फ्रेंच शिपिंग कंपनी CMA CGM चे कंटेनर जहाज, इराण युद्ध सुरू झाल्यापासून होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणारे पश्चिम युरोपच्या दिशेने जाणारे पहिले जहाज ठरले आहे. एएफपी वृत्तसंस्थेनुसार, जगातील तिस-या क्रमांकाच्या सर्वात मोठ्या कंटेनर शिपिंग कंपनीचे माल्टी ध्वजांकित जहाज 'सीएमए सीजीएम क्रिबी' गुरुवारी दुपारी दुबईजवळील समुद्रातून पूर्वेकडे निघाले. जहाजाच्या ट्रॅकिंग डेटानुसार, इराणी किना-यावरून जाताना जहाजाच्या ऑटोमॅटिक आयडेंटिफिकेशन सिस्टीमने (AIS) ते एका

(पान २ वर)

## इराणी सैन्याने अमेरिकन हेलिकॉप्टर पाडले



### वैमानिकाच्या शोधात लढाउ विमाने परिसरात दाखल;

### इराणकडून वैमानिकाला जिवंत पकडण्यासाठी बक्षीस जाहीर

**तेल अवीव/तेहरान/वॉशिंग्टन डीसी/वृत्तसंस्था :**इराणने एक अमेरिकन हेलिकॉप्टर पाडल्याचा दावा केला आहे. इराणी वृत्तसंस्था 'मेहर'नुसार, हे हेलिकाप्टर एका अमेरिकन वैमानिकाच्या शोधासाठी इराणमध्ये दाखल झाले होते. यापूर्वी, इराणने अमेरिकेचे एक एफ-३५ लढाउ विमान पाडल्याचा दावा केला होता. तथापि, छायाचित्रांवर आधारित काही माध्यमांच्या वृत्तांनुसार, ते एक एफ-१५ई विमान होते. बेपत्ता असलेला वैमानिक याच विमानातील असल्याचे मानले जात आहे. तस्नीम न्यूज'नुसार, इराणने अमेरिकन वैमानिकाला जिवंत पकडण्यासाठी बक्षीसही जाहीर केले आहे. तथापि, अमेरिकन अधिका-यांनी हेलिकॉप्टर पाडल्याच्या दाव्याला अद्याप दुजोरा दिलेला नाही.इराणने प्रसिद्ध केलेल्या छायाचित्रांच्या आधारे, तज्ज्ञ या विमानाला एफ-१५ई म्हणत आहेत. ब्रिटनच्या पुढाकाराने होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यासाठी गुरुवारी एक ऑनलाइन बैठक झाली, ज्यात ६० हून अधिक देशांनी भाग घेतला. या बैठकीत भारताकडून परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी सहभागी झाले होते.बैठकीत विक्रम मिसरी म्हणाले की, होर्मुझ संकटात आतापर्यंत फक्तभारताचेच नागरिक मारले गेले आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, होर्मुझ संकटात आतापर्यंत ३ भारतीय खलाशी मारले गेले आहेत,

(पान २ वर)

## नक्षलवादी चळवळीचा 'थिंक टँक' प्रशांत बोसचा मृत्यू

### ■ तुरुंगात प्रकृती खालावली ■ रुग्णालयात उपचारादरम्यान निधन



**गडचिरोली/प्रतिनिधी :** प्रतिबंधित सीपीआय (माओवादी ) संघटनेचा सर्वोच्च रणनीतीकार, पॉलिट ब्युरो सदस्य आणि देशातील नक्षलवादी चळवळीचा आधारस्तंभ मानला जाणारा जहाल नक्षलवादी नेता प्रशांत बोस उर्फ किशन दा (८०) याचा शुक्रवारी मृत्यू झाला. रांची येथील राजेंद्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमध्ये (रिम्स) उपचार सुरू असताना त्याने अखेरचा श्वास घेतला.

नक्षलवादी संघटनेत महासचिव नंबाला केशव राव यांच्यानंतर दुस-या क्रमांकाचे स्थान भूषवणा-या बोसच्या निधनामुळे या देशविघातक चळवळीला मोठा हादरा बसला असून, खबरदारीचा उपाय म्हणून महाराष्ट्र, छत्तीसगड आणि झारखंडच्या सीमावर्ती भागात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**तुरुंगात प्रकृती खालावली-**सरायकेला येथील तुरुंगात न्यायालयीन कोठडीत असलेल्या बोसची प्रकृती ३ एप्रिल रोजी पहाटे अचानक बिघडली. त्याला श्वास घेण्यास त्रास होउ लागल्याने सकाळी ६ वाजता कडक पोलीस बंदोबस्तात रांचीच्या रिम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले. वाढते वय आणि फुफ्फुसांच्या गंभीर आजारामुळे उपचारांना प्रतिसाद मिळाला नाही आणि सकाळी १० च्या सुमारास त्याची प्राणज्योत मालवली.

**अनेक राज्यांत होती दहशत-**मूळचा पश्चिम बंगालचा असलेला प्रशांत बोस हा नक्षलवाद्यांचा मुख्य विचारवंत (थिंक टँक) मानला जात असे. दंडकारण्यातील गनिमी काव्यापासून ते शहरी नक्षलवादाचे जाळे विणण्यापर्यंत सर्व महत्त्वाच्या निर्णयांत त्याचा सक्रिय सहभाग होता. महाराष्ट्र, छत्तीसगड, झारखंड, बिहार आणि ओडिशा या राज्यांत झालेल्या २०० हून अधिक हिंसक कारवायांमध्ये त्याचा थेट हात होता. २०२१ मध्ये दिवाळीच्या दिवशी पोलीस कॅम्पवर झालेल्या हल्ल्याचा कट बोसनेच रचला होता, ज्यात १५ जवान शहीद झाले होते.

**अखेरच्या काळात बेड्या-**अनेक दशके सुरक्षा यंत्रणांना गुंगारा देणा-या प्रशांत बोसला १२ नोव्हेंबर २०२१ रोजी

(पान २ वर)

### रेल्वे मंत्रालयाचा मोठा निर्णय:

## विदर्भात नव्या मार्गांची उभारणी वेगात



**नागपूर/प्रतिनिधी :** इतवारी-नागभीड ब्रॉडगेज रेल्वे मार्गाच्या उभारणीला वेग आला असून उमरेडपर्यंतचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. वडसा-गडचिरोली मार्गही प्रगतीपथावर असून २०२६-२७ अखेरपर्यंत दोन्ही प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट रेल्वे प्रशासनाने ठेवले आहे.

**पहिला टप्पा पूर्ण-** इतवारी-नागभीड हा १०६ किमी लांबीचा ब्रॉडगेज रेल्वेमार्ग महा-रेलद्वारे विकसित केला जात आहे. या मार्गातील उमरेडपर्यंतचा पहिला टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला असून उर्वरित कामाला गती देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे विदर्भातील दळणवळण अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**गडचिरोली मार्गावर वेग-**दक्षिण पूर्व मध्य रेल्वेतर्फे ५२ किमी लांबीच्या वडसा-गडचिरोली रेल्वेमार्गाचे काम सुरू आहे. आरमोरीपर्यंत काही काम पूर्ण झाले असून उर्वरित बांधकाम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले आहे. दुर्गम भागांना रेल्वे जोडणी मिळणार असल्याने स्थानिक विकासाला चालना मिळणार आहे.

**अतिक्रमणामुळे अडथळे-** इतवारी-मोतीबाग

(पान २ वर)

## हॉटेल व्यावसायिकांना आता 20 टक्के व्यावसायिक सिलिंडर



**अकोला /प्रतिनिधी :** आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीचा थेट परिणाम स्थानिक व्यवसायावर झाला. गेल्या २० ते २२ दिवसांपासून व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा हॉटेल, केटरिंग व्यावसायिकांना बंद असल्याने त्यांची गॅस कोंडी झाली. व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या प्राधान्यक्रमात आता हॉटेल व्यावसायिकांचा सुद्धा राज्याच्या पुरवठा विभागाने समावेश केला. युद्धपूर्व स्थितीच्या प्रमाणात हॉटेल व्यावसायिकांना २० टक्के वाटा मंजूर केला. त्यामुळे हॉटेल व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे.

**२० ते २२ दिवस दिवस झाली अडचण-**आखाती देशांतील युद्धामुळे जागतिक स्तरावर गॅस पुरवठा साखळी विस्कळीत झाली. त्याचा थेट परिणाम गॅस पुरवठ्यावर झाला. यामुळे व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा मर्यादित झाला. त्याचा परिणामी हाटेल, केटरिंग व इतर खाद्यपदार्थ व्यावसायिकांवर होउन मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अकोला शहरात सुमारे ५०० हाटेल, रेस्टारंट, स्वीट मार्ट, केटरर्स व्यावसायिक आहेत. गेल्या २० ते २२ दिवसांपासून व्यावसायिक गॅस सिलिंडर मिळाले नाही. काहींनी पर्याय शोधले. मात्र, त्याला देखील मर्यादा आहेत. या व्यवसायांच्या माध्यमातून सुमारे १२ ते १५ हजार आचारी, कामगारांना रोजगार मिळतो. लग्नसराई, धार्मिक उत्सवाच्या काळात व्यावसायिक सिलिंडरअभावी मोठी अडचण झाली.

(पान २ वर)

## पाकिस्तानात पेट्रोल ४५८ रुपयांवर, डिझेल ५२० रुपयांच्या पार

**इस्लामाबाद/वृत्तसंस्था :**पाकिस्तानने गुरुवारी डिझेल आणि पेट्रोलच्या किमतींमध्ये ५० टक्क्यांहून अधिक वाढ केली आहे. एका महिन्यापेक्षा कमी कालावधीत झालेली ही दुसरी मोठी दरवाढ आहे. मध्य पूर्वेत सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक तेल दरांमध्ये झालेल्या तीव्र वाढीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. पाकिस्तानने डिझेलची किंमत ५५ टक्क्यांहून अधिक वाढवून प्रति लिटर ५२०.३५ रुपये करण्यात आली आहे, तर पेट्रोलची किंमत सुमारे ५५ टक्के वाढवून प्रति लिटर ४५८.४० रुपये करण्यात आली आहे.

(पान २ वर)




## गॅस, पेट्रोल तुडवडाही नेहरूमुळेच झाला असेल!



**नागपूर/प्रतिनिधी :**राज्यात गॅस सिलेंडर आणि पेट्रोल-डिझेलच्या तुटवड्याने नागरिकांचे हाल होत असताना यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची जोरदार खडाजंगी सुरू झाली आहे. अनेक ठिकाणी नागरिकांना गॅस सिलेंडरसाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असून, काही भागांत हायवेवरील हॉटेल्सही इंधनअभावी बंद ठेवण्याची वेळ आली आहे. काँग्रेस कार्यालयाबाहेरील काही उपाहारगृहेही बंद असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

या पार्श्वभूमीवर सत्ताधा-यांकडून परिस्थिती नियंत्रणात असल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात नागरिकांना भेडसावणा-या अडचणी वाढतच असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधा-यांवर बनवाबनवी केल्याचा आरोप करत जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका केली आहे. स्वतःच्या धोरणात्मक चुकांची जबाबदारी स्वीकारण्याऐवजी ती पूर्वीच्या सरकारांवर ढकलण्याची पद्धत सुरू असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. गॅस आणि इंधन तुटवड्यासाठी ऐतिहासिक निर्णयांना जबाबदार धरणे ही सत्ताधा-यांची जुनी भूमिका असल्याची टीका करण्यात आली. सध्याच्या परिस्थितीचे उत्तर द्यायचे सोडून भूतकाळाचा आधार घेतला जात आहे, असे विरोधी पक्षाच्या नेत्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, सामान्य नागरिकांमध्ये संतापाची भावना वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. घरगुती गॅस मिळण्यात होणारा विलंब, पेट्रोल पंपांवरील रांगा आणि वाढती अनिश्चितता यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. विशेषत? लघुउद्योजक आणि हाटेल व्यवसायिकांना याचा मोठा फटका बसत आहे. लोकांच्या चुली विझत असताना केवळ आश्वासनांचा पाउस पाडून उपयोग नाही, अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी दिली. सत्ताधा-यांनी तातडीने ठोस उपाययोजना जाहीर करून पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणीही जोर धरत आहे.

**काँग्रेस नेत्याची एक्सवर पोस्ट-**स्वतःच्या चुकांचे खापर दुस-यांवर फोडताना भाजपला लाज वाटत नाही..पाप तुमचं आणि खापर काँग्रेसवर? राहुल गांधीचे नाव भाजपला घ्यायचे नसेल हा तुटवडा पण पंडित नेहरू, इंदिराजी गांधी यांच्यामुळेच झाला,भाजपची ही जुनी टेप आहे. लोकांच्या चुली विझवून कसले नवीन जुमले देत आहेत? जनतेच्या संयमाचा अंत पाहू नका, उत्तरे द्या! असे वड्डेट्टीवार यांनी नमुद केले.

## फक्त 600 रुपयांच्या वादातून ॲसिड हल्ला; 7 जण होरपळले, 3 अटकेत

**मुंबई/प्रतिनिधी :** ६०० रुपयांच्या वादातून केलेल्या ॲसिडहल्ल्यात ७ जण होरपळले. ही धक्कादायक घटना मालाडमधील कुरार गावात बुधवारी सायंकाळी घडली. या प्रकरणी कुरार पोलिसांनी समरबहाद्दर सिंग (३८) याच्यासह हेमंत राठोड (२०), नितीन धोबी (२४) यांना अटक केली आहे. कुरार गावातील रहिवासी समरबहाद्दर सिंग याचे दागिने पालिश करण्याचे दुकान असून, शेजारीच मयूर कानोजिया (२०) याचे दागिने बनविण्याची युनिट आहे. दोघांमध्ये नेहमी व्यावसायिक व्यवहार होत असत. एका व्यवहारात कानोजियाने चुकून २६ हजार ४०० रुपयांऐवजी २७ हजार रुपये सिंगला दिले. त्याने जास्त दिलेले ६०० रुपये सिंगकडे परत मागितले. कानोजियांच्या वडिलांनी सिंगच्या दुकानात जाउनही उर्वरित रकमेची मागणी केली; परंतु, सिंगने पैसे देण्यास नकार दिला. यामुळे संतापलेला कानोजिया त्याच्या ७ ते ८ मित्र-नातेवाइकांसह सिंगच्या दुकानात आला. त्यांच्यात पैशांवरून वाद झाला आणि त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. त्यावेळी सिंगने पाण्यात मिसळलेले पॉलिशिंगसाठी वापरले जाणारे ॲसिड त्या गटावर फेकले.सर्व जखमींना कांदिवली पश्चिम येथील शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी दोघांना डिस्चार्ज देण्यात आला असून, पाच जणांना ऑब्झर्वेशनसाठी ठेवल्याची माहिती कुरार पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक उमेश पाटील यांनी दिली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# युवकाचा शॉर्टसर्किटमुळे मृत्यू

## मोर्शी येथील संभाजीनगरातील घटना



**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी येथील संभाजीनगर स्थित एका पन्नास वर्षीय युवकाचा शॉर्टसर्किटमुळे मृत्यू झाल्याची घटना आज दि.३ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजताचे सुमारास उघडकीस आली.

मृतक युवकाचे नाव मदन मेंढे (वय ५० वर्ष रा.संभाजीनगर मोर्शी) असे आहे.

प्राप्त माहितीनुसार मदन मेंढे यांचे रामजीबाबा परिसरात इलेक्ट्रॉनिकचे दुकान असून ते पारडी शेत शिवारात असलेल्या एका शेतात पाण्याच्या टाकीतील पाणी नळाद्वारे येत नसल्यामुळे ते बघण्यासाठी गेले होते. पाण्याच्या टाकी वरून गेलेल्या हायपर लाईनचा स्पर्श झाल्यामुळे ते खाली फेकले गेले.लगेच त्यांना आजूबाजूच्या लोकांनी उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे भरती केले मात्र उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मदन मेंढे यांना मृत घोषित केले. सध्या त्यांचे प्रेत शवागारात ठेवण्यात आले असून दिनांक ४ एप्रिल रोजी शवविच्छेदन करण्यात येऊन प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येणार आहे. विद्युत शॉर्टसर्किटमुळे मदन मेंढे यांचा आकस्मिक मृत्यू झाला असून महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीच्या वतीने त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून केल्या जात आहे.पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण करीत आहे.

# वनारसीत भावंडावर प्राणघातक हल्ला

## आरोपीना विरुद्ध गुन्हा दाखल

अमरावती/प्रतिनिधीः-

नागपूर गेट पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या वनारसीमध्ये एक तरुण आणि त्याच्या भावावर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात संतोष शहाजी पवार यांच्या तक्रारी वरून पोलिसांनी आरोपी प्रियांशू किसान तायडे, प्रशिक तायडे, दर्शन तायडे, सुमित हुरड, किसन तायडे विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. माहिती नुसार संतोष पवार दुपारी जेवण केल्यावर आपल्या मित्रासह बाहर फिरत होता. त्यावेळी आरोपींनी त्याला पकडले आणि त्याच्यावर काठीने हल्ला केला. एका आरोपीने संतोषच्या भावाला चाकू मारून त्याला जखमी केले. हल्ला केल्यानंतर आरोपी तेथून फरार झाले. दोन्ही भावांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय येथे दाखल करण्यात आले आहे. काही कारण नसताना आरोपी यांनी दोघांवर हल्ला केला आहे. या घटनेमुळे गावात काही काळासाठी तणावाची स्थिती निर्माण झाली होती. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींचा युद्ध स्तरावर शोध सुरू केला आहे.

# चाकू हल्ल्यातील जखमीचा मृत्यू; खुनाचा गुन्हा दाखल

## संतोषी नगरातील घटना

अमरावती/प्रतिनिधीः-

गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या संतोषी नगर परिसरात २४ एप्रिल रोजी झालेल्या चाकू हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. मयुर किशोर सोळंके (वय २१, रा. खत्री कॉम्प्लेक्स, सिटी कोतवाली) असे मृताचे नाव आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर पोलिसांनी गुन्ह्याचे कलम बदलून खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, २४ मार्च २०२६ रोजी रात्री संतोषी नगर येथील गार्डनमध्ये काही युवक बसून चर्चा करत असताना अचानक २ ते ३ जणांनी चाकूने मयुरवर हल्ला चढवला. या हल्ल्यात मयुर किशोर सोळंके (वय २१, रा. खत्री कॉम्प्लेक्स, सिटी कोतवाली) हा युवक गंभीर जखमी झाला होता. हल्लेखोरांनी मयुरच्या पोटावर व डोक्यावर सपासप वार केले. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. जखमी अवस्थेत असलेल्या मयुरला त्याच्या मित्रांनी तातडीने रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, उपचार सुरू असताना ३ एप्रिल २०२६ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय (पीडीएमसी) येथे मयुरचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूची माहिती पसरताच रुग्णालय परिसरात नागरिकांसह नातेवाईकांची मोठी गर्दी उसळली होती. प्राथमिक तपासात ही घटना जुन्या वादातून घडल्याचे समोर आले असून, या प्रकरणात सुनील व अनूप यांच्यासह अन्य एका साथीदाराचा सहभाग असल्याची माहिती पुढे आली आहे. या प्रकरणी सुरुवातीला प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, मयुरच्या मृत्यूनंतर आता भारतीय न्याय संहिता अंतर्गत खुनाचा गुन्हा नोंदवण्यात आला.

पान १ व १० वरून

## इराणच्या सर्वात मोठ्या

इराणला पाषाण युगात पाठवण्याच्या धमकीनंतर अमेरिकेने काही तासांत हा हल्ला केला. स्थानिक अधिका-यांच्या मते, अलबोर्ज परिसरातील हा बी-१ ब्रिजवर मोठा हल्ला झाला. त्यात प्रचंड नुकसान झाले आहे. या हल्ल्यात कमीत कमी ८ लोक मारले गेलेत तर ९५ लोक जखमी झालेत अशी माहिती दिली. सातत्याने होणारे हल्ले पाहता आखाती प्रदेशातील तणाव शांत होण्याऐवजी आणखी चिघळण्यासाठी शक्यता वर्तवली जात आहे.

अमेरिका इस्त्रायलने इराणवरील हल्ले वाढवले आहेत. तेहरानमधील १०० वर्ष जुन्या मेडिकल रिसर्च सेंटरवर टार्गेट हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यानंतर इराणनेही इशारा दिला आहे. हे युद्ध आता तोपर्यंत सुरू राहील जोपर्यंत शत्रूंची नाचक्की आणि गुडघे टेकत नाही. इराणने अमेरिकेला संभाव्य जमिनीवरील कारवाईवरूनही सुनावले आहे. इराणने अबूधाबीतील गॅस फॅसिलिटीवरही हल्ल्याचा प्रयत्न केला आहे. इराणचा हा हल्ला हवेतच रोखल्याची अबूधाबीतील अधिका-यांनी माहिती दिली. मात्र मलब्यामुळे गॅस फॅसिलिटीत नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, इराणने कुवेतच्या पाणी प्लांटवरही हल्ला केला आहे. एका खार पाणी शुद्धीकरण प्रकल्पावर इराणने हल्ला केला आहे. आपत्कालीन पथके सध्या घटनास्थळी असून बचाव आणि मदतकार्य करत आहेत असं कुवेतच्या विद्युत आणि जल मंत्रालयाने सांगितले. हा तोच प्रकल्प आहे जो समुद्राचे पाणी पिण्यायोग्य बनवतो. जर इराणने आखाती देशांतील जलप्रकल्पांवर हल्ले करणे सुरूच ठेवले तर इथल्या देशांना पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी झटावं लागेल.

## चाकणकर-खरातमध्ये 177 कॉल

खरात पहिलं नाव आहे. दुस-या नंबरवर रूपाली चाकणकर आहे. ३३ हजार ७२७ सेकंद रुपाली चाकणकर अशोक खरातशी बोलल्या होत्या. आताच्या घटकेला यांना अटक होउन पूर्ण चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली. इतका वेळ कुणीही कुठल्याही गुरूंशी बोलत नाही. दिपक लोंढे तिसरं नावं आहे. दिपक लोंढे (केसरकरांचे निकटवर्तीय) यांचे १८९ काल्स झाले होते. ३० हजार ५२९ सेकंद कॉल्स झाले.

अंजली दमानिया यांनी एकनाथ शिंदे यांना लक्ष्य करत, एखाद्या भोंदू बाबाला राज्याचे उपमुख्यमंत्री १७ वेळा काल का करतात? त्यांच्यात २१ मिनिटे काय चर्चा झाली, हे जनतेला समजायला हवे. दमानिया यांनी दावा केला आहे की, खरातला केवळ महाराष्ट्रातूनच नाही तर कतार, युएई आणि ऑस्ट्रेलिया सारख्या देशांतूनही मोठ्या प्रमाणावर फोन आले आहेत. हे केवळ नार्मल कालचे रेकार्ड आहेत, व्हॉट्सअॅप कॉल्सची संख्या यापेक्षा कितीतरी पटीने जास्त असू शकते, अशी शंकाही त्यांनी व्यक्त केली.

पतसंस्थेच्या शेकडो खात्यांत खरात नॉमिनी

दरम्यान तपासात कोपरगाव येथील समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या शाखेत एकूण ५७ खातेदारांनी १०० खाती उघडली आहेत. या प्रत्येक खात्याला नॉमिनी म्हणून अशोक खरात याचे नाव असल्याची माहिती आहे. या खात्यांवर सुमारे ६० कोटी रुपयांचा व्यवहार झाला आहे. यामध्ये आठ खाती ही खरात कुटुंबीयांची आहेत. यामध्ये चाकणकर नावाचेही खातेदार असल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे या सर्व खात्यांशी अशोक खरात याचा मोबाईल नंबर जोडलेला आहे. खरात वारसदार असलेली खाती कुणाच्या नावे आहेत याबाबत पोलिसांना विचारले असता त्यांनी नावे सांगण्यास नकार दिला. मात्र प्रतिभा चाकणकर व आणखी एक चाकणकर अशा दोन नावांनी खाते असल्याची माहिती आहे. महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या बहिणीचेही नाव प्रतिभा आहे.

## इराणने उघडला फ्रान्ससाठी

फ्रेंच कंपनीचे असल्याचे दर्शवले आणि या फ्रेंच जहाजाने केशम आणि लारक बेटांमधील आपल्या मंजूर मार्गाचे अनुसरण केले. २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्त्रायलने इराणविरुद्ध युद्ध सुरू केल्यापासून, आखातात अनेक जहाजे अडकली आहेत. जागतिक व्यापारासाठी एक महत्त्वाचा सागरी मार्ग असलेली होर्मुझची सामुद्रधुनी बंद करून इराणने प्रत्युत्तर दिले. इराण ज्यांना आपले मित्रराष्ट्र मानतो, अशा भारत, चीन, रशिया, इराक आणि पाकिस्तान यांसारख्या विशिष्ट देशांच्या जहाजांनाच या मार्गातून जाण्याची परवानगी आहे. इतर जहाजांप्रमाणेच, हे फ्रेंच जहाजही मार्च महिन्यापासून आखाती प्रदेशात अडकून पडले होते. मिळालेल्या माहितीनुसार, फ्रेंच जहाज कंपनीने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाण्याची परवानगी मिळवण्यासाठी इराणी सागरी अधिका-यांशी संपर्क साधला होता. हे जहाज काँगो प्रजासत्ताकातील पाईंट-नोअरकडे जात असल्याचे मानले जाते. ही सेवा भारत, मध्य पूर्व, आखाती प्रदेश आणि आफ्रिका यांना जोडते. यापूर्वी, चिनी कंपन्यांच्या जहाजांनीही या मार्गावरून यशस्वीपणे प्रवास केला आहे.

## इराणी सैन्याने अमेरिकन

हे सर्व परदेशी जहाजांवर काम करत होते.

## नक्षलवादी चळवळीचा 'थिंक टँक'

सरायकेला-खरसावा जिल्ह्यातून अटक करण्यात आली होती. त्यावेळी त्याच्यावर १ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर होते. त्याच्यासोबत त्याची पत्नी आणि नक्षलवादी नेत्या शीला मरांडी हिलाही अटक करण्यात आली होती. तेव्हापासून तो तुरुंगातच होता.

**नक्षलग्रस्त भागात सुरक्षा वाढवली -**बोसच्या मृत्यूमुळे नक्षलवादी समर्थकांकडून हिंसक प्रतिक्रिया उमटण्याची दाट शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नक्षलग्रस्त जिल्ह्यांमध्ये सुरक्षा दल आणि सीआरपीएफला सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. रुग्णालयात दंडाधिका-यांच्या उपस्थितीत कायदेशीर सोपस्कार पार पाडले जात असून, शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## विदर्भात नव्या मार्गांची

ब्रॉडगेज मार्ग अतिक्रमणामुळे रखडला आहे. संबंधित अतिक्रमणे हटवून हा मार्ग लवकरच पूर्ण करण्यात येईल, असे विभागीय व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता यांनी स्पष्ट केले. प्रशासन या समस्येवर तातडीने तोडगा काढण्याच्या तयारीत आहे.

**महसूल व सुविधा वाढ-** दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या २०२५-२६ आर्थिक वर्षात मालवाहतूक महसूल १७९३.१८ कोटी रुपये इतका झाला. गैर-भाडे महसूल ४.१० कोटी, तिकीट तपासणी १७.१७ कोटी आणि पार्किंगमधून १.६५ कोटी रुपयांची कमाई झाली. १४ गुड्स शेडचे आधुनिकीकरण, १९६ ट्रॅक दुरुस्ती आणि १०८.४६ किमी स्लीपर नूतनीकरण पूर्ण झाले. सौर ऊर्जेमुळे ७५ लाखांची बचत झाली. प्रवाशांसाठी १० विशेष गाड्या आणि दोन नवीन गाड्यांची सुरुवात करण्यात आली असून सुरक्षा आणि सुविधा वाढविण्यावर भर देण्यात येत आहे.

## हॉटेल व्यावसायिकांना आता

**अत्यावश्यक सेवांच्या प्राधान्यक्रमात हाटेलचा समावेश**

व्यावयायिक सिलिंडरच्या पुरवठ्यात राज्यातील पुरवठा विभागाने अत्यावश्यक सेवांसाठी प्राधान्यक्रम ठरवला. त्यामध्ये गेले तीन आठवडे हाटेल व्यावसायाचा समावेश नव्हता. त्या कारणाने हाटेलला व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा बंद झाला. दरम्यान, हाटेल व्यावसायिक संघटनांनी वारंवार सरकारकडे सिलिंडर पुरवठा करण्याची मागणी केली. त्यानंतर पुरवठा विभागाच्या सहसचिवांनी २ एप्रिलला राज्यातील सर्व जिल्हाधिका-यांना दिलेल्या पत्रात प्राधान्यक्रमाचे क्षेत्र व वाटपाची टक्केवारी कळवली आहे. त्यामध्ये हाटेल, धाबे, आहारगृहे यांना २० टक्के पुरवठा करण्याचे निर्देश दिले आहेत.

**व्यावसायिक सिलिंडरसाठी या क्षेत्रांना प्राधान्यक्रम-**प्राधान्यक्रम क्षेत्र व टक्केवारीमध्ये शैक्षणिक संस्था, रुग्णालये, स्मशानभूमी, वृद्धाश्रम, अनाथ आश्रम यांना १०० टक्के, संरक्षण क्षेत्र, शासकीय व सार्वजनिक क्षेत्र, रेल्वे, हवाईवाहतूक, पोलीस, कारागृह कॅन्टीन यांना ७० टक्के याशिवाय ११ उद्योग व क्षेत्रांना ५० टक्के, तर त्या तुलनेत कमी महत्त्वाच्या इतर ११ उद्योग व क्षेत्रांना २० टक्के व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा केला जाणार आहे.

**शासनाकडे सातत्यपूर्ण मागणी-** व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा बंद असल्याने हाटेल व्यावसायिक अडचणीत आले होते. सासंदर्भात शासनाकडे वारंवार मागणी केली. त्यानंतर आता २० टक्के व्यावसायिक सिलिंडर हाटेल व्यावसायिकांना देण्याचे पुरवठा विभागाने निर्देश दिले आहेत, असे अकोला हाटेल असोसिएशनचे अध्यक्ष योगेश अग्रवाल यांनी सांगितले.

## पाकिस्तानात पेट्रोल 458

गुरुवारी अमेरिकन तेलाच्या किमतींमध्ये ११ टक्क्यांहून अधिक वाढ झाली, तर ब्रेंट क्रूडच्या किमतींमध्ये ७ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ नोंदवली गेली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक दिवस आधी लष्करी कारवाई अधिक तीव्र केली जाणार असल्याचे वक्तव्य केल्यानंतर ही वाढ झाली.

पाकिस्तानचे पेट्रोलियम मंत्री अली परवेज मलिक यांनी वित्त मंत्री मुहम्मद औरंगजेब यांच्यासोबत घेतलेल्या संयुक्तपत्रकार परिषदेत सांगितले की, अमेरिका-इराण युद्धानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती अनियंत्रित झाल्या असून त्यामुळे दरवाढ करणे अपरिहार्य झाले आहे. गेल्या महिन्यातही या दक्षिण आशियाई देशाने डिझेल आणि पेट्रोलच्या ग्राहक किमतींमध्ये सुमारे २० टक्के वाढ केली होती. त्या वेळीही इराणवरील अमेरिका-इस्त्रायल हल्ल्यांमुळे तेल दर वाढल्याचे कारण देण्यात आले होते.

या निर्णयामुळे महागाई वाढण्याची शक्यता असून त्याचा सर्वाधिक फटका पाकिस्तानातील गरीब जनतेला बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पाकिस्तान मुख्यतः सौदी अरेबिया आणि यूएईमधून होर्मुज सामुद्रधुनीमार्गे तेल आयात करतो.देशाचे वित्त मंत्री मुहम्मद औरंगजेब यांनी पत्रकार परिषदेत काही अनुदानांची (सब्सिडी) स्वतंत्र घोषणा केली. लहान शेतकरी, मोटारसायकल चालक तसेच शहरांदरम्यान माल व प्रवासी वाहतूक करणा-यांना दिलासा देणे हा या निर्णयाचा उद्देश आहे.

मलिक यांनी सांगितले की, सरकारने गेल्या तीन आठवड्यांत १२९ अब्ज पाकिस्तानी रुपयांची सब्सिडी दिली होती; मात्र आंतरराष्ट्रीय तेल दरांतील प्रचंड वाढ लक्षात घेता ती पूर्वीप्रमाणे सुरू ठेवणे आता शक्य नाही. संसाधने मर्यादित आहेत आणि या युद्धाचा शेवट दिसत नसल्याने सर्वांसाठी समान सब्सिडी देणे शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## हत्येचा कट रचल्याप्रकरणी

एक अनोळखी इसम यांच्याविरुद्ध कलम ५५,५८ आणि ६१ अंतर्गत फौजदारी स्वरूपाचा कट रचल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

**दोन्ही गटातील संघर्ष टोकाला-**

अचलपूर मतदारसंघात बच्चू कडू आणि प्रवीण तायडे यांच्यातील राजकीय वैमनस्य सर्वश्रुत आहे. बच्चू कडू यांनी सलग चार वेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले होते. मात्र, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे प्रवीण तायडे यांनी त्यांचा पराभव केला. या पराभवानंतर दोन्ही गटांतील संघर्ष आता टोकाला गेल्याचे चित्र दिसत आहे.

या हायप्रोफाईल गुन्ह्यामुळे अचलपूर आणि चांदूरबाजार परिसरात तणावाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडू नये, यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी ठिकठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस प्रशासन अत्यंत गांभीर्याने करत असून, फॉरेन्सिक रिपोर्ट नंतर अनेक मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**पोलिसांनी केले शांततेचे आवाहन-**

या संवेदनशील प्रकरणानंतर परिसरात तणाव निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. कायदा व सुव्यवस्था बिघडणाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्यात येईल असा इशारा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी दिला आहे. पुढील तपास चांदुर बाजार पोलीस करत आहे.

## व्द्रशासनाचे उद्दिष्टे पूर्ण

सदस्यांनी शासकीय देणी भरलेली असल्याचे सांगितल्यावर संबंधित अधिकारी संतप्त झाले व 'माझे काय ते सांगा, नाहीतर कारवाई करावी लागेल,' असा इशारा दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.यानंतर २१ मार्च रोजी काही अधिकाऱ्यांना सोबत घेऊन विविध स्टोन क्रशर युनिटवर धाड टाकण्यात आली. बोरगाव मंजू परिसरातील अनेक क्रशरवर जाऊन मोजमाप व तपासणीच्या नावाखाली कारवाई सुरू करण्यात आली. या कारवाईमागे 'वरून आदेश आहेत' असे सांगत संबंधित अधिकाऱ्यांचे नाव घेत दबाव आणण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

२३ मार्च रोजी स्वतः संबंधित अधिकाऱ्यांनी काही क्रशरवर भेट देत 'तुमचे काम बेकायदेशीर आहे, कारवाई टाळायची असेल तर प्रत्येकी १५ हजार रुपये द्या,' अशी उघड मागणी केल्याचा आरोप तक्रारीत नमूद आहे. या भीतीपोटी सुमारे १० सदस्यांनी रक्कम दिल्याचा दावा करण्यात आला आहे. उर्वरित सदस्यांकडूनही पैसे गोळा करून देण्याचे आदेश देण्यात आल्याचे सांगितले जाते.

तक्रारीत पुढे म्हटले आहे की, वारंवार फोन करून पैशांची मागणी करण्यात आली. संबंधित संभाषणांचे कॉल रेकॉर्डिंगही उपलब्ध असल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. तसेच काही सदस्यांना तहसील कार्यालयात बोलावून अश्लील भाषेत शिवीगाळ करत 'तुम्ही हरामखोर आहात, पैसे देत नाही तर काम करू देणार नाही,' अशा शब्दांत धमकावल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या प्रकारामुळे संघटनेतील सदस्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांनी आपले क्रशर बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जाते. परिणामी त्यांच्या उदरनिर्वाहावर मोठा परिणाम झाला आहे. 'अधिकाऱ्यांकडूनच अशा प्रकारे वागणूक मिळत असेल तर आम्ही न्याय कुणाकडे मागायचा?' असा संतप्त सवाल करत तक्रारदारांनी बीएनएसच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या तक्रारीवर जिल्हा खाण व क्रशर उद्योग संघाचे सुरेश चांडक, दिलीप अग्रवाल, रवी अग्रवाल, गोविंद लड्ढा, राजू सदार, गोविंद कागलीवाल, अभय बिजवे, सतीश बलोदे, रोहित काळे, वरून ढोणे, गिरीधर कराड, हरविंदर सिंग माखन, साहिल चुंगा, रिजवान अहमद, करण शर्मा, मनोज राजगुरे, संजय गांगुर्डे, राम भारती, रमेश ठाकरे, शुभम तायडे, रमेश वानखेडे, लखन गावंडे, नैऋत्य खोसला, महेंद्र तरडेजा, विकास मोटवानी, मनमोहन सेठी, बादशहा शेख, रितेश शिरभाते, ईशान अग्रवाल, बिपीन चांगेला, प्रितेश पटेल, रमणीक पटेल, नमन खंडेलवाल, संजय अग्रवाल, विशाल इंदोने, सागर बजाज, निहाल धनसानीया, नीरज तापडिया, प्रसन्न तापडिया, मनिष गिरी, राहुल सावजी, योगेश सावजी, पंकज देशमुख, रितेश बलोदे, संतोष चांडक, रवी चांडक यांच्या सह्या आहेत.

दरम्यान, या प्रकरणामुळे महसूल व खाण विभागात खळबळ उडाली असून एमआयडीसी पोलीस ठाणे पुढील तपास करीत आहे.

## चांदूर बाजारात १६ लाखांचा

(क्रमांक एमएच २७ बीएक्स ५८३६) येताच पोलिसांनी ते थांबवून तपासणी केली. सुरुवातीला चालकाने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र सखोल झडती घेतली असता वाहनात मोठ्या प्रमाणात गुटखा आढळून आला. ही कारवाई IPS सागर भांबरे, ठाणेदार अशोक जाधव, उल्हास राठोड, विनोद इंगळे आणि रुपेश श्रीवास यांच्या पथकाने केली. वाहनचालक मुदस्सीर खान शेर खान (रा. अमरावती) याने प्राथमिक चौकशीत हा माल मध्य प्रदेशातून आणून अमरावतीत पोहोचवायचा असल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपी चालकाला ताब्यात घेऊन पुढील चौकशी सुरू केली असून या गुटखा तस्करीमागील मोठ्या नेटवर्कचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## तळागाळातून नेतृत्व निवडीवर

संजय दुबे, हरिभाऊ मोहोड, सुधाकरराव भारसाकळे, कांचनमाला गावंडे, प्रवीण मनोहर, मुकद्दर खाँ पठाण, रामेश्वर अभ्यंकर, राहुल येवले, अनिकेत ढेंगळे आदी उपस्थित होते.

कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे या अभियानाला जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी प्रकाश काळबांडे, दयाराम काळे,संजय नागोणे, श्रीकांत गावंडे, बाबुभाई इनामदार,नितीन गोंडाने,डॉ.रवींद्र वाघमारे,श्रीकांत झोडपे, नामदेव तनपुरे, प्रमोद दाळू, सुनील गावंडे, प्रदीप देशमुख, हरेराम मालवीय, महेंद्र गेलवार,वैभव वानखडे, सुनील दौलतानी, किशोर देशमुख,गजानन टापरे, राजेश काळे, श्रीधर काळे,कैलास आवारे, अमोल होले, पंकज वानखडे, हेमंत सोनारे, बाबाराव बहुरूपी, अमोल धवसे,सहदेव बेलकर,शेख मुक्तार भाई, रामगोपाल मावसकर, राजकुमार मालवीय,सुरेश देशमुख, भोला मदने,भाई देशमुख,किशोर कीटूकले,येतेशाम नबील,राहुल बोडखे, श्याम बेलसरे, उत्कर्ष देशमुख,नितेश वानखडे, परीक्षित जगताप,पवन बेलसरे, विपुल भडांगे,श्रीनिवास सूर्यवंशी आदींची उपस्थिती होती.

## सालेपुरात विहिरीत आढळला

तिला शोधले आणि परत घरी आणून सोडले. गुरुवारी रात्री १२ वाजता ती पुन्हा घरून निघाली आणि परत नाही आली. शुक्रवारी सकाळी तिचा मृतदेह आकाश पाटील यांच्या शेतात आढळला. या मुळे परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच शिरजगाव पोलीस तिथे पोहोचले. फॉरेन्सिक पथकाला तपासणीसाठी बोलविण्यात आले होते. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवला. पुढील तपास पोलीस करत आहे.

## ßशासकीय गतिमानता, कार्यक्षमता

सर्व शासकीय, निमशासकीय विभागांच्या अधिनस्त कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी 'iGOT कर्मयोगी' पोर्टलवर उपलब्ध असलेले विविध अभ्यासक्रम पूर्ण करणे अपेक्षित आहे. हे अभ्यासक्रम देशातील नामांकित संस्थांकडून तयार करण्यात आले असून ते विनामूल्य उपलब्ध आहेत. प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने 'iGOT कर्मयोगी' पोर्टलवर नोंदणी करुन उपरोक्त कालावधीत (दि.२ ते ८ एप्रिल २०२६) किमान ४ तासांचे ऑनलाईन प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य आहे. या प्रशिक्षणांमुळे प्रशासनात तंत्रज्ञान (Technology), परंपरा (Tradition) आणि दृश्यमान परिणाम (Tangible Outcomes) या त्रिसूत्रीचा प्रभावी अवलंब होईल. प्रत्येक शासकीय विभागातील अधिकारी- कर्मचाऱ्यांनी पूर्ण केलेल्या प्रशिक्षणांचा विभागीय आयुक्तांनाकडून आढावा घेण्यात येणार आहे. विभागातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या व्यावसायिक क्षमतेचा आणि ज्ञानाचा विस्तार करण्यासाठी राज्य शासनाव्दारे आयोजित या 'महा-साधना सप्ताहात' उत्स्फुर्तपणे सहभाग घेऊन प्रशिक्षण पूर्ण करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

## तपोवनमध्ये ६०० रहिवाशांच्या

आधार घ्यावा लागत होता. परिसरातील सुक्या लाकडांचा वापर करून कसाबसा स्वयंपाक केला जात होता.

संस्थेत सुमारे साडेसहाशे रहिवासी असून त्यामध्ये अनेक वृद्ध महिलांचा समावेश आहे. त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन इतर महिलांना रोजगार देत अन्नव्यवस्था सुरू ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. मात्र ही परिस्थिती अत्यंत वेदनादायक असून समाजातील उपेक्षित घटकांची अवस्था अधोरेखित करणारी आहे.

या समस्येबाबत संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले होते. तरीही प्रशासनाकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली होती.यावेळी खासदार बळवंत वानखडे यांनी जिल्हा प्रशासनाच्या हलगर्जीपणावर तीव्र नाराजी व्यक्त करत, अशा संवेदनशील विषयांकडे दुर्लक्ष करणे अस्वीकार्य असल्याचे सांगितले. तसेच, भविष्यात अशा प्रकारची वेळ येऊ नये यासाठी प्रशासनाने तत्परतेने उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, संस्थेतील महिला व कार्यकर्ते अजूनही एकजुटीने अन्नव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. प्रशासन आणि समाज या दोघांनीही या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## जुळ्या शहरात इंडेन गॅसच्या

२५ दिवसांनंतर पुन्हा बुकिंग करता येते, मात्र येथे त्या नियमांचे उघडपणे उल्लंघन होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. ग्राहकांनी अनेक वेळा एजन्सीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र फोन कॉल्सला प्रतिसाद मिळत नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. काही वेळा संपर्क झाला तरी कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जातात, अशी तक्रारही करण्यात आली आहे. इंडेन गॅस वितरणातील सततच्या विलंबामुळे जुळ्या शहरात गॅस सिलेंडर ब्लॅकमध्ये विकले जात असल्याची चर्चा आहे. या गंभीर समस्येकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तहसील कार्यालयात वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत आहे. एजन्सीच्या व्यवस्थापकाच्या वर्तणुकीबाबतही अनेक तक्रारी समोर येत असून, ग्राहकांशी गैरवर्तन केल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. एकूणच, अचलपूरमध्ये गॅस वितरण व्यवस्थेतील अनियमितता आणि मनमानीमुळे सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत झाले असून, प्रशासनाने तातडीने लक्ष घालून समस्या सोडविण्याची गरज निर्माण झाली आहे.

## तडीपार गुन्हेगाराकडून सार्वजनिक

एक धारदार चाकू जप्त करण्यात आला असून त्याची किंमत अंदाजे १००० रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. पोलिसांनी तात्काळ शस्त्र जप्त करून आरोपीला फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन येथे आणले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध शस्त्र अधिनियम कलम ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ व १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे. पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस करत आहेत. तडीपार असतानाही सार्वजनिक ठिकाणी हजर राहून दहशत निर्माण केल्यामुळे पोलिसांनी या कारवाईला गांभीर्याने घेत कठोर पावले उचलली आहेत.

## छळाला कंटाळून अल्पवयीन

दबाव निर्माण करत असल्याचे सांगण्यात आले आहे. 'तू माझ्याशी प्रेम कर, मी तुझ्याशी लग्न करतो,' असा आग्रह व धमकीही वारंवार देण्यात येत होती. या सततच्या त्रासामुळे युवती मानसिकदृष्ट्या खचली होती. अखेर तिने घरात ठेवलेले विषारी औषध प्राशन करून टोकाचे पाऊल उचलले. प्रकृती गंभीर झाल्यानंतर तिला तातडीने अमरावती येथील इर्विन रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र उपचारादरम्यान तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर कुटुंबीयांनी तीव्र आक्रोश व्यक्त केला असून, आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. परिसरातील नागरिकांमध्येही या प्रकाराबाबत तीव्र संतापाचे वातावरण आहे. दरम्यान, चांदूर बाजार पोलिसांनी मृत युवतीच्या वडिलांच्या तक्रारीवरून संबंधित तरुणाविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे. पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.

## घरात घुसून चाकू हल्ला

बोरकर यांचे बोट तुटले असून, दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. आरडाओरड होताच परिसरातील नागरिक जमा झाले, त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलमाअन्वये गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, ४ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## शालेय विद्यार्थ्यांच्या आधार नोंदणीला गती द्या - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

### जिल्हास्तरीय आधार सनियंत्रण समिती सभा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या आधार नोंदणी व अद्ययावत प्रक्रियेला गती देणे अत्यंत आवश्यक असून, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. जिल्हास्तरीय आधार मॉनिटरिंग समितीची बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते.



बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार तसेच शिक्षणाधिकारी संजय ससाणे, वैद्यकीय अधिकारी डॉ पराग राठोड आदी उपस्थित होते. बैठकीत बँकांच्या अधिनस्त असलेल्या निष्क्रिय आधार किट्स तातडीने कार्यान्वित करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले. Child at Birth अंतर्गत नवजात बालकांची आधार नोंदणी वाढविण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष प्रयत्न करावेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

पुढे बोलतांना जिल्हाधिकारी कुंभेजकर म्हणाले ,शालेय विद्यार्थ्यांच्या आधार नोंदणीस गती देण्यासाठी शिक्षण विभागाला शाळानिहाय वेळापत्रक तयार करून नियोजनबद्ध मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले. प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यावरही भर द्यावा.

मानोरा व मंगरूळपीर तालुक्यांमध्ये स्थलांतरित कामगारांचे प्रमाण अधिक असल्यामुळे त्यांच्या पाल्यांच्या आधार नोंदणीत अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले. जन्मदाखल्याअभावी प्रक्रिया अडखळत असल्याने संबंधित तहसीलदारांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून नोंदणी प्रक्रिया सुरळीत करावी, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी संबंधितांना दिले.

तसेच, कमी व्यवहार असणाऱ्या आधार किट्सचा कारणनिहाय आढावा घेऊन त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले. आधार नोंदणीच्या प्रगतीवर सातत्याने लक्ष ठेवण्याचेही निर्देश दिले. बैठकीत तृतीयपंथीयांच्या आधार नोंदणीची स्थितीचा आढावा घेतला. या घटकांपर्यंत सेवा पोहचायला हवी. अद्यापही संबंधितांची आधार नोंदणी झाली नसल्यास याचा समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून पाठपुरावा करावा असेही जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी सांगितले.

जिल्ह्यात आतापर्यंत ५ ते १७ वयोगटातील ६,२७० विद्यार्थ्यांची आधार नोंदणी शिबिरांच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आली आहे. दिव्यांग नागरिकांच्या आधार अद्ययावत प्रक्रियेबाबत सर्व केंद्र चालकांना प्रशिक्षण देण्यात आले असून, माहितीचे सादरीकरण जिल्हा प्रकल्प प्रमुख सौरभ जैन यांनी केले.

यावेळी जिल्हा प्रकल्प अधिकारी राहुल काकड, वरिष्ठ सहाय्यक अभियंता भूषण मेटकर यांच्यासह समिती सदस्य उपस्थित होते. काही सदस्य दुरदृष्यप्रणालीव्दारे सहभागी झाले.

## समृद्धी महामार्गावरील आपत्कालीन सेवांवर मनसेचा आक्षेप; गुन्हा दाखल करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेच्या वतीने समृद्धी महामार्गावरील अपुऱ्या आपत्कालीन सेवांविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. मनसे जिल्हाध्यक्ष राजू पाटील किडसे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा सचिव तथा वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष गजानन वैरागडे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन संबंधित कंत्राटदार व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावरील सुविधा व आपत्कालीन सेवा केवळ दिखावा ठरत असून प्रत्यक्षात गरजूंना वेळेत मदत मिळत नाही. याचे उदाहरण म्हणून २८ मार्च रोजी सकाळच्या सुमारास कारंजा येथील टोल नाक्याजवळ घडलेली दुर्दैवी घटना अधोरेखित करण्यात आली आहे. एका ट्रकचा डिझेल पाइप निकामी झाल्याने तो रस्त्याच्या मध्यभागी नादुरुस्त अवस्थेत उभा होता. मात्र, तीन ते चार तास उलटूनही कोणतीही आपत्कालीन सेवा घटनास्थळी पोहोचली नाही.

दरम्यान, मागून येणाऱ्या दुसऱ्या ट्रकने नादुरुस्त ट्रकला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेला आपत्कालीन सेवा पुरविणाऱ्या यंत्रणेची निष्क्रियता जबाबदार असल्याचा आरोप मनसेने केला आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित कंत्राटदार व जबाबदार कर्मचाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच संबंधित कंत्राटदाराला तत्काळ ब्लॅकलिस्ट करण्यात यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक भूमिका घेईल, असा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी मनसे जिल्हा उपाध्यक्ष उमेश टोलमारे, वाशिम तालुका अध्यक्ष विठ्ठल राठोड, शहर उपाध्यक्ष आकाश लोलप, महिला तालुकाध्यक्ष पुष्पाताई रवंदळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## महावितरणचा ढिसाळ कारभार

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरात मागील दीड ते दोन महिन्यांपासून वीज पुरवठ्याचा लपंडाव सुरू असून नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. दररोज विविध कारणांनी पाच ते दहा मिनिटांसाठी वीज खंडित होणे ही बाब आता नित्याची झाली आहे. मात्र, १ एप्रिलच्या रात्री घडलेल्या प्रकाराने महावितरणच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

मंगळवारी रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास अवकाळी पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे कारंजा फीडरवरील अर्ध्या शहराचा वीज पुरवठा अचानक खंडित झाला. हा पुरवठा काही भागात रात्री १ वाजता, तर उर्वरित भागात तब्बल २ वाजता पूर्ववत करण्यात आला. दरम्यान, पाऊस थांबल्यानंतरही वीज सुरू न झाल्याने नागरिकांना प्रचंड उकाडा आणि मच्छरांचा सामना करावा लागला. विशेषतः लहान मुले आणि वृद्धांची अवस्था बिकट झाली.

या गंभीर परिस्थितीत शहरातील काही राजकीय पदाधिकारी आणि पत्रकारांनी महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. शहर अभियंता कडू, उपकार्यकारी अभियंता राजपूत तसेच वाशीम येथील कार्यकारी अभियंता चव्हाण यांना अनेकदा फोन करूनही कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

'जर पत्रकार आणि पदाधिकाऱ्यांचे फोनही उचलले जात नसतील, तर सामान्य नागरिकांची दखल कोण घेणार?' असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## अडोळी गाव विकत घ्या; शेतकरी कर्जमुक्त करा

### आंदोलनाचा दुसरा दिवस, काळ्या रेबीन बांधून शासनाचा निषेध

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील अडोळी येथील शेतकऱ्यांनी दि.२ एप्रिल २०२६ पासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर ठीया आंदोलनाला सुरुवात केली आहे. गेल्या काही वर्षांपासून सततची नापीकी , अतिवृष्टी यामुळे शेतकरी हा हातबल झाला आहे.आणि यातच शासनाने दोन लाख रूपयांपर्यंतची कर्जमाफी तर केली.परंतु कर्ज माफी करतांना जाचक अटी लावून शेतकऱ्यांच्या तोंडाला काळे फासले आहे.त्यामध्ये ज्या शेतकऱ्यांकडे आयसीसीचे घराचे बांधकाम, टु व्हीलर,फोर व्हीलर गाडी असेल त्यांना कर्ज माफी नाही.



म्हणून अडोळी येथील शेतकऱ्यांनी ठीया आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे.त्यामध्ये कर्ज माफी सरसकट द्या, वाशीम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक वीमा द्या, खाजगी फायनान्स कर्ज वसूल थांबवा, रोजगारासाठी एम आय डी सी प्रकल्प सुरू करावा.इत्यादी मागण्या घेवून ठीया आंदोलन सुरू केले आहे.

आंदोलनामध्ये युवा शेतकरी सतीश इढोळे,उपसरपंच भगवान इढोळे, खंडोबा कंट्रक्शनचे संचालक प्रमोद इढोळे, समाजसेवक राजकुमार पडघान, भगवान इढोळे, वसंतराव इढोळे, रवि इढोळे, घनश्याम इढोळे, पुरुषोत्तम इढोळे,अमोल शिंदे, दिपक इढोळे,अमोल खंडारे, माजी सरपंच संतोष इढोळे, शाळीग्राम इढोळे यांचेसह शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. आंदोलन सभामंडपात सर्व शेतकऱ्यांनी दंडाला काळ्या रेबीन बांधून शासनाचा निषेध केला आहे.आणि कर्ज माफी सरसकट द्या म्हणून घोषणा करण्यात आल्या आहेत.

यावेळी शासनाचे प्रतिनिधी म्हणून ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन व कृषी सहायक अधिकारी गजानन ठोकळ यांनी ठीया आंदोलनाला भेट देवून शेतकरयांशी चर्चा केली.परंतु चर्चा दरम्यान आंदोलनकर्त्यांचे समाधान झाले नाही.त्यामुळे आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार अडोळी येथील शेतकऱ्यांनी घेतला आहे.

## यशाचा आनंद साजरा केल्याने मिळते उर्जा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिद्द, मेहनत अन् हिंमतीने मिळविलेल्या यशाचा आनंदोत्सव साजरा केलाच पाहिजे. त्यामुळे स्वत:मधील उर्जा वाढते, असा सूर 'यशाचा आनंदोत्सव' या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा राहिला. हा कार्यक्रम येथील माँ गंगा नर्सिंग कॉलेजमधील सिताराम सभागृहात (ता.२९) रविवारी सायंकाळी ४ वाजता पार पडला. जनस्वप्नपूर्ती माध्यम समूह अन् सकारात्मक साहित्य परिवाराच्या वतीने उपरोक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विविध क्षेत्रात कर्तृत्त्व गाजविणाऱ्यांना 'प्रेरणादिप', 'ॲक्टिव्ह पर्सनॅलिटी' अन् उर्जादायी व्यक्तिमत्त्व पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## शिवसेनेच्या वतीने थंड पाण्याची पानपोई



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथे शिवसेना नेत्या विधान परिषद आमदार भावना गवळी यांच्या मार्गदर्शनात लोकनियुक्त नगराध्यक्ष ओमप्रकाश मधुकर खुरसडे व नगरसेवक, नगरसेविका शिवसेना यांच्या वतीने RO पिण्याच्या शुद्ध पाण्याच्या पाणपोईचे मोफत उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

यांच्या आयोजित या कार्यक्रमाला उपस्थित मालेगाव शहराचे नगराध्यक्ष ओमप्रकाश मधुकर खुरसडे, उपाध्यक्ष पती महादेवराव खवले, सभापती आझाद पठाण, आरोग्य व शिक्षण सभापती सविता सारडा, महिला व बालकल्याण उपसभापती प्रियंका अभिराज घुगे नगरसेविका रज्जु गजानन काळे यांच्यासह पोलीस निरीक्षक इंगळे साहेब, नगर पंचायत अधीक्षक शेख इमरान , तसेच मोठ्या संख्येने पोलीस बांधव आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

तसेच , गजानन काळे, अंकुश गुजरे, सनी घुगे, जाफर, गजानन सारसकर, सर्व शिवसेना नगरसेवक, जिल्हाध्यक्ष प्रदीप मोरे, शहराध्यक्ष विकास बळी, राम काटेकर, संदीप कोपुरवार, सोनू जिंतूरकर, अमोल लादे, संतोष जोशी, उदय तोंडे, सुनील पुरोहित, संतोष शेटे, अभी घुगे, संजय सारडा, सतीश सांगळे, गजानन केंद्रे, पंकज महाकाळ, विशाल बनचरे, तसेच मोठ्या संख्येने शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या कार्यकारिणीचे गठन

### अध्यक्षपदी तेजराव वानखेडे, उपाध्यक्षपदी निलेश सोमानी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न ,महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे नुकतेच गठन करण्यात आले असून अध्यक्षपदी तेजराव वानखडे तर उपाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते पत्रकार निलेश सोमानी यांची निवड करण्यात आली आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असून सर्वधर्म समभावाची शिकवण देत सदर कार्यकारिणीचे गठन करण्यात येऊन त्यामध्ये प्रत्येक समाजातील समाज सेवकांना स्थान देण्यात आले आहे. सदर कार्यकारणीत सचिवपदी शेषराव धांडे ,कार्याध्यक्ष दौलतराव हिवराळे, कोषाध्यक्ष अरविंद उचित , सह कोषाध्यक्ष रमेश भगत, उपाध्यक्ष गजाननराव भोयर, समाजसेवक निलेश सोमानी, सोनाजी इंगळे, सहसचिव दिगंबर साबळे संघटक शेषराव मेश्राम, सहसंघटक जगदीश मानवतकर, सदस्य प्रेमचंद कांबळे, संतोष इंगळे, चवरे साहेब, ॲड. माधव वैद्य, सुनील तायडे सुशील भीमजीयांनी, हरिदास बनसोड, बाळासाहेब रोकडे, बाळासाहेब लेमले यांची निवड करण्यात आली आहे सदर कार्यकारिणीचा आणखी विस्तार करण्यात येणार आहे सामाजिक जाणीव असणाऱ्यांनी या कार्यकारणी मध्ये स्वतःहून सहभागी व्हावे असे आव्हान अध्यक्ष तेजराव वानखेडे यांनी केले आहे.

## मालेगाव येथे हनुमान जयंती उत्साहात

■ प्रतिनिधी | मालेगाव ■


तालुक्यासह शहरात हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळपासूनच शहरातील विविध हनुमान मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. जय श्रीराम आणि हनुमान चालीसा च्या गजरात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच काही भागांत भंडाऱ्याचेही आयोजन करून भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदवला. मालेगाव शहरातील आठवडी बाजार परिसरातील हनुमानजी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १ क्विंटल चणे वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

## गव्हाच्या कांड्या जाळण्याऐवजी कुजविण्याचा पर्याय अधिक फायदेशीर

### सुभाष वडेकर यांचा यशस्वी प्रयोग

■ प्रतिनिधी | कारंजा ■

सध्या राज्यभर गहू काढणीचा हंगाम सुरू असून, कमी खर्चात व कमी मजुरीत येणारे पीक म्हणून गव्हाला शेतकऱ्यांकडून मोठी पसंती मिळत आहे. हार्वेस्टरच्या साहाय्याने काढणी करताना साधारणतः ३० ते ४० टक्के भाग कापला जातो, तर ६० ते ७० टक्के गव्हाचा काड शेतातच शिल्लक राहतो. यामुळे प्रती एकर सुमारे १ ते १.५ टन इतका काड शेतात उपलब्ध राहतो.



मात्र, अनेक ठिकाणी हा काड जाळून टाकण्याची पद्धत प्रचलित आहे. या प्रक्रियेमुळे जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीव नष्ट होतात, जमिनीची सुपीकता घटते तसेच पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. याशिवाय, पक्ष्यांची घरटी व त्यातील पिल्लेही नष्ट होतात. विशेष म्हणजे, सुमारे १०० क्विंटल काड जाळल्यानंतर केवळ १.५ किलो राख मिळते, त्यामुळे या पद्धतीचा कोणताही ठोस फायदा होत नाही.

याउलट, धानोरा ताथोड येथील प्रगतशील शेतकरी सुभाष वडेकर यांनी गव्हाच्या कांड्या जाळण्याऐवजी त्या शेतातच कुजवण्याचा प्रयोग करून सकारात्मक परिणाम मिळवले आहेत. त्यांच्या मते, काड कुजवल्याने जमिनीत ह्युमस तयार होतो. हा ह्युमस जमिनीत आर्द्रता टिकवून ठेवण्यास मदत करतो व पिकांना आवश्यक पोषक घटक पुरवतो. तसेच कुजलेले अवशेष हे गांडुळांसाठी नैसर्गिक अन्न ठरत असल्याने जमिनीत गांडुळांची संख्या वाढते व जमिनीचा पोत सुधारतो.

**कुजविण्याची सोपी प्रक्रिया पुढीलप्रमाणे :** प्रथम उन्हात एकदा रोटावेटर चालवून गव्हाचा काड जमिनीत मिसळावा. त्यानंतर शक्य असल्यास शेतात पाणी सोडावे. पुढे वेस्ट डीकंपोजर २०० लिटर पाण्यात २ किलो गुळ घालून सुमारे ७ दिवस आंबवून तयार करावा आणि तो द्रावण प्रती एकर शेतात फवारावा. तसेच ए-९ कल्चरचा वापर करावा. सुमारे २० ते २५ दिवसांनंतर नांगरणी करून पुन्हा रोटावेटर चालवून पेरणी करावी.

या प्रक्रियेमुळे जमिनीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढते व ते दीर्घकाळ टिकून राहते. जमिनीत आर्द्रता राखली जाते, सूक्ष्मजीवांची संख्या वाढते आणि जमीन भुसभुशीत बनते. परिणामी, पिकांची मुळे खोलवर जातात, पांढऱ्या मुळांची संख्या वाढते आणि पिकांची वाढ अधिक जोमदार होते.

शेतकरी सुभाष वडेकर यांनी इतर शेतकऱ्यांना किमान एका एकरावर तरी हा प्रयोग करून पाहण्याचे आवाहन केले आहे. काड जाळण्याऐवजी कुजविण्याची पद्धत अवलंबल्यास पर्यावरण संरक्षणासह जमिनीची सुपीकता वाढवून शेती अधिक शाश्वत करता येईल.

## राज्यसभा सदस्य वडकुते यांचा सत्कार

### वैनगंगा पैनगंगा नदी जोड प्रकल्पाबाबत झाली चर्चा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भाजपाचे नवनिर्वाचीत राज्यसभेचे खासदार रामराव वडकुते यांचे वाशिम नागरित ठीकठिकानी स्वागत सत्कार करण्यात आला. मुख्य कार्यक्रम भाजपा नगर पालिका गटनेते बाळूभाऊ मुरकुटे यांच्या पुढ़ाकाराने अयोजित करण्यात आला होता.

डॉ. गजानन म्हस्के यांचे घरी खासदार वडकुते यांचा हृदयसत्कार वैनगंगा पैनगंगा नदी जोड प्रकल्प संघर्ष समितीचे अध्यक्ष हरीश सारडा यांच्या हस्ते करण्यात आला. सोबत माजी समाजकल्याण सभापती किसनराव म्हस्के डॉ. गजाननराव म्हस्के नारायणराव वानखेड़े विजुभाऊ इंगोले अजय इंगोले आनंद खेरड़े नदीजोड़ प्रकल्पाचा विषय काढून चर्चा झाली , कौतुक केले खासदार वडकुते यांनी सदर विषयात लक्ष घालन्याचे आश्वासन दिले.

## शरद पोंक्षेवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

### आंबेडकरी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनाकडे मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि.२ एप्रिल रोजी जिल्ह्यातील आंबेडकरी समाजाच्या वतीने प्रसिद्धी पिसाटू अभिनेता शरद पोंक्षे यांचेवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा.अशी मागणी महाराष्ट्र शासनाला जिल्हाधिकारी यांचे मार्फत एका निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, प्रसिद्धी पिसाटू अभिनेता शरद पोंक्षे याने असे म्हटले होते की, मनुस्मृती मध्ये कोणालाही दुय्यम वागणूक दिली नाही.,ती जाळणार्यांनी वाचली नाही.,वाचली असती तर ते जाळूच शकले नसते.असे बिन अकलेचे तारे उडवीत भारतीय संविधान निर्माते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान तर केलाच शिवाय संपूर्ण देशवासीयांच्या भावना दुखावल्या आहेत.

त्यामुळे प्रसिद्धी पिसाटू अभिनेता शरद पोंक्षे यांचेवर कठोरातील कठोर कार्यवाही करून देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा.अशी मागणी वाशीम जिल्ह्यातील आंबेडकरी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.निवेदनावर बहुजन रत्न पुरस्कार प्राप्त तथा समाजसेवक राजकुमार पडघान, समाजसेवक अनंत तायडे,कवी महेंद्र ताजणे, समाजसेवक समाधान अवचार,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विनोद पट्टेबहादूर,से.नि.शिक्षक आर.पी.कांबळे, ब्रम्हा ग्रामपंचायत सदस्य संतोष इंगळे,शाहीर धम्मानंद इंगोले, समाजसेवक विशाल पडघान, समाजसेवक माधव डोंगरदिवे, दादाराव इंगोले, प्रकाश खडसे,दिपक इंगळे,व समाजसेवक भारत खडसे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. पुढे निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, ज्या मनुस्मृती मध्ये माणसाला माणूस म्हणून वागणूक नसायची,त्याच मनुस्मृतीचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सखोल अभ्यास करून देशातील प्रत्येक समाजाला समानतेची वागणूक व अधिकार संविधानाच्या माध्यमातून सर्व समाजातील स्त्री पुरुषांना समानतेची वागणूक देवून माणूस बनविले.



आणि त्याच संविधान निर्मात्यांनी दि. २५ डिसेंबर १९२७ साली मनुस्मृती जाळून देशातील वर्ण व्यवस्था नष्ट केली.असे संविधान निर्माते विद्वान पंडीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा तर अपमान केलाच शिवाय देशातील तमाम आंबेडकरी जनतेचा आणि देश वासियांचा अपमान केला. म्हणून असे वक्तव्य करणाऱ्या प्रसिद्धी पिसाटू अभिनेता शरद पोंक्षेचा वाशीम जिल्ह्यातील आंबेडकरी समाजाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला आहे.आणि शरद पोंक्षे यांचेवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १२७ ■ शनिवार, ४ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


आयत्या बिळावर नागोबा, दुरंतोवरून श्रेयाचा तमाशा

## प्रतिभा धानोरकर धावल्या पुढे, तडस म्हणे 'मीच पुढे : एकाने उचलली जबाबदारी, दुसऱ्याने केली फक्त जाहिरात भारी

**वर्धा जनमाध्यम :** नागपूर-मुंबई 'दुरंतो एक्सप्रेस'ला वर्धा स्थानकावर थांबा मंजूर होताच विकासाच्या या निर्णयावर राजकीय श्रेयाची धूळ उडाली आहे. चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या आक्रमक पाठपुराव्यामुळे हा थांबा मिळाल्याचा ठोस दावा होत असताना, वर्ध्याचे माजी खासदार रामदास तडस यांनीही हा आमच्याच प्रयत्नांचा परिणाम म्हणत मैदानात उडी घेतली. त्यामुळे आयत्या बिळावर नागोबा ही म्हण अक्षरशः खरी ठरल्याची चर्चा जिल्हाभर रंगली आहे.

रेल्वे बोर्डाने २७ मार्च २०२६ रोजी 'दुरंतो'ला वर्ध्यात प्रायोगिक थांबा मंजूर केला आणि त्यानंतर लगेचच श्रेयासाठी राजकीय नेत्यांमध्ये चढाओढ सुरू झाली. खासदार धानोरकर यांनी २३ मार्च रोजी लोकसभेत नियम ३७७ अंतर्गत प्रश्न उपस्थित करत वर्ध्यासह संपूर्ण विदर्भाच्या प्रवाशांची व्यथा मांडली होती. त्यानंतर अवघ्या तीन दिवसांत २६ मार्च रोजी त्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांची दिल्लीत भेट घेऊन थेट मागणी लावून धरली. नागपूरला जाऊन ट्रेन पकडण्याची



वेळ संपली पाहिजे, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली होती. त्यांच्या या आक्रमक पाठपुराव्यानंतर अवघ्या २४ तासांत निर्णय झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. मात्र, दुसऱ्या बाजूला माजी खासदार तडस यांनीही लगेच प्रेस नोट काढत हा आमच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा विजय असा दावा केला. खासदार असताना नियम ३७७, शून्यकाल, तसेच रेल्वे मंत्र्यांना दिलेली निवेदने यांचा दाखला देत त्यांनी आपली भूमिका मांडली. याशिवाय झेडआरयुसीसी सदस्य प्रणव जोशी यांच्या पाठपुराव्याचाही त्यांनी उल्लेख केला. पण निर्णय जाहीर होताच श्रेय घेण्यासाठी पुढे येण्याच्या या घाईवर नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

वास्तविक पाहता, धानोरकर यांनी नुकत्याच केलेल्या थेट आणि आक्रमक पाठपुराव्यामुळेच हा निर्णय वेगाने झाला, अशी भावना नागरिकांमध्ये अधिक ठळकपणे दिसून येत आहे. त्यामुळे काम एकाचे, नाव दुसऱ्याचे अशी कुजबुज सर्वत्र ऐकू येत आहे.

दरम्यान, या सर्व राजकीय गदारोळात सामान्य प्रवाशांसाठी मात्र मोठा दिलासा मिळाला आहे. वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ आणि गडचिरोली जिल्ह्यातील हजारो प्रवाशांना आता नागपूरपर्यंत धावपळ करण्याची गरज उरणार नाही. वेळ, पैसा आणि श्रम यांची बचत होणार असून मुंबईकडे जाणारा प्रवास अधिक जलद आणि सुलभ होणार आहे. राजकारणात श्रेयासाठी कितीही आरडाओरडा झाला तरी जनतेला हवे असते ते ठोस काम. 'दुरंतो'चा थांबा हा जनतेसाठी दिलासा असला, तरी या निमित्ताने उघड झालेली श्रेयाची लढाई मात्र वर्ध्यातील राजकारणाचे खरे चित्र अधोरेखित करत आहे.

**दुरंतो एक्सप्रेसला थांबा :**

**धानोरकर यांचे मानले आभार - खा. अमर काळे**

**वर्धा :** नागपूर-मुंबई दुरंतो एक्सप्रेस आता वर्धा येथे थांबणार असल्याने प्रवाशांवरचा त्रास संपणार आहे. वर्धा, चंद्रपूर व वणी भागातील लोकांना आतापर्यंत नागपूरपर्यंत धावावे लागत होते, वेळ व पैसा दोन्ही घालवावा लागत होता. चंद्रपूर खासदार प्रतिभा धानोरकर यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना पाठपुरावा करून मागणी केली, मंत्रालयाने ताबडतोब मंजुरी दिली. वर्धा खासदार अमर काळे यांनी दोघांचे मनःपूर्वक आभार मानले; प्रवाशांसाठी ही सुविधा एक मोठा दिलासा ठरली आहे.

## सिंदी रेल्वे : लेखणी बोलली आणि शहर हलले; 'प्याऊ'साठी समाजसेवक आले पुढे

### समाजसेवकांनी घेतली बातमीची दखल



**सिंदी रेल्वे । मोहन सुरकार :** बाटलीबंद पाण्याच्या फॅशनमुळे गरीबांची तहान अक्षरशः वाऱ्यावर सोडली गेली होती. शहरात एकही पाणपोई नसल्याची जळजळीत वस्तुस्थिती 'जनमाध्यम'ने १ एप्रिल रोजी बातमी प्रकाशित करताच, झोपेत गेलेली व्यवस्था हलली नाही, पण समाज जागा झाला, आणि अवघ्या दोन दिवसांत सिंदीत पहिल्या पाणपोईचा शुभारंभ होत बातमीचा इम्पॅक्ट काय असतो, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

'बाटलीबंद पाण्याच्या फॅशनमुळे एकही पाणपोई दिसेना' या शीर्षकाखाली 'जनमाध्यम'ने मांडलेल्या वास्तवाने शहरातील संवेदनशील नागरिकांच्या मनाला चटका लावला. प्रशासनाकडून मात्र नेहमीप्रमाणे शांतताष्ठ ना हालचाल, ना पुढाकार पण समाजातील काही सजग व्यक्तींनी ही वेदना स्वतःची मानली आणि कृतीचा मार्ग निवडला. सिंदी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सेवानिवृत्त सचिव आय.आय. सुफी, व्यापारी जीलानी सुर्या, शकील शेख आणि जमील खान या चार सजग नागरिकांनी पुढे येत तहानेला पाणी देणे हीच खरी सेवा या भावनेतून पाणपोई सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यातच स्थानिक आरो पाणी व्यावसायिक महेंद्र बहेकर यांनीही सिंहाचा वाटा उचलत दररोज लागणारे पाणीकॅन निम्म्या दरात देण्याचे आश्वासन दिले आणि उपक्रमाला बळ दिले.शुक्रवारी (ता.३) या पाणपोईचे नगराध्यक्षा राणी स्नेहल कलोडे यांच्या हस्ते थाटात उद्‌घाटन झाले. यावेळी उपाध्यक्ष अकील शेख, नगरसेवक सुरज कोपरकर, प्रविण मडावी, धनराज झिलपे, अमोल बोंगाडे, शिरीष डकरे, इम्रान सुफी, बाळा इंगोले, हरीभाऊ मोरस्कर, रोशन तडस, चंपु भंसाली तसेच पत्रकार बबलू खान, अजीम शेख, मोहन सुरकार यांची उपस्थिती होती.

पाच-सात वर्षांनंतर शहरात उभारलेली ही पहिली पाणपोई म्हणजे केवळ एक सुविधा नाही, तर समाजाच्या जागरूकतेचा ठोस पुरावा आहे. प्रशासन अपयशी ठरले, पण समाज पुढे आला हा संदेश या घटनेतून ठळकपणे पुढे आला आहे.

**नाव नाही, केवळ सेवा**

या पाणपोईला कोणत्याही व्यक्तीचे नाव न देता 'सार्वजनिक प्याऊ' असे साधे नाव देण्यात आले. ना बॅनर, ना प्रसिद्धीची आहे फक्त सेवा! आजच्या दिखाऊ समाजकारणाला हा उपक्रम चपराक देणारा ठरला आहे.

# प्रारंभीक अधिसूचना

उपजिल्हाधिकारी (भुसंपादन), उर्ध्व वर्धा प्रकल्प
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचे कार्यालय
**क्र.स.म.अ./उ.जि./भूसं/उ.व.प्र/कावि-२८२/२०२६**
**दिनांक २७.०३.२०२६**

भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम ११(१) खालील अधिसूचना

भुसंपादन प्रकरण क्रमांक - **०४/एलएक्यू-४७/२०२४-२५**
मौजा - **इंझापूर, ता.वर्धा, जि.वर्धा**

**ज्याअर्थी, भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वनविभाग क्र.**संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, **दिनांक** १९ जानेवारी, २०१५ **(यात यापुढे जिचा निर्देश** उक्त अधिसूचना **असा करण्यात आला आहे) तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४-अ महसूल व वन विभाग दि.११ सप्टेंबर २०१५ याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियम कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.**

**आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश** उक्त जमीन **असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश** उक्त सार्वजनिक प्रयोजन **असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.**

**आणि ज्यार्थी, सदर्हु प्रस्तावित भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावी.)**

**आणि ज्यार्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे.**

**आणि ज्यार्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्त करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशिल नमुद करावा.)**

**त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.**

**परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.**

**परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.**

**तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश** उक्त नियम **असा करण्यात आला आहे) यांच्या नियम-१० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.**

**आणि ज्यार्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन), उर्ध्व वर्धा प्रकल्प, वर्धा यांना पदनिर्देशित करीत आहे.**

अनुसूची - एक
जमिनीचे वर्णन
भु.प्र.क्रमांक - ०४/एलएक्यू-४७/२०२४-२५
मौजा - इंझापूर, ता.वर्धा, जि.वर्धा

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १. | २६ | ०.०४३८ |
| २. | २७ | ०.०८१३ |
| ३. | २८ | ०.०९३८ |
| ४. | २९ | ०.०५४० |
| ५. | ३१ | ०.०२५६ |
| ६. | ३२ | ०.०३४१ |
| ७. | ६९/१, ६९/२, ६९/३, ६९/४ | ०.१३२६ |
| ८. | ७० | ०.१३९७ |
| ९. | ७१ | ०.०२२७ |
| १०. | ७२ | ०.०१४० |
| ११. | ७३ | ०.०६४० |
| १२. | ७४/१ | ०.०५८२ |
| १३. | ७५ | ०.०२६८ |
| १४. | ७६/१ ७६/२ | ०.०४२४ |
| १५. | ७८/१ | ०.१६२६ |
| १६. | १०१ | ०.१४५१ |
| १७. | १०२ | ०.२५४६ |
| १८. | १०३ | ०.२३०४ |
| १९. | १०४ | ०.१५६६ |
| २०. | १०५/१ १०५/२ | ०.४४७२ |
| २१. | १०६/१, १०६/२ | ०.५११४ |
| २२. | १०७/१ | ०.१११० |
| २३. | १०७/२ | ०.०३०० |
| २४. | १०८ | ०.००३१ |
| २५. | १०९ | ०.०६५५ |
| २६. | ११०/१, ११०/२, ११०/३, ११०/४, ११०/५, ११०/६, ११०/७, ११०/८ | ०.४६४४ |
| २७. | ११२ | ०.०७६३ |
| २८. | ११४ | ०.०१०८ |
| २९. | ११५ | ०.४२१८ |
| ३०. | ११६ | ०.५२७१ |
| ३१. | १५१/३ | ०.२७२४ |
| ३२. | १५१/४ | ०.०३४८ |
| | एकुण | ४.८४८५ |

अनुसूची - दोन
सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** - **नागपूर बोरी तुळजापूर प्र.रा.मा.-६ वर वर्धा शहराला वळण मार्ग बांधकाम (भाग वर्धा वायगांव राष्ट्रीय महामार्ग क.३४७-अ ते सावंगी, सालोड, राष्ट्रीय महामार्ग क.३४७-अ ला जोडणारा मार्ग) बांधकामाकरीता**

**महामार्ग प्रकल्प कार्याचे वर्णन** - **मौजा इंझापूर या गावातून जाणारे नागपूर बोरी तुळजापूर प्र.रा.मा.-६ वर वर्धा शहराला वळणमार्गाच्या बांधकामाकरीता खाजगी जमिनीचे भूसंपादन**

**समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक रोजगार, पायाभूत सुविधा, सोई-सुविधा याबाबत व ईतर लाभा-संबंधात)** - **सदर वळण महामार्गामुळे दळणवळण करणे सुलभ होणार आहे व उद्योगिकरणाला प्रोत्साहन मिळणार इत्यादी.**

अनुसूची - तीन

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास पाडणारी कारणे प्रमाणपत्रा विस्थापित** - **कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,वर्धा यांचे नुसार राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामाकरीता बाधित होणाऱ्या मौजा इंझापूर, ता.वर्धा येथील शेत जमीन संपादित करण्यात येत असून कुणीही व्यक्ती किंवा कुटूंब होत नाही.**

अनुसूची - चार

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश - **महाराष्ट्र शासन अधिसूचना २६ एप्रिल, २०१८ अन्वये भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम-१०(क) नुसार अधिनियमाच्या प्रकरण २ व ३ मधून अधिसूचना शासन राजपत्रात (भाग एक-संकिर्ण अधिसूचना) विभागीय आयुक्त नागपूर दिनांक ०५ ते ११ फेब्रुवारी २०२६ नुसार उक्त प्रकल्पाला सूट प्रदान करण्यात आली आहे.**

अनुसूची - पाच
नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

**अ) प्रशासक म्हणून नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम** - **निरंक**

**ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता** - **निरंक**

**क) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील विस्तृत विवरण (निर्गमित करण्या-पुर्वी भरावे)** - **निरंक**

विशेष नोंद -

**उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन ) उर्ध्व वर्धा प्रकल्प, वर्धा या कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.**

**दिनांक -**
**ठिकाण - वर्धा**

**Digitally signed by Vanmathi Chenniappan, Date 27.03.2026**

स्वाक्षरी/-
जिल्हाधिकारी, वर्धा

(क्र.जिमाका-वर्धा/०२/२०२६-२७)

जनमाध्यम एक प्रतिष्ठीत सवय

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती त्यांच्या विचारांचा ऊत्सव म्हणून साजरी करूया - मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई/प्रतिनिधी-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारांनी आणि संविधानाने देशाला प्रगतीची दिशा मिळाली आहे. त्यांचे कार्य आणि त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी दिलेले योगदान समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे हे अत्यंत आवश्यक आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त होणारा कार्यक्रम दरवर्षी अधिक उत्कृष्ट करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत असून, यावर्षीही विविध विभागांच्या समन्वयातून तो अधिक भव्य स्वरूपात साजरा करण्यात येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा सोहळा त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरा करूया असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल, २०२६ रोजीच्या १३५ व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस बैठकीस सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी राज्यमंत्री भाई गिरकर, माजी आमदार प्रकाश गजभिये, मुंबई महापालिकेच्या आयुक्तअश्विनी भिडे, अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव गोविंदराज, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, भन्ते डॉ. राहूल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, दादर चैत्यभूमी स्मारक समितीचे प्रतिनिधी यांच्यासह विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महापुरुषांच्या जयंती साजरी करण्यामागील उद्देश केवळ औपचारिकता नसून त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे असा आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधानांपैकी एक असून, त्यातील समावेशकतेच्या तत्त्वामुळे भारत विकसित राष्ट्राकडे वाटचाल करत आहे. समाजाला मिळणा-या संधी, हक्क आणि प्रगती यामागे कोणाचे योगदान आहे, हे नव्या पिढीला समजणे आवश्यक आहे. त्यामुळे जयंती सोहळा हा केवळ उत्सव न राहता विचारांचा प्रसार करणारा पर्व ठरतो.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दि.१४ एप्रिल २०२६ रोजी होणा-या जयंती उत्सवासाठी देशभरातून लाखो नागरिक चैत्यभूमीवर येतात. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर चैत्यभूमी परिसरात अभिवादनासाठी येणा-या अनुयायी आणि नागरिकांसाठी आवश्यक सोयीसुविधांची सर्वंकष व्यवस्था करण्यात यावी. उष्णतेपासून संरक्षण मिळावे यासाठी ठिकठिकाणी मंडप उभारण्यात यावेत. प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध ठेवावी. तसेच, दादर आणि परिसरातील वाहतूक सुरळीत राहावी यासाठी वाहतूक पोलिसांनी योग्य नियोजन करून नियंत्रण ठेवावे,असे निर्देशही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी संबधित अधिका-यांना दिले.

नागरिकांना मार्गदर्शन होण्यासाठी विविध ठिकाणी सूचना फलक लावावेत. बेस्ट प्रशासनाने दादर रेल्वे स्थानक ते चैत्यभूमी दरम्यान पुरेशा प्रमाणात बससेवा उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून नागरिकांची ये-जा अधिक सुलभ होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती देशासह जगभर मोठ्या प्रमाणावर साजरी होत असल्याचा उल्लेख करत, हा सोहळा अधिक उत्तम पद्धतीने साजरा करण्याची जबाबदारी आपली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले,भारतीय संविधान प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा उपक्रम विभागामार्फत हाती घेण्यात आला असून, जिल्हाधिकारी कार्यालयांच्या माध्यमातून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. नागरिकांमध्ये संविधानाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचा शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश लक्षात घेउन विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर वसतिगृहांची उभारणी करण्यात येत आहे. जयंती सोहळ्याच्या निमित्ताने यावर्षी काही विशेष उपक्रमही राबविण्यात येणार आहेत. १३ एप्रिल रोजी सायंकाळी ड्रोनच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर आधारित भव्य ड्रोन शो चैत्यभूमी परिसरात सादर करण्यात येणार आहे.या बैठकीत पोलीस पथक मानवंदना, चैत्यभूमीवर हेलिकाप्टरद्वारे पुष्पवृष्टी, शिवाजी महाराज मैदानावरील भव्य निवास मंडप, तेथील आपत्कालीन व्यवस्थेसह, आरोग्य सुविधा, प्रदर्शन मंडप, चैत्यभूमी स्तूप व परिसराची सजावट, लोकराज्य मासिकाचा विशेषांक, शासकीय जाहिरात व प्रसिध्दी याबाबत चर्चा झाली व याबाबत निर्देश देण्यात आले.बैठकीत मुंबई महापालिकेच्यावतीने नियोजनाची सविस्तर माहिती सादरीकरणातून देण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पोस्टरचे विमोचन करण्यात आले.

# राज्यातील अनेक भांगात वीजपुरवठा खंडित

## अवकाळी पावसाचा परिणाम झाडपडीच्या घटना, पाणी तुंबल्यामुळे वीजवाहिन्या बाधित



**पुणे/मुंबई :** राज्यातील शहर व परिसरात गुरुवारी दुपारी विजांच्या कडकडाटासह झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि वादळामुळे अनेक अतिउच्चदाब व उच्चदाब वाहिन्यांमध्ये बिघाड झाला. परिणामी, राज्यातील अनेक भागांतील वीजपुरवठा खंडित झाला. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी युद्धपातळीवर परिश्रम घेत आहेत. दरम्यान काही भागांचा बाधित झालेला वीजपुरवठा रात्री उशिरापर्यंत सुरु करण्यात आला.

साधारणत: तासभर झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी वाहिन्यांवर झाडे पडली. तर काही ठिकाणी फिडर बाक्स पाण्यात गेल्यामुळे वीज वाहिन्या बंद पडल्या. तर विजेच्या कडकडाटामुळेही काही ठिकाणी वीज वाहिन्या बाधित झाल्या. कोथरुड भागात कुंदननगरी फिडरवर विजेच्या कडकडाटामुळे आकाशातील विजेला अटकाव करणारी यंत्रणा बाधित झाली. त्यामुळे संबंधित वाहिनीचा वीजपुरवठा ठप्प झाला होता. मात्र पर्यायी मार्गाने या भागातील वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.

नांदेड सिटी अतिउच्चदाब वाहिनीवर ट्रिपिंग आल्यामुळे अर्ध्या तासासाठी कोथरुड विभागातील वीजपुरवठा बाधित झाला होता. पाउस थांबताच वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. शिवाजीनगर विभागातील विद्यापीठ, खडकी, बावधन, बाणेर, शिवाजी हाउसिंग सोसायटी या वाहिन्यांचा वीजपुरवठा बाधित झाला असून विद्यापीठ वाहिनी सुरु करण्यात यश मिळाले. पर्वती या भागातील महावितरणच्या जुन्या पर्वती वीज उपकेंद्रातील फिडरवर झाड पडले होते. त्याला हटवून वीजपुरवठा सुरु करण्याचे काम उशिरापर्यंत सुरु होते. तर प्रयेजा व मधुकोश वाहिनीच्या इनकमिंग फिडर बाक्स भागात पाणी साचल्याने वीजपुरवठा बंद झाला होता. खडकवासला, श्रवण वाहिनीच्या पेट्रोलिंगचे काम हाती घेण्यात आले होते. बंडगार्डन विभागात वडाचीवाडी या उपरी वीज वाहिनीवर झाडाच्या फांद्या पडल्याने त्या भागातील वीजग्राहकांचा वीजपुरवठा बंद झाला. तर वाडिया वाहिनीला तासाभरातच पर्यायी मार्गाने सुरु करण्यात आले.

वीजपुरवठा करणा-या अतिउच्चदाब वाहिनीवर परिणाम झाल्याने राज्यातील अनेक भागातील वीजपुरवठा देखील बाधित झाला. या व्यतिरिक्त ग्रामीण भागातही लघुदाब वाहिन्यांवर देखील पावसाचा परिणाम झाला असण्याची शक्यता महावितरणने व्यक्त केली. ग्राहकांनी विजेसंबंधीच्या सर्व तक्रारींसाठी महावितरणच्या १९१२, १८००२३३३४३५ व १८००२१२३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. महावितरणच्या मोबाईल ॲपवर देखील सर्व सुविधा २४ तास उपलब्ध आहेत. तसेच ९१६७७७७७९१ या क्रमांकावर व्हाट्सॲपद्वारेदेखील तक्रार करण्याचा नवीन पर्याय उपलब्ध आहे.

# राज्यात १०० लाख टन साखरेचे उत्पादन

**पुणे :** यंदाच्या उस गाळप हंगामाच्या सुरुवातीला देशात ३५० लाख टन, तर राज्यात ११० लाख टन साखरेचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. मात्र, आता हे एकूण साखरेचे उत्पादन अनुक्रमे ३१५ आणि १०० लाख टन होईल, असे चित्र आहे. राज्यात आतापर्यंत ९८.८७ लाख टन, तर देशात २७१ लाख टन उत्पादन झाले आहे.

राज्यात पुढील १० दिवसांत गाळप हंगाम संपण्याची शक्यता आहे. देशातून यंदा सात ते आठ लाख टन साखर निर्यात, तर ३१ लाख टन साखर इथेन?लकडे वळविली जाणार आहे. देशात यंदा गाळप हंगाम सुरू झाल्यानंतर सुरुवातीला ३५० लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. मात्र, ३१ मार्चअखेर देशात २७१ लाख टन उत्पादन झाले आहे. महाराष्ट्र व उत्तर प्रदेश या सर्वांत मोठ्या साखर उत्पादक राज्यांपैकी महाराष्ट्रात पुढीत ८ ते १० दिवसांत, तर उत्तर प्रदेशातही लवकरच हंगाम संपेल. यंदा गाळपास आलेला उस जवळपास संपला आहे. तर यापुढील गाळपातून साखर उतारा चांगला मिळत नाही. परिणामी उत्पादनात घट होणार आहे. त्यामुळे यापूर्वी ३५० लाख टन उत्पादनाचा अंदाज आता २८३ ते २८५ लाख टनांवर आला आहे. तर अतिरिक्त३१ लाख टन साखर इथेनालकडे



वळविण्यात येणार आहे. महाराष्ट्रात सुरुवातीला ११० लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. यंदा एकूण २१० सहकारी व खासगी कारखान्यांनी गाळप हंगामास सुरुवात केली होती. त्यापैकी १८७ कारखान्यांची धुराडी बंद झाली असून, उर्वरित २३ कारखाने पुढील ८ ते १० दिवसांत बंद होतील अशी स्थिती आहे. आतापर्यंत १ हजार ४३ लाख टन उसाचे गाळप झाले आहे. त्यातून आतापर्यंत ९८ लाख ८७ हजार टन साखर उत्पादन झाले आहे. तर सरासरी साखर उतारा ९.४८ टक्के मिळाला आहे. सर्वाधिक साखर उत्पादन कोल्हापूर विभागात २३ लाख १९ हजार टन त्यानंतर पुणे विभागात २२ लाख १८ हजार टन, तर सोलापूर विभागात १९ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे. राज्यात अंदाजित साखर उत्पादनापेक्षा १० लाख टन उत्पादन कमी होणार आहे. उत्तर प्रदेशातही यंदा १०५ लाख साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. मात्र, नव्या अंदाजानुसार हे उत्पादन ९३ ते ९३ लाख टनांपर्यंतच पोचेल, असे मत राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे कार्यकारी संचालक प्रकाश नाईकनवरे यांनी व्यक्त केले. दरम्यान, यंदा देशात इथेनालसाठी ३५ लाख टन साखर इथेनाल उत्पादनासाठी वळविण्यात येईल, असा अंदाज होता. मात्र, नव्या अंदाजानुसार ३१ लाख टन साखर वापर इथेनालसाठी वापरण्यात येणार आहे. गेल्या साखर निर्यातीवर बंदी होती. यंदा केंद्र सरकारने दिलेल्या परवानगीनुसार सात ते आठ लाख टन साखरेची निर्यात होणार असल्याचे नाईकनवरे यांनी सांगितले.

# माझ्या शांततेला माझा पराभव समजू नका - राघव चड्ढा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राज्यसभेत उपनेतेपदावरून हटवण्यात आल्यानंतर पंजाबमधील राज्यसभा सदस्य राघव चड्ढा यांनी आज प्रथमच आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. पक्ष नेतृत्वाने गुरुवारी



त्यांना पक्षाच्या उपनेतेपदावरून हटवले होते. तसेच राज्यसभा सचिवालयालाही पत्र देउन पक्षाच्या कोट्यातून राघव चड्ढा यांना बोलण्याचा वेळ देउ नये, असे कळवण्यात आले होते. आज, शुक्रवारी सकाळी आपल्या एक्स हँडलवर व्हिडिओ जारी करत राघव चड्ढा म्हणाले, ज्यांनी माझा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला आहे, त्यांना सांगू इच्छितो की माझ्या शांततेला माझा पराभव समजू नका. मी असा दरिया आहे जो योग्य वेळी महापुरात बदलतो. ते पुढे म्हणाले की, मी असे मुद्दे मांडतो जे सहसा संसदेत उपस्थित केले जात नाहीत. पण जनतेचे प्रश्न मांडणे हा काही गुन्हा आहे का? हा प्रश्न मी त्यामुळे विचारत आहे कारण आम आदमी पक्षाने राज्यसभा सचिवालयाला मला संसदेत बोलण्याची संधी देउ नये, असे सांगितले आहे.

राघव चड्ढा पुढे म्हणाले, माझ्या बोलण्यावर बंदी का घालायची? मी जेव्हा बोलतो तेव्हा सामान्य माणसाच्या प्रश्नांवरच बोलतो. जोमॅटो आणि ब्लिंकिटच्या डिलिव्हरी कर्मचा-यांचे प्रश्न, टोलचा मुद्दा, बँकांचे शुल्क, तसेच टेलिकाम कंपन्या वारंवार रिचार्जच्या नावाखाली पैसे कसे घेतात, हे मुद्दे मी सभागृहात मांडले. या सर्व मुद्द्यांमुळे देशातील सामान्य माणसाला फायदा झाला, मग आम आदमी पक्षाचे त्यातून नुकसान कसे झाले? मग मला बोलण्यापासून का रोखले जात आहे? ते म्हणाले, तुम्ही मला अमर्याद प्रेम देता. मी हे मुद्दे मांडतो तेव्हा तुम्ही मला आशीर्वाद आणि पाठिंबा देता. असेच माझा हात धरून ठेवा. शेवटी त्यांनी पुन्हा म्हटले, ज्यांनी माझा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला आहे, त्यांना सांगू इच्छितो की माझ्या शांततेला माझा पराभव समजू नका. मी असा दरिया आहे जो योग्य वेळी महापुरात बदलतो.

# सर्व कर्मचा-यांना २३ एप्रिलला मतदानाच्या दिवशी मिळणार पगारी रज -निवडणूक आयोग

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** निवडणूक आयोगाने २०२६ च्या राज्य विधानसभा निवडणुका आणि पोटनिवडणुकांदरम्यान मतदानाच्या दिवशी सर्व कर्मचा-यांना पगारी रजा देण्याबाबत एक निर्देश जारी केला आहे. आयोगाने स्पष्ट केले आहे की, ही सुविधा रोजंदारी आणि कंत्राटी कामगारांनाही लागू होईल आणि या दिवसासाठी त्यांच्या पगारात कोणतीही कपात केली जाणार नाही.

आयोगाने शुक्रवारी सांगितले की, आसाम, केरळ, पुदुचेरी, गोवा, कर्नाटक, नागालँड आणि त्रिपुरामध्ये ९ एप्रिल रोजी मतदान होईल. तामिळनाडू, गुजरात आणि महाराष्ट्रात २३ एप्रिल रोजी मतदान होईल. पश्चिम बंगालमध्ये दोन टप्प्यांत मतदान




होईल पहिला टप्पा २३ एप्रिल रोजी आणि दुसरा टप्पा २९ एप्रिल रोजी होईल.आयोगाने म्हटले आहे की, लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ च्या कलम १३५बी नुसार, कोणत्याही संस्था, उद्योग किंवा व्यवसायात काम करणारा प्रत्येक मतदार मतदानाच्या दिवशी पगारी रजेसाठी पात्र असेल. या तरतुदीचे उल्लंघन करणा-या कोणत्याही नियोक्त्याला दंड आकारला जाउ शकतो. आयोगाने हे देखील स्पष्ट केले आहे की, आपल्या मतदारसंघाबाहेर काम करणा-या मतदारांनाही मतदानासाठी पगारी रजा मिळण्याचा हक्क असेल, ज्यामुळे त्यांना मुक्तपणे आपला मतदानाचा हक्क बजावता येईल. निवडणूक आयोगाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना या तरतुदींचे काटेकोरपणे पालन सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून सर्व मतदार कोणत्याही अडथळ्याशिवाय आपले मतदान करू शकतील.

# अजिंठा लेणी येथे मधमाश्यांचा पुन्हा हल्ला; 82 पर्यटक जखमी

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :**

जागतिक वारसा स्थळ असलेल्या अजिंठा लेणी परिसरात मधमाश्यांनी पर्यटकांवर भीषण हल्ला चढवला. या घटनेत तब्बल ८२ पर्यटक जखमी झाले असून, गेल्या दोन महिन्यांतील ही सहावी घटना आहे. वारंवार घडणा-या या जीवघेण्या प्रकारामुळे पर्यटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, लेणी क्रमांक १० जवळील पोळ्यातील माश्या अचानक आक्रमक होउन पर्यटकांवर तुटून पडल्या. त्यानंतर लेणी क्रमांक ४, ९ आणि २६ समोरील मधमाश्यांनीही हल्ला केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. जखमींना भारतीय पुरातत्त्व विभागाच्या कार्यालयात प्राथमिक उपचार देउन काहींना खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. सुदैवाने, यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेउन प्रशासनाने तातडीने लेणी क्रमांक २ आणि २० च्या पुढे पर्यटकांना जाण्यास बंदी घातली.लेणी परिसरात सुमारे १३ मधमाश्यांची पोळी असून, ती स्थलांतरित करण्याची मागणी गेल्या दोन महिन्यांपासून होत आहे. मात्र, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने पर्यटकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# मंत्रालयाजवळ भाजपला कार्यालयासाठी जागा; पँथर संतप्त



**मुंबई/प्रतिनिधी-** मुंबईतील मंत्रालयाच्या शेजारीची सुमारे १५ हजार चौरस फूट शासकीय जागा भाजपला भाडेतत्त्वावर देण्याचा शासन निर्णय जाहीर झाला आहे. या निर्णयानुसार १ जानेवारी २०२५ ते १ जानेवारी २०५४ या ३० वर्षांच्या कालावधीसाठी ही जागा देण्यात येणार आहे. या निर्णयावर ऑल इंडिया पँथर सेना संतप्त झाली असून सदर निर्णयाचा निषेध नोंदवला आहे. ऑल इंडिया पँथर सेना संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार म्हणाले की, राज्यात गॅस व इंधन तुटवडा, वाढती महागाई, रोजगाराचा प्रश्न असे अनेक गंभीर मुद्दे असताना सरकारने त्याकडे दुर्लक्ष करून पक्ष कार्यालयासाठी जागा देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे सरकारच्या प्राधान्यक्रमावर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, मंत्रालयाच्या परिसरात पक्ष कार्यालय उभारल्यास प्रशासनावर दबाव निर्माण होण्याची शक्यता असून, सामान्य नागरिकांच्या कामकाजावर त्याचा परिणाम होउ शकतो, अशीही भीती व्यक्त करण्यात आली आहे. हे कार्यालय मंत्रालयाचा पर्याय ठरणार का? असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे. याशिवाय, इतर लहान पक्ष, सामाजिक संघटना व विविध चळवळींना मुंबईत कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून दिली जात नसताना एका पक्षाला एवढी मोठी जागा देणे अन्यायकारक असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच संबंधित निर्णय तात्काळ रद्द करण्याची मागणी ऑल इंडिया पँथर सेनेने केली आहे.-

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अमित शाह यांचे विनम्र अभिवादन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन केले. 'एक्स' वरील एका संदेशात अमित शाह यांनी म्हटले आहे की, भारतीय स्वाभिमानाचे अजरामर प्रतीक आणि राष्ट्रगौरवाचे रक्षक छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मरण करून मी त्यांच्या चरणी नतमस्तक होतो. धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी त्यांनी लोकसंघटन केले आणि हिंदवी स्वराज'ची स्थापना केली. समुद्रावरील



नियंत्रणाचे महत्त्व ओळखून त्यांनी उभारलेले शक्तिशाली आरमार, त्यांच्या अद्वितीय धोरणाचे आणि दूरदर्शी नेतृत्वाचे दर्शन घडवते. एक राजा आपल्या संस्कृतीचे आणि भाषेचे रक्षण करण्यासोबतच लोककल्याणाचे आदर्श कसे उभे करू शकतो, यासाठी त्यांचे जीवन एक उत्तम उदाहरण आहे. त्यांचा अखंड संघर्ष आणि जीवनगाथा देशाला मातृभूमीप्रती समर्पित राहण्याची प्रेरणा कायम देत राहील.

# मुख्य सचिवांनी केली कुंभमेळा विकास कामांची पाहणी

**नाशिक //प्रतिनिधी-**नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणा-या सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त सुरू असलेल्या विविध विकास कामांची राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज दुपारी पाहणी करीत सविस्तर माहिती घेतली.यावेळी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डा. प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, महानगरपालिका आयुक्तमनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्तकरिश्मा नायर, सहायक जिल्हाधिकारी डा. पवन दत्ता, पोलिस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त कमलाकर रणदिवे, महानगरपालिकेचे उपायुक्त प्रदीप चौधरी, शहर अभियंता संजय अग्रवाल आदी उपस्थित होते.मुख्य सचिव . अग्रवाल यांनी द्वारका सर्कल येथील भुयारी मार्ग, तपोवनातील लक्ष्मीनारायण मंदिराजवळ बांधण्यात येणारा समांतर पूल, कपिला संगम, साधुग्राम, गोदावरी नदी काठावर जलसंपदा विभागातर्फे सुरू असलेल्या नवीन घाटांच्या कामांची तसेच नाशिक महानगरपालिकेतर्फे तपोवन, आगरटाकळी, दसक-पंचक येथे सुरू असलेल्या मल जल शुद्धीकरण प्रकल्पांची पाहणी केली. त्यानंतर मुख्य सचिव श्री. अग्रवाल यांनी पांडव लेणीजवळील महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन, खत निर्मिती प्रकल्पांची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी महानगरपालिकेच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाला भेट दिली तर राजुर बहुला येथे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर वीज वितरण कंपनीतर्फे उभारण्यात येणा-या वीज उपकेंद्राचीही मुख्य सचिव श्री. अग्रवाल यांनी पाहणी केली.द्वारका सर्कल येथे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता संदीप पंडागळे यांनी या प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. द्वारका चौकातील पायाभूत सोयीसुविधांचे काम पूर्ण झाल्यावर वाहतुकीचे नियोजन कसे राहील याविषयीची माहिती मुख्य सचिव श्री. अग्रवाल यांनी जाणून घेतली.महानगरपालिका आयुक्त श्रीमती खत्री, अतिरिक्त आयुक्त श्रीमती नायर, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता राजेश गोवर्धने, कार्यकारी अभियंता सोनल शहाणे यांनी तपोवन परिसरात कुंभमेळ्यानिमित्त आपापल्या विभागातर्फे सुरू असलेल्या विकास कामांची सविस्तर माहिती दिली.

मुख्य सचिव श्री. अग्रवाल म्हणाले की, नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणा-या कुंभमेळ्यासाठी देश- विदेशातून मोठ्या संख्येने भाविक येतील. या भाविकांसाठी आवश्यक पायाभूत सोयीसुविधा निर्मिती शासनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. कुंभमेळ्यानिमित्त सुरू झालेली कामे वेळेत पूर्ण होतील याची दक्षता संबंधित विभागांनी घ्यावयाची आहे. याबरोबरच ही सर्व कामे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण होतील याचीही दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त डा. गेडाम यांनी सांगितले की, पुढील वर्षी होणा-या सिंहस्थ कुंभमेळ्याचे सर्वतोपरी नियोजन करण्यात आले आहे.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## तृणमूल विरुद्ध भाजप

तृणमूल काँग्रेसच्या दहशतीतून पश्चिम बंगालला मुक्त करण्यासाठी आणि बांगला देशी मुसलमानांची घुसखोरी रोखण्यासाठी वाट्टेल ते करून ममता व त्यांच्या पक्षाला सत्तेवरून हटविण्याचा भाजपने यावेळी चंग बांधला आहे.अमित शहा यांच्या नुकत्याच झालेल्या पश्चिम बंगालमधील प्रचार दौऱ्याने ममता बॅनर्जी अक्षरशः चेकाळल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत तृणमूल विरुद्ध भाजप अशी थेट लढत आहेच, पण अमित शहा विरुद्ध ममता असा राजकीय संघर्ष टोकाला पोहोचला आहे.पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची धग दिवसेंदिवस वाढत असून भाजपने आपल्या रणनीतीने तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना चोहोबाजूने घेरायला सुरुवात केली आहे. ममता गेली पंधरा वर्षे मुख्यमंत्री आहेत. त्यांच्या पक्षाने राज्यात निर्माण केलेली गुंडगिरी व दहशत शिगेला पोहोचली आहे. तृणमूल काँग्रेससमोर दुसरा राजकीय पक्ष उभा राहता कामा नये व दुसऱ्या पक्षाचे कार्यकर्ते आपल्या विरोधात रस्त्यावर उतरता कामा नयेत, असे भयग्रस्त वातावरण गेली पंधरा वर्षे पश्चिम बंगालमध्ये आहे. रामनवमीची मिरवणूक असो किंवा दुर्गा पूजा उत्सव अशा हिंदू सणांवर राज्यात कमालीचे निर्बंध असतात. मुस्लिमांचा अनुनय करण्यात ममता यांचा दुसरा कोणी हात धरू शकणार नाही.पंतप्रधान नरेंद्र मोदींचे केंद्रात सरकार आल्यापासून ममता यांना कोणी तरी जाब विचारणारा नेता भेटला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्याला वारंवार भेटी देऊन आणि आपल्या कार्यकर्त्यांना दिलासा देऊन पक्षाची संघटना गेल्या दहा वर्षांत भक्कम पायावर उभी केली आहे. ममता यांनी पंधरा वर्षांपूर्वी डाव्या पक्षांचा गड उद्ध्वस्त केला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला सत्तेवरून हटविण्याचा पराक्रम करून दाखवला, पण ममता यांची राजवट हुकूमशहा पद्धतीने चालली आहे. पूर्वी मार्क्सवादी व तृणमूल काँग्रेस यांच्यात सतत रक्तरंजित हिंसाचार होत असे. आता तृणमूलचे कार्यकर्ते भाजपला दहशत दाखवून रोखण्याचा प्रयत्न करीत असतात. गेल्या दहा वर्षांत तृणमूल काँग्रेसचे अनेक मोठे नेते ममता यांच्या मनमानीला कंटाळून भाजपमध्ये आले. त्यांना भाजपने सन्मानाने पक्षात घेतले व भयमुक्त केले. आता हेच नेते भाजपचा झेंडा हातात घेऊन ममतांच्या विरोधात हल्लाबोल करताना दिसत आहेत.

अमित शहा यांनी निवडणूक प्रचारात ममता सरकारविरोधात कोलकाता येथे एक आरोपपत्रच सादर केले. तृणमूल काँग्रेसच्या १५ वर्षांच्या कारकिर्दीचा पंचनामाच या आरोपपत्रात आहे. प्रत्येक निवडणुकीत ममता या व्हिक्टीम कार्ड खेळतात व लोकांची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करतात, असा आरोप शहा यांनी केला. कधी त्या डोक्याला पट्टी बांधतात, कधी पाय मोडला म्हणून व्हीलचेअरवरून प्रचाराला येतात, कधी आजारी पडतात, निवडणूक आयोगाला शिव्यांची लाखोली वाहतात, पण त्यांचे खरे स्वरूप जनतेने आता ओळखले आहे. भाजपशी टक्कर देताना आपली सत्ता टिकविण्यासाठी ममता यांना अक्षरशः आटापिटा करावा लागतो आहे.ममता यांनी त्यांच्या धोरणामुळे बंगालचे शोषण केले आहे, देशाच्या सुरक्षिततेच्या मुद्द्यावर त्या धोक्याचा खेळ खेळत आहेत आणि राज्यात गुन्हेगारी, गुंडगिरी, दहशत व बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. या तीन मुद्द्यांवरून शहा यांनी ममतांवर हल्लाबोल केला आहे. आसाममध्ये भाजपचे सरकार आल्यापासून घुसखोरी थांबली आहे. बंगालमधील घुसखोरीमुळे देशाच्या सुरक्षिततेलाच धोका निर्माण झाला आहे. बंगालमध्ये प्रशासनात भ्रष्टाचार प्रचंड बोकाळला आहे, गुन्हेगारांच्या टोळ्या खुलेआम सामान्य जनतेला त्रास देताना दिसत आहेत. बंगालमधील सामान्य जनतेला स्वतःचा प्राण गमावण्याची अहोरात्र भीती वाटत असते, आपली मालमत्ता कोणी तरी हिसकावून घेईल, असे भय कायम असते आणि आपले स्वातंत्र्य दबावाखाली आहे, अशा दबावाच्या वातावरणात लोक जगत आहेत. आज आपल्याला उपजीविकेचे साधन आहे, ते उद्या असेल की नाही, याची शाश्वती सर्वसामान्य बंगाली नागरिकाला नाही, अशी परिस्थिती या राज्यात आहे.ममता बॅनर्जी यांनीही भाजपवर आरोपपत्र घोषित केले आहे. भाजपचे लोक पश्चिम बंगालमध्ये दंगली व हिंसाचार घडवतात, असा त्यांनी आरोप केला आहे. भाजपमुळेच बंगालमधील वातावरण दूषित झाले आहे व हिंदू- मुस्लिम तेढ निर्माण होते आहे. राज्यात सर्व बंगाली भाषिक गुण्यागोविंदाने राहत होते, पण भाजपने त्यांच्यात भेदभाव करून आणि जातीय राजकारण खेळून राज्यातील वातावरण बिघडवले, असा आरोप ममता यांनी केला आहे. आमच्या पक्षाचे कार्यकर्तेही रामनवमी साजरी करतात, मिरवणुका काढतात; पण भाजपने त्या दिवशी दंगली घडवून उत्सवाला गालबोट लावले, असा आरोप ममता यांनी केला आहे. राज्यात निवडणुका जाहीर झाल्यानंतर निवडणूक आयोगाने मुख्य सचिव, गृहसचिव, पोलिस आयुक्तांपासून शंभराहून जास्त वरिष्ठ व उच्च पदांवरील अधिकाऱ्यांना बदलले व स्वतःच्या मर्जीतील अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. निवडणूक आयोगाने एवढ्या मोठ्या प्रमाणावर अधिकाऱ्यांच्या बदल्या यापूर्वी कधीच केल्या नव्हत्या.मोदी सरकार निवडणूक आयोगाच्या मदतीने त्यांनी नेमलेल्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून निवडणूक लढवत आहे, असा आरोप ममता प्रत्येक प्रचार सभेत करीत आहेत. तृणमूल काँग्रेसचे महिला मेळावेसुद्धा भाजपचे लोक दंगली घडवून उधळून लावत आहेत व पोलिस त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत, असा प्रचार तृणमूल काँग्रेस करीत आहे. निवडणूक आयोगाने मर्जीतील अधिकारी नेमून व स्वतःची यंत्रणा उभी करून आपले मुख्यमंत्री म्हणून घटनेने दिलेले अधिकारही काढून घेतले आहेत. केंद्रातून व बाहेरील राज्यातून भाजपचे नेते येथे येतात व लोकांना आमच्या विरोधात भडकविण्याचे काम करतात, असा दावा ममता यांनी केला आहे. प्रचार करताना एक लक्ष्मणरेषा असावी, पण भाजपने ती कधीच ओलांडली आहे. मतदार याद्यातील वगळलेले लाखो मतदार हेच भाजपसाठी धोकादायक ठरू शकतात, असा इशारा ममता यांनी दिला आहे.

# ट्रम्प यांना फाजील आत्मविश्वास नडला!

**ट्रम्प यांच्या चुकीच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी अमेरिकेतील लाखो लोक रस्त्यावर उतरल्याने ट्रम्प हे सैरभैर झाले आहेत.येत्या काही महिन्यांत अमेरिकेत मध्यावधी निवडणुका होणार असून ट्रम्प यांच्या चुकीच्या धोरणांचा फटका त्यांच्या पक्षाला बसणार,हे गृहित धरण्यात आले आहे.**



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा पाय इराण विरुद्धच्या युद्धात दिवसेंदिवस गुंतत चालला आहे.त्या गुंत्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न त्यांनी कसोशीने चालवला असला तरी, त्यातून बाहेर पडण्याऐवजी ते त्यात आणखी गुरफटत चालले आहेत.त्यांच्या बोलण्याला काही तालतंत्र राहिलेले नाही.इराण विरुद्धच्या युद्धासंबंधी ते सकाळी एक बोलतात, दुपारी एक बोलतात आणि संध्याकाळी वेगळेच काही बोलतात.एकंदरित त्यांच्या मनात प्रचंड चलबिचल चालू असल्याचे दिसून येत आहे.आता होर्मुझच्या सामुद्रधुनीचा विषय घेऊया.अगोदर ते सांगत होते की, काही झाले तरी होर्मुझची सामुद्रधुनी इराणला ओपन करावीच लागेल.त्यांनी आपल्या दोस्त राष्ट्रांना आवाहन देखील केले होते की तुम्ही त्याकरता अमेरिकेला मदत करा.परंतु दोस्त राष्ट्रांनी त्याला नकार दिल्यानंतर ते आता सांगत आहेत की, आम्हाला त्याची गरज नाही.आम्ही तेल आणि गॅसच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहोत.एवढेच नव्हे तर ते असेही म्हणाले की, इराण विरुद्धचे युद्ध संपल्यावर, होर्मुझची सामुद्रधुनी आपसूकपणे ओपन होईलच.याचाच अर्थ ट्रम्प यांनी त्या बाबतीत माघार घेतलेली दिसत आहे.नाटो (नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन ) मधील सदस्य देशांनी इराण विरूद्धच्या युद्धात अमेरिकेची साथ न दिल्याने, ट्रंप हे त्यांच्यावर संतापले आहेत.त्यांनी त्यांची 'पेपर टायगर' अशी संभावना केली आहे.इतकेच नव्हे तर नाटो मधुन बाहेर पडण्याची धमकी त्यांनी दिली आहे.

ट्रम्प यांनी इराण विरुद्ध युद्ध सुरू झाल्यानंतर प्रथमच देशातील जनतेला उद्देशून केलेल्या भाषणात सांगितले की,महिनाभर सुरू असलेल्या इराण विरुद्धच्या युद्धात अमेरिकेला यश मिळाले असून ते संपण्याच्या मार्गावर आहे.अमेरिकेचे उद्दिष्ट साध्य झाले आहे,असे ट्रम्प यांनी जाहीर केले असले तरी युध्दाचा शेवट ते कसा करणार आहेत. याबाबत त्यामध्ये पुरेशी स्पष्टता दिसून आलेली नाही.इराणकडून अमेरिकेला आणि जगाला असलेला धोका आपण नष्ट केल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या १९ मिनिटांच्या भाषणात ट्रम्प यांनी अमेरिकेला आर्थिकदृष्ट्या जी झळ सोसावी लागत असा उल्लेख केला.जे देश होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अवलंबून आहेत.त्यांनी तो तिढा सोडवावा आणि त्याचा वापर करावा असे आवाहन त्यांनी त्या देशांना केले.थोडक्यात अमेरिका त्या बाबतीत त्यांना मदत करणार नाही,असे ट्रम्प यांनी सूचित केले.

इराणच्या नौदलाचे आणि हवाई दलाचे युध्दात प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून तो देश आता कमकुवत झाल्याचा दावा त्यांनी केला.एकीकडे आमच्या इराण बरोबर वाटाघाटी सुरू असल्याचे नमूद करताना, दुसरीकडे, इराणवरील प्रखर हल्ले आम्ही चालूच ठेवू, असे त्यांनी आवर्जून सांगितले.आम्ही इराणला अश्म युगात नेऊन ठेवू अशी धमकीही ट्रम्प यांनी दिली.ट्रम्प यांच्या भाषणाअगोदर इराणचे अध्यक्ष पेझेश्कियान यांनी अमेरिकन जनतेला उद्देशून असे विधान केले होते की इराण विरुद्धच्या युद्धामुळे,अमेरिकन जनतेचे नक्की काय भले झाले आहे? इराणकडून अमेरिकेला नक्की कोणता धोका होता? अमेरिका आणि इस्त्रायल यांनी संयुक्तपणे इराणवर केलेल्या हल्ल्यात शेकडो निरपराध माणसे मारली गेली आहेत.हजारो इमारती उद्ध्वस्त झाल्या आहेत.आधीच डळमळीत झालेली इराणची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे.तरी सुध्दा इराणने हार मानलेली नाही.कारण इराणकडे आता गमावण्यासारखे काहीही राहिलेले नाही.होर्मुझची सामुद्रधुनी बंद करून इराणने अमेरिकेचे नाक दाबलेले आहेच शिवाय आखाती देशांतील अमेरिकेच्या लष्करी तळांवर मिसाईल्स आणि ड्रोनच्या सहाय्याने प्रखर हल्ले केले. इराणने अमेरिकेला जेरीस आणले आहे.अशाप्रकारे अमेरिकेवर सर्व बाजूंनी दबाव आणून, इराणने एकप्रकारे अमेरिकेची मोठ्या प्रमाणात कोंडी केली आहे.तेल आणि गॅस यांच्या तुटवड्यामुळे संपूर्ण जग संकटात सापडले असून,त्याकरता अमेरिका म्हणजेच पर्यायाने ट्रम्प यांना दोषी ठरवले जात आहे.त्यामुळे ट्रम्प हे प्रचंड दबावाखाली आहेत.त्यात पुन्हा ट्रम्प यांच्या चुकीच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी अमेरिकेतील लाखो लोक रस्त्यावर उतरल्याने ट्रम्प हे सैरभैर झाले आहेत.येत्या काही महिन्यांत अमेरिकेत मध्यावधी निवडणुका होणार असून ट्रम्प यांच्या चुकीच्या धोरणांचा फटका त्यांच्या पक्षाला बसणार,हे गृहित धरण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर युध्दाच्या गुंत्यातून लवकरात लवकर बाहेर पडण्याचा प्रयत्न ट्रम्प यांच्याकडून केला जात आहे.मात्र ही गोष्ट वाटते तेवढी सोपी नाही,याचा अंदाज ट्रम्पयांना आला असणारच.इराण बरोबर युद्धबंदी करता वाटाघाटी सुरू आहेत,असे जरी सांगत असले तरी,या वाटाघाटी इराणच्या कोणत्या नेत्याबरोबर सुरु आहेत,या बाबतीत त्यांनी मौन बाळगले आहे.इराणकडून तर असे सांगितले जात आहे की अशा प्रकारच्या कोणत्याही वाटाघाटी सुरू नाहीत.इराणने त्याच्या समोर ठेवलेल्या पंधरा अटी फेटाळून लावल्या आहेत.उलट युद्ध संपवण्यासाठी इराणने काही अटी पुढे केल्या असून,या युद्धात इराणचे जे नुकसान झाले ते अमेरिकेने भरून द्यावे,अशी प्रमुख अट इराणने घातली आहे.

इस्त्रायलच्या नादी लागून, अमेरिकेला इराण विरुद्धच्या युद्धात उतरविण्याचा चुकीचा निर्णय ट्रम्प यांनी घेतला,त्याची फार मोठी किंमत अमेरिकेला मोजावी लागणार आहे.आता त्यातून बाहेर पडण्याची धडपड ट्रम्प यांच्याकडून सुरू आहे.परंतु त्यामध्ये त्यांना सहजासहजी यश मिळण्याची शक्यता दिसत नाही.इराण विरूध्दच्या युद्धात पहिल्याच दिवशी अमेरिका आणि इस्त्रायलला मोठे यश मिळाल्याने,हे युद्ध एक दोन आठवड्यात आपण संपवू असा फाजील आत्मविश्वास ट्रम्प यांनी बाळगला होता.मात्र इराणने जो कणखरपणा दाखवला, त्यामुळे ट्रम्प हे बॅकफूटवर आले असून,हे युद्ध लवकरात लवकर संपवण्यासाठी त्यांचे निकराचे प्रयत्न सुरू आहेत.

**अभय गोखले**

# डिजिटल गणनेचा श्रीगणेशा

**डिजिटल जनगणना केवळ भारतातच होत नसून, जगातील अनेक देशांनी यापूर्वीच ही पद्धत स्वीकारली. तथापि, भारताची सध्याची २०२७ ची जनगणना ही सर्वात मोठी डिजिटल जनगणना मानली जाते, कारण ती १.४ अब्जाहून अधिक लोकसंख्येची मोजणी होणार आहे.**




भारताच्या पहिल्या डिजिटल जनगणनेचा श्रीगणेशा १ एप्रिल २०२६ ला झाला. ही देशाच्या इतिहासातील १६वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८वी जनगणना. ती आधीपेक्षा वेगळी, नागरिकांच्या दृष्टीने स्वयंस्फूर्त व महत्त्वाची म्हणजे डिजिटल आहे. याआधी २०११ मध्ये झालेल्या जनगणनेनंतर सुमारे १५ वर्षांनंतर सुरू झालेली ही जनगणना प्रगत तांत्रिक साधनांमुळे ही प्रक्रिया अधिक सुरक्षित आणि वेगवान होणार आहे. १० वर्षांनंतर पुन्हा जनगणना अपेक्षित होती. ती २०२१ मध्ये सुरू होणार होती; परंतु कोविड महामारीमुळे ती पुढे ढकलण्यात आली. जुन्या पारंपरिक पद्धतीने जनगणना न करता संपूर्णपणे आधुनिक आणि 'कागदमुक्त' (पेपरलेस) जनगणना होत असून या प्रक्रियेत देशातील सुमारे ३४ लाख कर्मचारी सहभागी झालेत. डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आपल्या माहितीचा गैरवापर होण्याची भीती आहे. म्हणूनच सरकारने जनगणनेचा पहिला टप्पा सुरू होण्यापूर्वीच या माहितीचा गैरवापर होणार नाही, ती विकली जाणार नाही, अशी हमी देशवासीयांना दिली. सर्वाधिक महत्त्वाचे म्हणजे, ही जनगणना लोकसभेच्या भविष्याचा राजकीय नकाशा ठरणार आहे. जनगणनेत डेटा गोपनीयतेच्या नवीन नियमांवर सर्वाधिक देण्यात आला आहे. या जनगणनेची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे, नागरिकांना आता एका विशेष वेब पोर्टलद्वारे किंवा मोबाईल ॲपद्वारे त्यांची माहिती स्वतः ऑनलाइन भरण्याची सोय ठेवण्यात आली. यामुळे प्रगणक घरी येण्यापूर्वीच लोक आपली माहिती नोंदवू शकतात. पहिल्या टप्प्यांमध्ये घरांची यादी आणि गृहनिर्माणविषयक माहिती गोळा केली जाणार. स्व-नोंदणी करताना पोर्टलवर ३३ प्रश्नविचारले. ही जनगणना दिल्लीसह अंदमान-निकोबार, गोवा, कर्नाटक, लक्षद्वीप, मिझोराम, ओडिशा आणि सिक्कीम या राज्यांमध्ये पहिल्या टप्प्यात सुरू झाली असून तिथल्या नागरिकांना माहिती भरण्याचे पर्याय खुले करण्यात आले. भारताच्या जनगणनेच्या इतिहासात प्रथमच सुरू झालेल्या स्वयंगणनेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पोर्टलवर आपली माहिती भरली. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि गृहमंत्री अमित शहा यांनीही स्वतः ऑनलाइन जनगणना अर्ज भरला. त्यातून सर्वसामान्य नागरिकांना या प्रक्रियेत सहभाग होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

डिजिटल जनगणना केवळ भारतातच होत नसून यापूर्वी जगातील अनेक देशांनी ही पद्धत स्वीकारली. अनेक प्रगत आणि विकसनशील देशांनी डिजिटल किंवा 'हायब्रीड' पद्धतीने जनगणना केली जाते. अमेरिका, युनायटेड किंग्डम (यूके) या देशांनीसुद्धा आधीच डिजिटल जनगणना प्रणाली अवलंबली. दक्षिण आशियाई देशांमध्ये बांगलादेशने २०२२ मध्ये पहिली डिजिटल जनगणना केली होती, तर पाकिस्ताननेही या दिशेने पावले उचलली. एवढेच नव्हे तर घाना, केनिया, चिली, रोमानिया, मालदीव, बार्बाडोस यांसारख्या छोट्या देशांनीही डिजिटल साधनांचा वापर करून जनगणना यशस्वीरीत्या पूर्ण केली. तथापि, भारताची सध्याची २०२७ ची जनगणना ही जगातील सर्वात मोठी डिजिटल जनगणना मानली जाते. त्याचे कारणही तसेच आहे. सुमारे १४० कोटींहून अधिक लोकसंख्येची जनगणना या प्रक्रियेतून होणार असल्याने, ही एक क्रांती म्हणता येईल. डिजिटल असल्यामुळे या जनगणनेचा डेटा केवळ ८-९ महिन्यांत उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. याआधी झालेल्या जनगणनेच्या प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी १८-२४ महिने लागत होते, ही वाव दुर्लक्षित करून चालणार नाही. डिजिटल पद्धतीमुळे माहितीचे संकलन आणि विश्लेषण वेगाने होणार आहे. ज्यामुळे जनगणनेचे निष्कर्ष लवकर जाहीर करणे शक्य होईल. माहिती संकलनासाठी कागदाऐवजी ३४ लाख कर्मचारी मोबाईल ॲपचा वापर करणार आहेत. यामुळे कागदाचा वापर वाचणार आहे. डिजिटल डेटा थेट सर्व्हरवर अपलोड केला जाणार असल्याने मानवी चुका कमी होतील असा दावा करण्यात येत आहे.

दुसऱ्या टप्याला फेब्रुवारी २०२७ मध्ये सुरुवात होणार आहे. तेव्हा प्रत्यक्ष लोकसंख्या मोजणी आणि वैयक्तिक तपशील नोंदवले जाणार आहे. 'जनगणना अधिनियम, १९४८' अंतर्गत गोपनीयतेची हमी असून, सर्व वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवली जाईल. डेटाची पडताळणी आणि प्रक्रिया अधिक अचूक आणि जलद गतीने होईल. जनगणनेसाठी 'डिजिटल ले-आउट मॅपिंग' वापरले जाणार असल्याने नियोजनात अचूकता येईल आणि कोणतीही वस्ती किंवा घर सुटणार नाही. १९३१ नंतर पहिल्यांदाच या जनगणनेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्यासोबतच इतर जातींचीही माहिती माहिती गोळा केली जाण्याची शक्यता आहे. त्यासाठीचे मोबाईल ॲप इंग्रजीसह १६ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असेल, ज्यामुळे देशभरातील लोकांना माहिती भरणे सोपे जाईल. जनगणना पूर्णपणे सुरक्षित आणि पारदर्शक होईल, असा दावा केंद्र सरकारने केला. २०११ च्या जनगणनेनंतर प्रदीर्घ काळानंतर सुरू झालेली ही प्रक्रिया देशाच्या भविष्यातील नियोजन आणि धोरण आखणीसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या डिजिटल जनगणनेकडे केवळ लोकसंख्येची मोजणी या दृष्टीने न पाहता देशाच्या विकासाचे नियोजन, कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी आणि धोरण निर्मितीसाठी अचूक डेटा उपलब्ध करून देणारे साधन म्हणून पाहिले जात आहे. या प्रक्रियेमुळे भारताने 'डिजिटल इंडिया'च्या दिशेने आणखी एक भक्कम पाऊल टाकले. हे देशाच्या इतिहासात प्रशासकीय सुधारणेच्या दिशेने क्रांतिकारी पाऊल मानले जात आहे.


# संवाद

## ७१ लाख लाडक्या बहिणी अपात्र

गेले सुमारे २० महिने लाडकी बहीण योजना सुरु आहे. लाडक्या बहिणींच्या खात्यात रुपये १५०० दरमहा जमा होत आहेत. या योजनेमुळे महायुतीचे सरकार सत्तेवर येऊ शकले होते. या योजनेच्या ज्या अटी होत्या त्यामध्ये कुटुंबातील कोणीही सरकारी नोकरीत नसणे,तसेच कुटुंबात चार चाकी वाहन नसणे ह्या होत्या.तथापि अनेक लाडक्या बहिणींनी हे सारे असतानाही अर्ज केले व गेले अनेक महिने पैसेही घेतले. या योजनेत अनेक अपात्र महिलांनी लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यानंतर पात्र महिलांची खात्री करण्यासाठी इ केवायसी बंधनकारक केली होती. सरकारने केलेल्या पडताळणीत सरकारचे दरमहा १०६५ कोटी रुपये वाचणार आहेत. एप्रिल २०२६ पासून या अपात्र महिलांना दरमहा मिळणारे १५०० रुपये बंद केले जाणार आहेत ही बातमी नुकतीच वाचण्यात आली.या अगोदर सुद्धा अनेक पुरुष कर्मचाऱ्यांनी तसेच नोकरी करणाऱ्या महिलांनी अर्ज करून दरमहा १५०० रुपये मिळविले होते सरकारने याची पडताळणी केल्यानंतर ही गोष्ट लक्षात आली होती. वास्तविक ही योजना सुरु करताना सर्व अटी चेक करावयास हव्या होत्या. त्या व्यवस्थित चेक झाल्या नाहीत. अपात्र महिलांना गेल्या सुमारे २० महिने मानधन दिले गेले.हे प्रश्न आता विरोधकांकडून विचारले जाण्याची शक्यता आहे.

**शांताराम वाघ**

## भारतीय उद्योजकतेतील झंझावती पर्व



भारतीय उद्योगजगतातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व, भारतीय कापड उद्योगाला जागतिक पातळीवर नवी ओळख देणारे पद्मभूषण पुरस्कारप्राप्त आणि रेमंड या जागतिक ब्रँडचे शिल्पकार, आकाशाला गवसणी घालणारे साहसी वैमानिक डॉ. विजयपत सिंघानिया यांचे वयाच्या ८७ व्या.वर्षी नुकतच निधन झाले.'द कंप्लीट मॅन' ही टॅगलाईन केवळ त्यांच्या ब्रँडची ओळख नव्हती तर ती त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब होता. त्यांच्या जाण्याने भारतीय उद्योजकतेच्या इतिहासातील एक झंझावाती आणि संघर्षाने भरलेले प्रकरण संपुष्टात आले आहे. विजयपत सिंघानिया यांचा प्रवास केवळ तागा आणि सुटाच्या कापडापुरता मर्यादित नव्हता. १९८० दशकात जेव्हा त्यांनी रेमंडची धुरा हाती घेतली तेव्हा त्यांनी केवळ कापड विकले नाही तर भारतीय पुरुषाला एक नवी ओळख दिली. पुरुषाने कणखर असावेच, पण त्याने हळवे, प्रेमळ, आणि कौटुंबिक असावे हा 'द कंप्लीट मॅन' चा विचार त्यांनी जाहिरातींच्या माध्यमातून घराघरांत पोहोचवला. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच ठाण्यातील एक साधी गिरणी आज जगातील सर्वात मोठ्या सुट निर्मिती केंद्रापैकी एक बनली. डॉ. विजयपत सिंघानिया यांची खरी ओळख साहसी वैमानिक म्हणून देखील होती त्यांच्या कार्याची स्मृती आणि त्यांनी घेतलेली साहसी झेप येणाऱ्या पिढ्यांसाठी नेहमीचं प्रेरणादायी ठरेल.

**राजू जाधव**

## बँक पोर्टेबिलिटीमुळे ग्राहकांना फायदा

भारताच्या बँकिंग प्रणालीमध्ये लवकरच मोठी ग्राहक केंद्रित सुधारणा होणार असून भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) या अनुषंगाने 'पेमेंट्स व्हिजन २०२८'अंतर्गत एका प्रणालीवर काम करत आहे. या प्रणालीनुसार बँक ग्राहक लवकरच मोबाईल नंबर पोर्टेबिलिटीप्रमाणेच आपले बँक खाते दुसऱ्या बँकेत पोर्ट करू शकतील. म्हणजेच, दुसऱ्या बँकेत जाताना आपला जुना खाते क्रमांक ग्राहकाला कायम ठेवता येणार आहे. बँक पोर्टेबिलिटीची ही संपूर्ण प्रक्रिया सुलभ होण्यासाठी 'पेमेंट स्विचिंग सर्व्हिस' (पीएएसएस) नावाची एक विशेष प्रणाली विकसित केली जात आहे. ग्राहकाने बँक बदलताच ही प्रणाली त्याचे सर्व पेमेंट आपोआप नवीन बँकेत हस्तांतरित करेल. यामुळे ग्राहकाला वारंवार फॉर्म भरण्याची किंवा माहिती अद्ययावत करण्याची गरज नाही.

**प्रदीप मोरे**

# ‘त्या’ अधिकाऱ्याने कार्यकर्त्यावर बंदुक रोखली!

■ जनमाध्यम प्रतिनिधी

**उमरखेड :** पैनगंगा नदी तीरावरील दिघी रेतीघाट येथे दि. ३० मार्च रोजी झालेल्या घटनेबाबत चुकीची माहिती प्रसारित झालेली असून याबाबत वस्तुस्थितीनुसार नांदेड हद्दीत येऊन लोहकरे नामक पोलीस अधिकाऱ्याने नियमानुसार रेती उत्खनन करणाऱ्या मजूरांवर अनाधिकाराने अर्धा तास बंदूक रोखल्याचे कळताच तेथे पोहचून त्यांना जाब विचारला असता अरेरावीची भाषा करून त्यांनीच गोळी घालण्याची भाषा केली याबाबत उपविभागिय अधिकारी व एलसीबी पीआय यांना विचारणा केली असता त्यांनी आमचा कुठलाही कर्मचारी तेथे आम्ही पाठविला नसल्याचे सांगीतले वृत्तपत्रांना कोणीतरी चुकीची माहिती दिली असल्याचे सांगून कार्यकर्त्यावर अन्याय होत असतांना जाब विचारणे हे माझे कर्तव्य असून माझ्या कार्यकर्त्यावर झालेला अन्याय कदापिही सहन करणार नाही असा सज्जड इशारा खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे सुपुत्र कृष्णा पाटील यांनी आज दि २ एप्रील रोजी स्थानिक विश्रामगृहावर आयोजित पत्रकार परिषदेत दिला.

यावेळी पत्रकार परिषदेत बोलतांना कृष्णा पाटील आष्टीकर म्हणाले की, दि.३० जानेवारी रोजी नांदेड जिल्ह्यातील दिघी पैनगंगा रेती घाटातून काही मजूर अधिकृतरित्या रेतीचे उत्खनन करीत असताना सायंकाळी ४ वाजताचे दरम्यान लोहकरे नामक व्यक्ती एलसीबी पोलीस अधिकारी असल्याचे सांगून तेथे आला असल्याचे सांगून

## कृष्णा पाटील आष्टीकर यांची स्पष्टोक्ती



नियमानुसार रितसर रेतीचे काम करणाऱ्या व्यक्तींवर नांदेड हद्दीत दिघी शिवारात येऊन कार्यवाही करण्याचा कोणताही अधिकार नसतांना त्यांची वाहने थांबवून त्यांच्याकडून पैसे उकळण्याच्या उद्देशाने धाकदपटशा करीत

कृष्णा पाटील दिघी यांचे कपाळावर बंदुक रोखली असल्याची कार्यकर्त्यानि फोनवर माहिती मिळाली त्यामुळे आपण तत्काळ तेथे पोहोचलो असता तुम्ही बंदुक कशी काय रोखली असा जाब विचारला असता त्यांनी त्यांची पत्नी हदगाव येथे जज असल्याचे सांगून माझ्यासोबत अरेरावीची भाषा वापरली असल्याचा आरोप केला.

यावेळी तेथे आम्हाला बदनाम करण्यासाठी वेगळ्या उद्देशाने दुरुन व्हिडीओ चित्रण करणाऱ्याला विचारणा केली असता त्याने स्वतःच स्वतःचा मोबाईल फोडला व त्याने माझ्या गाडीच्या काचा फोडल्या या बाबत आपण हिमायतनगर पोलीस स्टेशनला तक्रार केली असल्याचेही पत्रपरिषदेत सांगण्यात आले. तसेच याबाबत आपण स्वतः उमरखेड उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंतराव गायकवाड व यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतिश चौरे यांना कृष्णा पाटील यांनी भ्रमणध्वनीद्वारे विचारणा केली असता आमचा कोणताही अधिकारी अथवा पथक आम्ही रेतीघाटावर पाठविले नसल्याचे सांगितले त्यांनी सांगीतले व ६ वाजताच्या आधी पोलीसांना रेती घाटावर कार्यवाही करण्याचा कुठलाही अधिकार नसल्याचे सांगून कार्यकर्त्यांवर बंदुक रोखून अन्याय करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना जाब विचारणे चुकीचे नसून कार्यकर्त्यावरील अन्याय खपवून घेतला जाणार नसल्याचे ठणकावून त्यांनी आपण त्यांचेविरुद्ध सल्ला मसलती नंतर कायदेशिर कार्यवाही करणार असून कार्यकर्त्यावर असल्याचे कृष्णा पाटील आष्टीकर यांनी पत्रपरिषदेत सांगीतले यावेळी त्यांचे समवेत उबाठाचे उपजिल्हा प्रमुख ॲड. बळीराम मुटकुळे, डॉ अजय नरवाडे, नितीन शिंदे आदिंची उपस्थिती होती.

---

चार आरोपी लोहारा पोलिसांच्या जाळ्यात

# २२ लाखांच्या जबरी चोरीचा पर्दाफाश!



■ जनमाध्यम प्रतिनिधी

**यवतमाळ :** एमआयडीसी लोहारा येथील शासकीय गोडावूनसमोर झालेल्या तब्बल २२ लाख रुपयांच्या जबरी चोरीचा लोहारा पोलिसांनी पर्दाफाश करत चार आरोपींना अटक केली आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारीवर प्रभावी आळा बसण्यास मदत होणार आहे.

दि. २६ मार्च २०२६ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास ट्रक चालक शुभम सतीश मोरे (वय १९, रा. कवठळ, ता. मंगरुळ पीर, जि. वाशीम) हा ट्रक क्रमांक चक३४-इन-२७१४ जवळ उपस्थित असताना दोन अनोळखी इसमांनी त्याच्या गळ्यावर चाकू ठेवून हातपाय, तोंड व डोळे बांधले. त्यानंतर ट्रकसह त्यामधील २५० क्विंटल तुरीचे ५०० पोते असा एकूण २२ लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला. याप्रकरणी प्रमोद भाऊराव नवरंगे (रा. पांढरकवडा) यांच्या तक्रारीवरून लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तांत्रिक तपास करत कारंजा (जि. वाशीम) येथे सापळा रचून कलीमोद्दीन ख्वाजा मिराज उद्दीन (२६), मोहम्मद अक्रम बाळापुरे (३५), सलीमोद्दीन कलीमोद्दीन (३९) व इम्राण हसन (२५) या आरोपींना ताब्यात घेतले. कसून चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर कारंजा, मुर्तीजापूर व दर्यापूर परिसरातून २३४ क्विंटल तुरीचे पोते, किंमत सुमारे २०.५९ लाख रुपये, असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.दि. ३ एप्रिल रोजी चारही आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित चौधरी व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

---

# ३३ वर्षीय युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

■ जनमाध्यम प्रतिनिधी



**दिग्रस :** तालुक्यातील धानोरा (बु.) शेत शिवारात गजानन दूर्शेटवार यांच्या शेतात एका ३३ वर्षीय युवकाने झाडाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

अनिल रामकृष्ण पखमोडे (वय ३३ वर्ष) असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनिल पखमोडे यांनी गजानन दूर्शेटवार यांच्या शेतातील झाडाला दोरी बांधून गळफास घेत आपली जीवनयात्रा संपवली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस पाटील शितल गोविंद गावंडे यांनी घटनेची माहिती मिळताच घटनास्थळ गाठून, दिग्रस पोलिसांना याची माहिती दिली. दिग्रस पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी दिग्रस ग्रामीण रुग्णालयात पाठविला. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसून दिग्रस पोलिस पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

---

# अग्निशामक गाडीला डिझेल देण्यास पेट्रोल पंप धारकाचा नकार

■ जनमाध्यम प्रतिनिधी

**पुसद :** येथील नगरपरिषद मधील अग्निशामक विभागात असलेल्या वाहनास महाजन पेट्रोल पंप धारकांनी डिझेल देण्यास नकार दिला आहे असे दि.३१ मार्च २०२६ पासून दर्शनी भागास बोर्डलावून जाहीरपणे सुचना केली आहे.

सविस्तर वृत्त असे की पुसद शहरात किंवा परिसरात कोणत्याही ठिकाणी आग लागली किंवा ज्वलंत पदार्थाने अग्नीचे रूप धारण करून धोका निर्माण झाल्यास त्या ठिकाणी नगरपरिषद पुसद मधील अग्निशामक विभागातील पाणी भरून असलेल्या वाहन गाडी अपघाताच्या

## शहरात काही अवचित प्रकार घडल्यास जबाबदार कोण?



ठिकाणी तात्काळ/अर्जंट जाऊन त्या ठिकाणी आग बुजविण्याचे काम करते. परंतु छत्रपती शिवाजी महाराज चौकातील महाजन पेट्रोल पंप मालकांनी नगरपरिषदेच्या अग्निशामक वाहन गाड्यास डिझेल देण्यास नकार दिला आहे, कारण मागील डिझेलचे बिल रक्कम मोठ्या प्रमाणात थकीत असल्यामुळे हे बिल निल झाल्याशिवाय डिझेल देण्यात येऊ नये असे दर्शनी भागात बोर्ड लावून पेट्रोलपंप कर्मचाऱ्यांना व नगरपरिषद अग्निशामक ड्रायव्हर कर्मचारी यांना सुचना केली आहे. सद्या कडक उन्हाळा सुरू झाला असून माहे मार्च संपला व एप्रिल व पुढील मे महिना हा खूप मोठ्या प्रमाणात तापत असतो आणि उणाचे प्रमाण जास्त असते या एप्रिल व मे महिन्यात उन्हाच्या तापमानाने अनेक ठिकाणी आग लागण्याची शक्यता जास्त असते त्यासाठी अग्निशामक ही अत्यंत आवश्यक असलेली सेवा आहे परंतु ही सेवा आता डिझेल विना मिळणार नाही त्यामुळे शहरात काही अवचित प्रकार घडल्यास यामध्ये मोठी जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास जबाबदार कोण? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. त्यामुळे हे आत्यवश्यक असलेली अग्निशामक सेवा तात्काळ सुरू करण्यासाठी थकीत असलेले मागील डिझेलचे बिल त्वरित भरून नगर परिषदेने सेवा तात्काळ सुरू करावी अशी पुसद शहरातील नागरिकांची मागणी होत आहे. त्यामुळे ही सेवा कधी सुरू होणार याकडे सुज्ञ नागरिकांचे लक्ष लागले आहे.

---

## अपघातात इसम गंभीर

**यवतमाळ :** भरधाव वेगातील चारचाकी वाहनाने दिलेल्या धडकेत इसम गंभीर जखमी झाला. अपघाताची ही घटना २५ मार्चला येथील दारव्हा रोडवरील नायरा पेट्रोलपंपासमोर सायंकाळी ७ वाजता घडली. रंजना हरीश कोरडे (४३) रा. नायरा पेट्रोलपंपमागे, तीर्थयात्रा अपार्टमेंट, यवतमाळ असे फिर्यादीचे नाव आहे. तर एमएच २९, बीसी ५८४१ या क्रमांकाच्या चारचाकीचा चालक असे गुन्हे दाखल झालेल्याचे नाव आहे. तर हरीश पुंडलिक कोरडे असे जखमीचे नाव आहे. फिर्यादी रंजनाचा पती हरीश हा एमएच २७, डीडी ८३७० या क्रमांकाच्या दुचाकीन घरून सामान आणायला मार्केटकडे निघाला होता. मात्र नायरा पेट्रोलपंपासमोर आरोपी चारचाकी वाहनचालकाने आपले वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून हरीशच्या दुचाकील धडक दिली. या अपघातात हरीशच्या डोक्यासह छातील गंभीर मार लागून तो जखमी झाला. फिर्यादीच्या तक्रारीवरून लोहारा पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहेत.

---

कालव्याच्या सिमेंट लायनिंगचा बोजवारा; महागाव तालुक्यात सिंचन विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

# अधर पुस प्रकल्प कालव्याची ३ कोटींची साफसफाई?

■ जनमाध्यम प्रतिनिधी
किरण नरवाडे

**महागाव :** शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी शेतापर्यंत पोहोचवण्यासाठी उभारण्यात आलेला अधर पुस प्रकल्प सध्या भ्रष्टाचाराच्या चिखलात अडकल्याची चिन्हे आहेत. कालव्याच्या केवळ साफसफाई आणि झुडपे काढण्याच्या नावाखाली तब्बल ३ कोटी रुपयांचे देयक काढण्यात आल्याने सर्वसामान्यांच्या भुवया उंचावल्या आहेत. विशेष म्हणजे, ज्या कालव्यांच्या सिमेंट लायनिंगवर कोट्यवधी रुपयांचा निधी मंजुर झाला परंतु केवळ साफसफाई केल्यावर एवढी मोठी रक्कम अदा केल्याने पुढील कामाची परिस्थिती काय असेल? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.



अधर पुस प्रकल्पांतर्गत येणाऱ्या कालव्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. त्यामुळे टेल पर्यंत पाणी पोहचणे कठीण झाल्याने या कालव्याचे सिमेंट लायनिंगचे काम करण्यासाठी जल संपदा विभागाकडून साडे सतरा कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्यात येवुन निविदा प्रक्रिया राबवून सदर कामाचे टेंडर उमरखेड येथील एका कंत्राटदाराला देण्यात आले.रब्बी हंगामाच्या पुर्वी लाखो रुपयांचा निधी खर्च करून कालव्यांमध्ये वाढलेले मोठी झुडपे व साचलेला गाळ काढण्यात आला आहे.त्यानंतर १७कोटी ६९लाख रुपयांचा निधी मंजुर करून काम सुरू करून कंत्राटदाराला केवळ साफसफाईच्या नावाखाली ३ कोटी रुपयांचे देयक अदा करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. प्रत्यक्षात अजून सिमेंट लायनिंग चे काम करणे बाकी असताना एवढ्या मोठ्या प्रमाणात रक्कम दिली गेल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. एकीकडे पाण्याचे नियोजन नसल्याने शेवटच्या टोकापर्यंत पोहोचत नाही, तर दुसरीकडे दुरुस्तीच्या नावाखाली निधीचा असा गैरवापर होत असल्याने महागाव तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असुन एवढ्या मोठ्या रकमेचे देयक काढताना कामाची प्रत्यक्ष पाहणी झाली होती का? की कंत्राटदार आणि अधिकारी यांच्या साट्यालोट्यातून हा 'अर्थपूर्ण' व्यवहार झाला? असे अनेक प्रश्न आता उपस्थित केल्या जात असुन या प्रकरणाची मंत्रालय स्तरावरून चौकशी करण्यात यावी अशी मागणी केल्या जात आहे.

---

# मंगळवारी सरुळ येथे ग्रामजयंती महोत्सव

**बाभूळगाव :** ग्रामजयंती महोत्सवानिमित्त मंगळवारी व बुधवारी दोन दिवसीय जिल्हा युवक व कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन आदर्श ग्राम सरूळ येथे करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी गुरुकुल मोझरी येथील सर्वाधिकारी प्रकाश महाराज वाघ हे राहतील. उद्घाटक म्हणून माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अशोकराव घारफळकर, पराग पिंगळे, भाजप जिल्हा महामंत्री राजू पडगिलवार, गुरुकुंज आश्रमाचे प्रतार प्रमुख गोपाल कडू, तर विशेष उपस्थिती म्हणून

महानगर सेवाधिकारी डॉ. सूर्यप्रकाश जयस्वाल, तालुका प्रचारक अविनाश मानकर उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी ६.३० वाजता हभप जाधव महाराज व आजीवन प्रचारक गुरुकुंज डॉ. ज्ञानेश्वर मुडे, संत साहित्याचे अभ्यासक युवा व्याखाते अरविंद राठोड यांच्या उपस्थित सामुदायिक प्रार्थना घेण्यात येणार आहे. तर रात्री ८ वाजता पुणे विद्यापीठाचे सुवर्णपदक विजेते कीर्तनकार प्रा. डॉ. प्रशांत महाराज ठाकरे यांचे कीर्तन होणार आहे. ८ एप्रिल ध्यान करून रामधून रॅली काढण्यात येईल.

---

नागपूर खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय; ‘अबेटमेंट’साठी थेट कृती आवश्यक

# आत्महत्येच्या व्हिडिओतील नावांवरून गुन्हा ठरत नाही!

■ जनमाध्यम प्रतिनिधी

**यवतमाळ :** आत्महत्येपूर्वी केलेल्या व्हिडिओमध्ये आरोपींची नावे घेणे एवढ्यावरूनच आत्महत्येस प्रवृत्त (अबेटमेंट) केल्याचा गुन्हा सिद्ध होत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय देत नागपूर खंडपीठाच्या मुंबई उच्च न्यायालयाने पांढरकवडा येथील गुन्हा व आरोपपत्र रद्द केले.

दि. ०२ जून २०२५ रोजी मंगेश वासेकर यांनी आत्महत्या केली होती. त्यानंतर सुमारे ४५ दिवसांनी, दि. १६ जुलै २०२५ रोजी त्यांच्या पत्नी वैशाली वासेकर यांनी पांढरकवडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून विजय झोटिंग, विनोद राजूरकर व इतरांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

तक्रारीनुसार, आरोपींनी सुमारे १० ते १२ लाख रुपये घेतले होते व परत केले नाहीत, यामुळे मानसिक त्रास



होऊन मृताने आत्महत्या केल्याचा आरोप होता. तपासादरम्यान मृताच्या मोबाईलमधील व्हिडिओ क्लिप जप्त करण्यात आली, ज्यामध्ये संबंधित व्यक्तींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. दरम्यान, आरोपींच्या वतीने अ?ड. सिद्धार्थ लोढा यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्याय मूर्ति उर्मिला जोशी-फाळके यांनी प्रकरणाचा सखोल विचार करताना नमूद केले की, केवळ पैशांचा व्यवहार किंवा परतफेड न करणे हे आत्महत्येस वृत्त करण्यासाठी पुरेसे ठरत नाही.

ठळक निरीक्षण: न्यायालयाने स्पष्ट केले की, अबेटमेंट सिद्ध करण्यासाठी आरोपीकडून थेट प्रेरणा, चिथावणी किंवा जाणीवपूर्वक मदत असणे आवश्यक आहे. संबंधित प्रकरणात असा कोणताही ठोस पुरावा आढळून आलेला नाही. तसेच, न्यायालयाने नमूद केले की, मृताच्या व्हिडिओ क्लिपमध्ये केवळ पैसे न दिल्याबाबत उल्लेख असून, आत्महत्येस प्रवृत्त करणारी कोणतीही थेट कृती दर्शविली जात नाही. साक्षीदारांचे जबाब व तपासातील कागदपत्रे देखील आरोपींच्या विरोधात आवश्यक घटक सिद्ध करत नाहीत. यामुळे, न्यायालयाने नमूद केले की, अशा परिस्थितीत आरोपींवर खटला चालविणे हा कायद्याचा गैरवापर ठरेल. परिणामी, संबंधित ऋखठ व सत्र प्रकरण रद्द करत आरोपींना मोठा दिलासा देण्यात आला.

---

# तपास यंत्रणा त्या आमीनला सह आरोपी करतील काय ?

## सात कोटीच्या घोटाळा

**दिग्रस :** स्थानिक शहरांमध्ये आर्थिक घोटाळ्याने नागरिकांच्या उरात धडकीच भरली आहे आपल्या चौकटीतील आयुष्यातील दोन पैशाचे दहा पैसे करण्याचे लालस अखेर येथील नागरिकांच्या ग्रो कॅपिटल च्या माध्यमातून मानगुटीवर बसल्याचे सर्वश्रुत झाले यामध्ये या कंपनीच्या नावावर शहरातून कोट्यावधी लूटपाट करणारे मुख्य आरोपी पोलीस कोठडीत असून त्यांचा न्यायालयाने सुद्धा जामीनही फेटाळला वास्तविक पाहता या कंपनीमध्ये नागरिकांना पैसे भरण्याकरिता प्रवृत्त करणारा तो अमीन राजकीय कवच कुंडल घालून तपास यंत्रणेला हुलकावणी देण्यात यशस्वी होत असल्यामुळे ग्रो कॅपिटल या कंपनीमध्ये पैसे भरण्याकरिता नागरिकांना प्रवृत्त करणारा तो अमीन आजही मोकाट असल्याने तपास यंत्रणा घुटमळत तर नाही ना असा ग्रो कॅपिटल कंपनीत पॅसे भरणाऱ्या शहरातील नागरिकांची आर्त हाक असल्याने लाखो रुपयाची गुंतवणूक करण्याकरिता त्या अमीन ने आपल्या कमिशन खोरीतून लाखो रुपयाची शाळा भरविल्याची बोलल्या जात आहे त्यामुळे सात कोटीच्या तथाकातील घोटाळ्यात सह आरोपीत वाढ करण्यात येते की तपास यंत्रणा चौकशी बाहेर ठेवते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.


---

# उच्चभ्रू सोसायटीतच वाळूचा काळाबाजार!

■ जनमाध्यम प्रतिनिधी

**यवतमाळ :** शहरातील पिंपळगाव रोडवरील बालाजी सोसायटी परिसरात लहान मुलांसाठी व ज्येष्ठनागरिकांसाठी राखीव असलेल्या प्लेग्राउंडवर मोठ्या प्रमाणात अवैध वाळूचा साठा करून त्याची खुलेआम विक्री सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सार्वजनिक वापरासाठी राखीव असलेल्या जागेवरच वाळू माफियांनी कब्जा करून साठवणूक केल्यामुळे नागरिकांच्या हक्कांवर गदा आली असून, हा सर्व प्रकार प्रशासनाच्या नजरेसमोर घडत असतानाही संबंधित यंत्रणा जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे. मुलांच्या खेळासाठी व नागरिकांच्या

## प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह



विरंगुळ्यासाठी सोडण्यात आलेल्या या मोकळ्या जागेवर थेट अतिक्रमण करत मोठ्या प्रमाणात वाळू साठवण्यात आली आहे. या साठ्यातून दररोज वाळूची विक्री सुरू असून, संपूर्ण व्यवहार राजरोसपणे चालत असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे सार्वजनिक जागेवरच अवैध व्यवसाय फोफावत असल्याचे स्पष्ट चित्र समोर आले आहे.

या प्रकाराकडे महसूल प्रशासन व संबंधित यंत्रणा दुर्लक्ष का करत आहेत. हा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. यवतमाळचे तहसीलदार योगेश देशमुख यांना याबाबत माहिती नाही का, की सर्व काही माहिती असूनही जाणीवपूर्वक मूकसंमती दिली जात आहे, याबाबत नागरिकांत चर्चा रंगू लागली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात वाळू साठवणूक व विक्री प्रशासनाच्या माहितीस शिवाय होणे शक्य नसल्याने यामागे आर्थिक हितसंबंध दडले असल्याचा संशयही व्यक्त केला जात आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातच अशा प्रकारे अवैध वाळू व्यवसाय सुरू असल्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने या प्रकरणाची दखल घेऊन कठोर कारवाई करावी, अन्यथा नागरिकांचा संताप तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

---

# लोखंडी ट्रॉली चोरी



**यवतमाळ :** फिर्यादीच्या गोठ्याच्या समोर ठेवलेले एमएच २९, व्ही ६४१३ या क्रमांकाची ४० हजार किमतीचे शिवम कंपनीची लोखंडी ट्रॉली अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. चोरीची ही घटना १ एप्रिलला सायंकाळी ६.३० ते २ एप्रिलच्या सकाळी ६ वाजतच्या दरम्यान राळेगाव तालुक्यातील सावरखेडा येथे घडली. मयूर मनोहर बुट्टे (३२) रा. सावरखेडा असे फिर्यादीचे नाव आहे. या प्रकरणी तक्रारीवरून वडकी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

# परिमंडळात १ लाख ७१ हजार थकबाकीदार

## महावितरण सार्वजनिक करणार देयके थकविणाऱ्या ग्राहकांची नावे

**अमरावती/का.प्र.**

मार्च महिन्यातच नाही, तर गत वर्षभरापासून महावितरणच्या वसूली मोहिमेला न जुमानता वीज बिल न भरणाऱ्या परिमंडळातील १ लाख ७१ हजार वीज ग्राहकांकडे ३५ कोटी २३ लाख रूपयाचे वीजबिल थकीत आहे. महावितरणने या सर्व डिफॉल्टर वीज ग्राहकांची नावे सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला असून कायदेशीर कारवाई करण्यासाठीही महावितरण सरसावले आहे.

मुख्य अभियंता अशोक साळुंके म्हणाले की, वीज बिलाच्या वसूलीवरच महावितरणचे अस्तित्व आहे, तसेच अखंडित सेवा देण्यास महावितरण बांधिल आहे आणि त्यादृष्टिने वीज सेवा सुधारण्यासाठी कर्मचाऱ्यांवर जबाबदाऱ्या निश्चित करण्यात येत असतांना, वीज बिल न भरणाऱ्या प्रवृत्तीमुळे कर्मचाऱ्यांना नाईलाजास्तव वीजबिलाच्या वसूलीवर पाठवावे लागते.यावेळी सोबत पोलिस विभागाची मदत घेवून कायदेशीर कारवाई करण्यात येणार असून त्यादृष्टीने अधीक्षक अभियंता (अमरावती) दिपक देवहाते आणि अधीक्षक अभियंता (यवतमाळ) प्रविण दरोली हे लवकरच जिल्ह्यातील पोलिस आयुक्त/पोलिस अधीक्षकांची भेट घेवून चर्चा करणार आहे.




परिमंडळात घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक वर्गवारीतील अश्या डिफॉल्टर वीज ग्राहकाची संख्या १ लाख ७१ हजार असून त्यांच्याकडे अद्याप ३५ कोटी २३ लाख रूपये वीज बिलाचे थकीत आहे. यामध्ये ६८ हजार ६७२ ग्राहक अमरावती जिल्ह्यातील आहे. त्यांच्याकडे ११ कोटी ३ लाख रूपये थकीत आहे. यवतमाळ जिल्ह्यातील यात १ लाख २ हजार ३३८ ग्राहक असून त्यांच्याकडे २४ कोटी २० लाख थकीत आहे.


परिमंडळातील डिफॉल्टर ग्राहकातील ९ हजार ४२३ ग्राहक असे आहेत, की त्यांनी एकावर्षापेक्षा जास्त कालावधी होवून एकदाही वीजबिल भरले नाही. त्यांच्याकडे ८ कोटी ४२ लाख रूपये थकले आहे. ४० हजार ७९१ ग्राहकांनी ४ महिन्यापेक्षा जास्त आणि १२ महिन्यापर्यंत बिल भरले नसल्याने त्यांच्याकडे ११ कोटी २१ लाख थकले आहे. तसेच ४५ दिवस ते ३ महिने होवूनही वीज बिल न भरणारे परिमंडळात ६९ हजार ७९७ ग्राहक असून त्यांच्याकडे ७ कोटी ९८ लाख थकले आहे.

# विद्यापीठात स्टार्टअप्सना सीड फंडचे वितरण

## दोन नाविन्यपूर्ण कंपन्यांना मिळाले आर्थिक पाठबळ

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाउंडेशनद्वारे दोन उदयोन्मुख स्टार्टअप्सना 'सीड फंड' चे (बीज भांडवल) इन्क्युबेशन सेंटरमध्ये पार पडलेल्या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण सोसायटीच्या अर्थसहाय्याने या निधीचे वितरण करण्यात आले. डंग्स ॲन्ड हर्ब्स प्रा. लि. ला रु. २ लक्ष व कृष्णामय आयुरयोग प्रा. लि. ला रु. २.५ लक्ष सिड फंडचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, इन्क्युबेशन सेंटर प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव उपस्थित होते.



यावेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरू म्हणाले,२०१४ मध्ये देशात केवळ ५०० नोंदणीकृत स्टार्टअप्स होते, ती संख्या आज दोन लाखांच्या पुढे गेली आहे. विशेष म्हणजे यातील ५० टक्के स्टार्टअप्स हे नागपूर, अमरावती, अकोला यांसारख्या शहरांमधून आलेले आहेत. त्याहूनही अभिमानाची बाब म्हणजे, एकूण स्टार्टअप्सपैकी ४८ टक्के व्यवसायांमध्ये किमान एक महिला संस्थापक किंवा संचालिका आहे. महिला सक्षमीकरणाचे हे एक उत्तम उदाहरण असल्याचेही कुलगुरू म्हणाले.


विद्यार्थ्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहून पैसे कमवण्यासोबतच समाजातील प्रश्न सोडवून इतरांनाही रोजगार उपलब्ध करून देण्याचे समाधान स्टार्टअप्सच्या माध्यमातून मिळू शकते, असा विश्वासही कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी यावेळी व्यक्त केला. इन्क्युबेशन सेंटर प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर यांनी सेंटरमधील उपक्रमांबाबत माहिती दिली. सूत्रसंचालन व आभार सेंटरचे व्यवस्थापक अमोल हिरुळकर यांनी मानले. कार्यक्रमाला शासकीय तंत्रनिकेतनमधील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नरेश मोवळे, रवी ढेंगळे, भावेश वारके यांनी अथक परिश्रम घेतले.

# आरटीईची सोडत सोमवारी

## पुणे येथून लॉटरीचे होणार ऑनलाइन थेट प्रक्षेपण

**अमरावती/का.प्र.**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठीची सोडत (लॉटरी) सोमवार, ६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता काढण्यात येणार आहे. यामध्ये प्राप्त झालेल्या ७,९५३ अर्जामधून २,६२६ पाल्यांचे लॉटरी निघणार असल्याने त्यामुळे या प्रक्रियेची पालकांना उत्सुकता लागली आहे.




जिल्ह्यात आरटीई प्रवेशाकरिता २२७शाळांमध्ये आर्थिक दुर्बल घटकातील पाल्यांच्या प्रवेशाकरिता ऑनलाईन अर्ज बोलाविण्यात आले होते. याकरिता ३१ मार्च ही शेवटची तारीख होती. त्यामुळे आता प्राप्त झालेल्या ७,९५३ अर्जामधून जिल्ह्याकरिता २६२६ रिक्त जागांकरिता सोडतद्वारे निवड केली जाणार आहे. ही सोडत ६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजतापासून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथे सुरू होणार आहे. तिचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर संबंधित अधिकाऱ्यांनी या सोडतीस ऑनलाईन उपस्थित राहावे, असेही निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हास्तरावर नशिबवान ठरलेल्या पाल्यांच्या पालकांना मोबाईल संदेशाद्धारे माहिती देऊन प्रत्यक्षात प्रवेशाला सुरूवात केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात २६२६ पाल्यांची लॉटरी द्वारे निवड करून २६२६ पाल्यांची प्रतिक्षा यादी देखील तयार केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यातील पाल्यांनी प्रवेश न केल्यास प्रतिक्षा यादीतील पाल्यांना संधी दिल्या जाणार आहे. त्यामुळे या लॉटरी प्रक्रियेबाबत उत्सुकता लागली आहे.

### जलतरण शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती-** उन्हाळ्याची चाहूल लागताच विद्यार्थ्यांमध्ये सुट्टीचा आनंद आणि विविध कौशल्ये आत्मसात करण्याची उत्सुकता वाढू लागते. याच पार्श्वभूमीवर श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळात सुरू झालेल्या जलतरण प्रशिक्षण शिबिराला विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. आंतरराष्ट्रीय मानकांनुसार सुसज्ज असलेल्या जलतरण तलावात प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली लहान वयोगटातील मुलांना सुरक्षित व शिस्तबद्ध पद्धतीने प्रशिक्षण दिले जात आहे. विशेषतः ५ ते १० वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी हे प्रशिक्षण सुरू असून, त्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक आत्मविश्वासातही लक्षणीय वाढ होत आहे.मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या दूरदृष्टीतून उभारण्यात आलेल्या या जलतरण विभागाचे नेतृत्व एन.आय.एस. प्रशिक्षक डॉ. योगेश निर्मळ यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली होत आहे. त्यांच्या प्रशिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये जलतरणाविषयीची भीती कमी होत असून आत्मविश्वास वाढला आहे.

# अमरावती विभागाला राजमाता जिजाऊ बससेवेची वाट

**अमरावती/का.प्र.**

राज्यभरात धावणाऱ्या शिवशाही, शिवनेरी आणि ई-शिवाई बससेवेनंतर आता सर्वांचे लक्ष नव्या राजमाता जिजाऊ बससेवेकडे लागले आहे. पहिल्या टप्प्यात ही सेवा मोठ्या प्रमाणावर चालवली जाईल. अमरावती जिल्ह्याला सध्या ही बस सेवा उपलब्ध नाही आणि ती इतर शहरांमध्ये उपलब्ध होण्याची वाट पाहावी लागेल. पहिल्या टप्प्यात ही बस सेवा पुणे, नागपूरमध्ये सुरू केली जाईल. एसटी कॉर्पोरेशनच्या ताफ्यात ३,००० राजमाता जिजाऊ स्मार्ट बसेस लवकरच दाखल होणार आहेत. ही माहिती एसटी कॉर्पोरेशनने दिली आहे. लालपरी आणि ई-शिवाय नंतर, आता जिल्ह्याचे एसटी प्रवासी राजमाता जिजाऊ एसटी बसबद्दल उत्सुक आहेत. कारण आता प्रवाशांचे लक्ष एसटी कॉर्पोरेशनच्या निर्णयावर केंद्रित झाले आहे.

**अमरावतीला नवीन बसची गरज**

सध्या, अमरावती डेपोमधून पुणे, नागपूर, अकोला, पंढरपूर, बेतुल, हैदराबाद, छत्रपती संभाजी नगर आणि इतर ठिकाणांकडे जाणाऱ्या मार्गांवर प्रचंड प्रवासी वाहतूक असते. पुण्याला दररोज चार ते पाच फेऱ्या होतात, ज्यातून शेकडो प्रवासी प्रवास करतात. अनेकदा, अति गर्दीमुळे एसटी बस सेवेच्या अभावामुळे प्रवाशांना खाजगी प्रवासाचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे, राजमाता जिजाऊ एसटी बस सेवा सुरू होणे प्रवाशांसाठी मोठी सोय ठरेल.




**ही वैशिष्ट्ये आहेत**

सर्वसाधारण बसमध्ये ४० आसने असतात. नवीन बसमध्ये ३ बाय २ आकाराची ५६ आसने आहेत, ज्यामुळे सर्वसाधारण बसपेक्षा जास्त प्रवासी बसू शकतात. नवीन बस स्मार्ट बस असेल. दोन प्रमुख शहरांदरम्यान शटल बस सेवा चालवली जाईल.

**अत्याधुनिक सेवा** - ही बस चार सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस प्रणाली, सुरक्षेसाठी पॅनिक बटण, महत्त्वाची माहिती देण्यासाठी सार्वजनिक घोषणा प्रणाली आणि प्रवासाच्या दिशानिर्देशांसाठी इलेक्ट्रॉनिक मार्गदर्शक फलकांनी सुसज्ज आहे. प्रवासी सेवा सुधारण्यासाठी अमरावती विभागाने फेरींच्या संख्येच्या तुलनेत एसटी बसेसची क्षमता वाढवणे आवश्यक आहे.

**नागपूरनंतर अमरावतीला नवीन बस मिळतील**

पाहिली बस सेवा नागपूरमध्ये सुरू होईल. राजमाता जिजाऊ बसेस अद्याप नागपूर विभागात पोहोचलेल्या नाहीत, परंतु एसटी कॉर्पोरेशनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पहिल्या टप्प्यात मे महिन्यापर्यंत या बसेस नागपूरमध्ये येण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यानंतर, दुसऱ्या टप्प्यात राजमाता जिजाऊ एसटी बसेस अमरावती विभागासाठी उपलब्ध होतील, त्यामुळे सध्या प्रवाशांना या बसेसची वाट पाहावी लागेल.

# पंचायत समितीत महिलांसाठी व दिव्यांगांसाठी उद्योजकता प्रशिक्षण

## जीवनोन्नती अभियानांतर्गत उपक्रम यशस्वी

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

पंचायत समिती चांदूर रेल्वे अंतर्गत प.स. सेस फंड योजना सन २०२५-२६ अंतर्गत अनुसूचित जाती व जमातीतील महिलांसाठी समाज कल्याण विभागामार्फत उद्योजकता व कौशल्य विकास प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. याचबरोबर दिव्यांग व्यक्तींसाठीही उद्योजकता कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित करून त्यांना राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली.

तसेच महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिलांसाठी उद्योजकता व कौशल्य विकास प्रशिक्षणाचे आयोजन तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत आरोग्य शिबिराचे आयोजन करून आरोग्य तपासणी व औषधोपचार करण्यात आला. चांदूर रेल्वे पंचायत समिती सेस फंड योजनेअंतर्गत जीवनोन्नती अभियान (उमेद) येथील प्रशिक्षण सभागृहात आयोजित हे तिन्ही प्रशिक्षण मान्यवरांच्या व प्रशिक्षणार्थींच्या उपस्थितीत पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

या वेळी माननीय गटविकास अधिकारी डॉ. प्रफुल्ल भोरकडे, सहाय्यक गटविकास अधिकारी संजयजी खारकर, विस्तार अधिकारी पंचायत रमेश मेश्राम यांनी उपस्थित महिलांना व स्वयंसहायता बचत गटांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणासाठी भस्मे,माहुरे, अमोल पेठे तसेच रमेश मेश्राम यांनी प्रशिक्षक म्हणून उद्योजकता विकास, व्यवसाय संधी आणि कौशल्य वृद्धी याबाबत सखोल मार्गदर्शन केले.प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील अनुसूचित जाती-जमाती,मागासवर्गीय महिला व दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणणे, त्यांना स्वावलंबी बनविणे तसेच विविध व्यवसायांच्या माध्यमातून त्यांच्या कुटुंबांची आर्थिक स्थिती उंचावणे हा होता. स्त्री सक्षमीकरण आणि आत्मनिर्भरतेच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरला.सदर प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात व यशस्वीरित्या पार पडला असून, यामुळे सहभागी महिलांमध्ये आत्मविश्वास वाढून त्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रेरणा मिळणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# गजराज, महाकाल पथक ठरले लक्षवेधी

## राजकमल चौकात मारुतीरायाची महाआरती

**अमरावती/का.प्र.**

वीर हनुमान सेवाभावी समिती,युवक काँग्रेस व काँग्रेसच्यावतीने हनुमान जयंतीच्या पूर्वसंध्येला बुधवारा येथील आझाद हिंद मंडळाच्या प्रांगणातून शोभायात्रा काढण्यात आली. ढोल-ताशांचे पथक, हरियाणातील महाकाल पथकाचे अघोरी नृत्य, उज्जैनचा गजराज ही या मिरवणुकीची प्रमुख वैशिष्टये ठरली. या शोभायात्रेत हजारोंच्या संख्येने महिला, पुरूष, युवक, युवती सहभागी झाले होते.

शोभायात्रेचे पूजन माजी पालकमंत्री ॲड. यशोमती ठाकुर, डॉ. सुनील देशमुख, खा. बळवंत वानखडे, महापालिकेतील विरोधी पक्षनेते विलास इंगोले, काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावत यांच्या हस्ते करण्यात आले. या शोभा यात्रेमध्ये १५ ट्रॅक्टरवर वेगवेगळे देखावे सादर करण्यात येणार आले. शोभायात्रेच्या प्रत्येक मार्ग केळीचे खांब व फुलांच्या माळांनी सजविले होते. देखाव्यात बजरंगबली, राम-लक्ष्मण सीता, श्री विठोबा रुक्माई, अमरावतीची कुलस्वामिनी अंबामाता एकवीरा माता, महादेव, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमासुद्धा विराजमान होत्या. राजकमल चौकात बजरंगबलींची महाआरती करण्यात आली. फटाक्यांची आतषबाजी, सोबतच



बजरंगबलीचा जयघोष व श्री रामाच्या नावाचा जयघोष करित शोभायात्रेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. खा. बळवंत वानखडे आणि यशोमती ठाकूर यांनी ढोल वाजवत सहभाग घेतला. ॲड. यशोमती ठाकूर यांनी तर गळ्यात टाळ घेऊन फुगडीचाही ताल धरला होता. तसेच माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख व इतर पदाधिकाऱ्यांनीही मारूतीरायाच्या नावाचा जयघोष केला. विशेष आकर्षण म्हणून केरळमधून आलेल्या हनुमानाच्या वेशातील बहुरूपी कलाकाराने सर्वांचे लक्ष वेधले-या मिरवणुकीत शिवसेनेचे माजी खासदार अनंत गुढे, महापौर श्रीचंद तेजवाणी,



उपमहापौर सचिन भेंडे यांच्यासह विविध संघटनांचे कार्यकर्तेही सहभागी झाले होते. शोभायात्रेच्या यशस्वीतेसाठी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष तथा वीर हनुमान समितीचे पदधिकारी अनिकेत ढंगळे, राहुल येवले, वैभव देशमुख, समीर जवंजाळ, भैया पवार, डॉ. संजय शिरभाते, राजू बेले, सुरेश रतावा, प्रमोद इंगोले, पंकज लुंगीकर, सागर इंगोले, निखिल बिजवे, संकेत साहू, अनुप साहू, गौरव बेलूरकर, चेतन इटणारे, निशांत जावक, राजा पिंजरकर, निलेश सराफ, संतोष चिखलकर, मयूर जलतारे, अर्जुन इंगोले, पवन शर्मा, चेतन यावल, शेखर गायकवाड, आकाश नवघरे आदींनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त

### विदर्भ इतिहास परिषदेच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. चंद्रकांत सरदार



**अमरावती-**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ तसेच गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यरत असलेल्या विदर्भ इतिहास परिषदेच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. चंद्रकांत सरदार यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा अमरावती येथे शोधक विद्यार्थ्यांतर्फे विशेष सत्कार करण्यात आला. हा सत्कार सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा अभ्यासक्रमाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी संबोधी संस्थेच्या सभागृहात आयोजित केला होता. उपस्थितांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल आणि संविधान प्रास्ताविक देऊन डॉ. चंद्रकांत सरदार यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुक्त मंथन त्रैमासिकाच्या संपादिका सुनंदा बोदिले यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, 'प्रा. डॉ. चंद्रकांत सरदार हे केवळ इतिहासाचे अभ्यासक नसून ते विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे मार्गदर्शक आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे विदर्भातील इतिहास संशोधनाला नवी दिशा मिळेल.कार्यक्रमात डॉ. अरुण रौराळे, डॉ. वंदना धवने, सुनंदा बोदिले, प्रा. एस. कुमार मेश्राम, आदिती कांबळे, नारायण थोरात, प्रा. हेमंत सावळे, संदीप राऊत तसेच संबोधी संस्थेचे पदाधिकारी व संशोधक विद्यार्थी, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. वासंती कडू यांचा सत्कार



**अमरावती-** स्वस्तिक नगर परिसरात संत जयराम हॉस्पिटलच्या माध्यमातून डॉ. वासंती अविनाश कडू वैद्यकीय सेवा देत आहेत. नुकताच मित्र मंडळी द्वारा आयोजित गोरक्षण संस्थेतील कार्यक्रमात त्यांच्या या कार्याबद्दल त्यांच्या कार्यक्रम आयोजक दिलीप सदार डॉ. गोविंद कासट यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर मिलिंद कोरान्ने,यश सहस्त्रबुद्धे, राजीव बसवनाथे, मधु बंग, प्राचार्य दिलीप सिंह खांबरे, उमेश वैद्य, डॉ. चारुदत्त चौधरी, डॉ. राजू डांगे, नवल भूत, ज्योती राठोड, प्रा. डॉ. वामन जवंजाळ, नरेंद्र तायडे,विवेक मोहोळ, सुरेश कस्तुरकर इत्यादी मंडळी हजर होती.

### अक्षर मानवच्या महाराष्ट्र राज्य संचालक पदी अश्विनी वितोंडे



**अमरावती-**अक्षर मानव संघटनेच्या महाराष्ट्र राज्य संचालक पदी तसेच महाराष्ट्र राज्य महिला विभाग व कुटुंब विभागाच्या प्रमुख पदी अश्विनी वितोंडे यांची या प्रसंगी नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्ह्यातील मोझरी येथील रहिवासी असणाऱ्या अश्विनी वितोंडे-खान यांनी या पुर्वी अमरावतीचे अक्षर मानव जिल्हा सचिव, अक्षर मानव तालुका अध्यक्ष अश्या महत्वाच्या पदावर त्यांनी काम केले आहे. त्यांच्या या कामाची दखल घेऊन जालण्याच्या एका विषेश बैठकीत सर्वांमते निवड करुन त्यांना बढती देण्यात आली आहे.या निवडी बद्दल अक्षर मानव राज्य कार्यकारिणी, सर्व विषयाचे राज्य प्रमुख, विभाग प्रमुख, जिल्हा अध्यक्ष, अमरावती जिल्हा कार्यकारिणी, सर्व तालुका अध्यक्ष, मित्र परिवारातर्फे अभिनंदन करत आहे. सर्व साधारण कुटुंबातुन येऊन मोझरी सारख्या गाव पातळी ते राज्य पातळीवर अश्विनी वितोंडे-खान यांना काम करण्याची संधी मिळाल्यामुळे अमरावतीकर व तिवसा - मोझरी येथील नागरिक कौतुक व प्रशंसा करत आहेत.

# 'प्रबोधनाचा दीप उजळला' चिंचोली काळेत

## ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बेलोरा/वार्ताहर**

चिंचोली काळे येथे हनुमान जन्मोत्सव निमित्त आयोजित समाज प्रबोधनपर कीर्तन सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. या कीर्तन सोहळ्यात प्रख्यात कीर्तनकार व समाजप्रबोधनकार ह.भ.प. डॉ. रामपालजी धारकर महाराज यांनी आपल्या ओजस्वी वाणीने उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

महाराजांसोबत आलेल्या कीर्तनातील साथसंगतीतील कलाकारांचा सन्मान करण्यात आला. हार्मोनियम वादक सुनीलभाऊ गायकर, तबलावादक पंकजभाऊ मुसळे, साथसंगत पवनदादा कदम, सारथी सुखदेवराव चिंचोळकर आणि विनोदराव माथुरकर यांचा यामध्ये समावेश होता.या सर्वांचा सन्मान गावातील प्रतिष्ठित नागरिक मधुकर आवारे, सुधाकर मनवरे, अतुल काळे, हरिदास काळे, हरिभाऊ रंगराव काळे, शशिकांत काळे, गजानन काळे आणि प्रकाशभाऊ काळे यांच्या हस्ते करण्यात आला.ह.भ.प. डॉ. रामपालजी धारकर महाराज यांचा सत्कार मधुकररावजी आवारे यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल शिवदास भुयार यांचा ५३ वेळा रक्तदान केल्याबद्दल महाराजांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक मंडळाने विशेष परिश्रम घेतले. यामध्ये केदार काळे, अंकुश काळे, अमोल काळे, राजकुमार कोकाटे, प्रवीण किरकटे, नरेंद्र भुयार, अविनाश आवारे, सुधीर दळवी, बंटी काळे, दिनेश चौधरी सचिन देशमुख, नकुल काळे, विराज काळे यांचा सक्रिय सहभाग होता.संचालन सागर हाते यांनी केले. कार्यक्रमाला ग्रामस्थ, युवक, महिला व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# चमत्कार, सिद्धी आणि अंधश्रद्धा

आपण एक बटन दाबतो आणि काही अंतरावर असलेला दिवा प्रकाशित होतो. आपण बसल्या जागी रिमोटचे बटन दाबतो आणि १०-१५ फुट अंतरावर असलेला टीव्ही चा स्क्रीन उजळतो; त्यात काही दृश्ये दिसू लागतात व त्यातून अनेक आवाजही ऐकू येतात. युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, अरब देश इत्यादी हजारो मैल दूर असलेल्या ठिकाणी ज्यांचे मुले-मुली जाऊन काही काम करत आहेत, असे भारतातले आई-बाप स्मार्टफोनचा वापर करून वाटेल तेव्हा त्यांना व्हिडीओ कॉल करून बघू शकतात व संवादही करू शकतात. हे सगळे कसे घडते ते आपल्याला समजत नसते. परंतु या चमत्कारिक वाटू शकणाऱ्या गोष्टींचे आश्चर्य मात्र आपल्याला वाटत नाही. कारण त्यामागे काही सायन्स आहे असे आपण ऐकलेले असते. मॅटर आणि एनर्जी, टाइम आणि स्पेस यांचे निरीक्षण व संशोधन करणाऱ्या शास्त्राला फिजिक्स म्हणतात. वेगवेगळ्या पदार्थ कणांच्या अंतर्गत व परस्परांसोबत होणाऱ्या रासायनिक क्रियांचे निरीक्षण व संशोधन करणाऱ्या शास्त्राला केमिस्ट्री म्हणतात. सर्व सजीवांच्या शरीरांमध्ये असणाऱ्या रचना व घडामोडींचे निरीक्षण व संशोधन करणाऱ्या शास्त्राला बायॉलॉजी म्हणतात आणि मोजदाद करणाऱ्या शास्त्राला गणित म्हणतात. इतके साधारणतः दहावीपर्यंत शिकलेल्या सर्वांना माहित असते. अशाच अनेक शास्त्रांचे मिळून सायन्स बनते.

ज्यांच्या संशोधनातून निर्माण झालेल्या बल्ब, मोटर पंप, वाहने, टीव्ही, स्मार्टफोन इत्यादी अनेकानेक वस्तूंचा आपण दररोज उपयोग करतो, त्या वैज्ञानिकांना किंवा कंपन्यांच्या संचालकांना आपण जाऊन साष्टांग नमस्कार करत नसतो, याची काही कारणे आहेत. एकतर हे वैज्ञानिक संशोधन आहे याची आपल्याला अंधुक जाणीव असते. दुसरे, ते वैज्ञानिक किंवा कंपनीवाले कुठे असतात याची आपल्याला कल्पना नसते. तिसरे आणि सगळ्यात महत्वाचे कारण म्हणजे स्वतः जवळ काही चमत्कारिक शक्ती असल्याचा आव आणून तुम्ही जर आम्हाला शरण आले नाही तर आम्ही तुमचे नुकसान करू शकतो असा दावा ते करत नसतात.

परंतु आपल्याजवळ काही चमत्कारिक शक्ती आहे, शरण येणाऱ्यांना आपण त्या शक्तीचा लाभ मिळवून देऊ शकतो, विरोध करणाऱ्यांना ताप देऊ शकतो, असा जर कोणी दावा केला (किंवा त्यांच्या वतीने इतरांना करू दिला) आणि असा दावा करणाऱ्या बाबा, महाराज, संत अथवा योगी व्यक्तींच्या दरबारात जाणे शक्य असले तर आपण सामान्यजन लोभाने अथवा भयाने शरण जाऊ शकतो. कारण त्यांच्याजवळ असलेली शक्ती विज्ञानापलीकडची आहे व जे विज्ञानाला जमले नाही असे चमत्कार ते करू शकतात, अशी आपली श्रद्धा असते. 'साधना' आणि 'सिद्धी' हे शब्द सहसा आध्यात्मिक साधनेच्या संदर्भात वापरले जातात. परंतु कोणतेही काम शिकण्यासाठी जे प्रयत्न जाणीवपूर्वक करावे लागतात ते सगळे प्रयत्न म्हणजे साधनाच असते. एकदा एखाद्या कामात आपण कुशल झालो की त्याची सवय होते आणि मग ते काम आपल्या हातून पुष्कळसे यांत्रिक पद्धतीने होत राहते. म्हणजे आपण त्या कामापुरते सिद्ध होतो. त्यामुळे सगळेच मानव साधनाही करतात आणि सिद्धही होतात.

लोभ, क्रोध, मोह, भय, आक्रमक वृत्ती, ईर्षा इत्यादी गुण मानवांच्या प्रकृतीत जन्मतः असतातच. त्याचप्रमाणे सहानुभूती, वात्सल्य, दया, परोपकार, त्याग इत्यादी गुणही सर्वांमध्ये असतात. फक्त या सर्व गुणांचे मिश्रण मात्र व्यक्तीगणिक वेगवेगळे असते. जे गुण स्वतःचे व इतरांचे नुकसान करतात, त्यांना आपण अवगुण म्हणतो आणि ज्या गुणांमुळे आपला व इतरांचा विकास होतो त्यांना आपण सद्गुण म्हणतो.




ज्याला आम्ही सायन्स म्हणतो ते विज्ञान बाह्य सृष्टीचे तटस्थतेने व एकाग्रतेने निरीक्षण करून सृष्टी-रचनेतील मुलभूत तत्वांचे संशोधन करते. अशाच प्रकारचे निरीक्षण व संशोधन आपल्या जाणीवेला एकाग्र करून आपल्या आतील सृष्टीचे व बाह्य सृष्टीमधील आजवर अज्ञात अथवा गुह्य असलेल्या अ-भौतिक जगतांचे व रचनांचे करता येऊ शकते, अशी भारतीय संस्कृतीची पूर्वापार धारणा आहे. केवळ हिंदूच नव्हे तर(चार्वाक/लोकायत वगळल्यास) अन्य सर्व धर्मांची व पंथांची देखील हीच समजूत असल्याचे आढळते. सजीव देहाबाहेर चेतनेचे/जाणिवेचे अस्तित्व नसते आणि जाणीव हा केवळ देहातील व विशेषतः मेंदूतील रासायनिक खेळांचा आविष्कार आहे, असे मानणारे लोक वरील समजुतीवर व धारणेवर आक्रमकपणे तुटून पडतात. मनःशांतीसाठी काही ध्यानविधी करण्यास मात्र त्यांची हरकत नसते. मेडिकल सायन्सला देखील अश्या ध्यान प्रकारांची मदतच होते. आपले पूर्वग्रह आणि आग्रह यांच्यापासून आपली जाणीव मोकळी करत जाणे व मनात उगवणाऱ्या भाव-भावना, वासना, विचार तटस्थपणे न्याहाळणे इथपर्यंत ध्यानाचे महत्व टीकाकार मानतात. परंतु आपल्या देहाबाहेर काही गुह्य शक्ती अथवा चेतना असू शकतात, असे ते स्वीकारू शकत नाही. त्या टीकाकारांनी तटस्थपणे व मोकळ्या मनाने म्हणजेच संशोधक वृत्तीने आणि एकाग्रतेने खरोखर काही शोधून पहिले की नाही, याची प्रस्तुत लेखकास माहिती नाही. परंतु देहाबाहेरील चेतनांचे अस्तित्व मात्र मला वेळोवेळी जाणवत आले आहे व अजूनही जाणवते. ज्यांना असे अस्तित्व जाणवते अशा अनेक लोकांनाही मी जवळून ओळखतो.

बाह्य सृष्टीतील अथवा आपल्या आतील काही गुह्य सामर्थ्यांकडून विशिष्ट शक्ती प्राप्त करावी व त्या शक्तीचा इतरांना लाभ करून द्यावा अथवा धाक बसवावा, अशा प्रकारची साधना भारतात हजारो वर्षांपासून काही लोक करत असतात.

श्रद्धावान सामान्यजन अश्या साधकांनाअथवा सिद्ध व्यक्तींना गुरु, महाराज, तपस्वी अथवा योगी मानून मनोमन प्रणाम करतात व काही व्यावहारिक लाभ मिळावा म्हणून याचनाही करतात. स्वतःला अशा प्रकारची सिद्धी प्राप्त झाली आहे, असा खोटा डांगोरा पिटणाऱ्या बाबा/बुवांचे त्यामुळे फावते व ते एक देखावा निर्माण करून भक्तांना आकर्षित करतात. परंतु खोटी डिग्री दाखवून जनतेची फसवणूक करणारे अथवा खोटी प्रलोभने दाखवून आर्थिक गुंतवणूक करण्यास भाग पाडणारे महाभागही सर्वच क्षेत्रांत असतात.

सामान्य जनांनी सावध होणे व समोर आलेल्या प्रलोभनाची चिकित्सक वृत्तीने छाननी करणे अत्यावश्यक आहे. ज्यांना खरोखर आध्यात्मिक साधना करावयाची आहे, अश्या व्यक्ती स्वतःमधील विकार शोधून ते विकार कमी अथवा नष्ट व्हावे यासाठी देखील प्रयत्नरत असतात. परंतु ज्यांना केवळ काही गुह्य जगतांमधून सिद्धी मिळवायची असते व त्या सिद्धीचा सदुपयोग अथवा दुरुपयोग करावयाचा असतो, अश्या साधकांचे/सिद्धांचे स्वतःमधील विकार दूर करण्याकडे फारसे लक्ष नसते. त्यामुळे एखाद्या बाबा, बुवा अथवा महाराजाजवळ काही विशिष्ट प्रकारची सिद्धी असली तरी तिच्या आधारे ते आपल्याला आग्रहाने अथवा भय दाखवून बांधून ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत की काय, याकडे श्रद्धाळूचे लक्ष असायला हवे. त्या बाबामधील लोभ, आक्रमकता, मोह अथवा भयाचे स्वतःला साधन होऊ न देणे भक्ताच्या हाती असते. पण त्यासाठी भक्तांमध्ये देखील विवेक व तर्कशक्ती वाढून लोभ, मोह, सुडभावना, ईर्षा इत्यादी विकारांचे प्रमाण कमी होणे अत्यावश्यक आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याला त्यामुळेच महत्वही आहे.

**किशोर देशपांडे**

# निवडणुका:लोकशाहीच्या नावे मतांच्या खरेदी-विक्रीचा बाजार

आपल्या देशात एकेकाळी निवडणूक म्हटल्यानंतर त्याच्यावर पुरुषी वर्चस्व राहात होते. मग अगदी सर्वाधिक पुरुष उमेदवार निवडणूक लढवीत होते. आणि मतदारालाही पुरुष मतदारांची संख्या सर्वाधिक राहात होती. पण गेल्या काही वर्षात निवडणुकांमध्ये महिलांसाठी आरक्षण दिले जाऊ लागले. आणि महिला मोठ्या प्रमाणावर निवडणूही येऊ लागल्या आहेत. परंतु गेल्या दहा वर्षातला सर्वात मोठा बदल असा आहे की, अनेक राज्यांमध्ये मतदाराच्या टक्केवारीत महिला मतदारांची संख्या सर्वाधिक असल्याचे पाहायला मिळाले आहे. आणि हे प्रत्येक निवडणुकीत वाढत आहे. महिलांचा हा मतदान करण्याचा उत्साह एकाएकी किंवा अचानकपणे वाढलेला नाही. सातत्याने महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी भरमसाठ योजना घोषित केल्या गेल्या आहेत. तर विधानसभा निवडणुकीपूर्वी महिलांसाठीच्या या योजनांमध्ये सतत भर पडत आली आहे. या योजनांचा थेट लाभ महिलांना मिळत असल्याने त्या योजना चालू राहाव्यात, त्याचे फायदे मिळत राहण्यासाठी या अपेक्षांनी महिला मतदार सर्वाधिक संख्येने मतदानाला येत आहेत. ज्यामध्ये रोख रक्कम थेट महिलांच्या खात्यात जमा करण्यापासून ते मोफत एसटी प्रवास, महिलांना मोफत शिक्षण यासारख्या एक ना अनेक योजना ठिकठिकाणी राबवल्या जातात.



देशात आतादेखील अलीकडेच जाहीर झालेल्या आसाम, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि पॉंडेचरी केंद्रशासीत प्रदेश या पाच राज्यांमध्येसुद्धा जिथे निवडणुका या चालू महिन्यात होणार आहेत. तिथे देखील अशाच महिलाविषयक योजना अंमलात आणल्या जात आहेत. पश्चिम बंगालमधून लाडकी बहीण योजनेप्रमाणेच लोखिर भांडार योजना शिवाय मुलींच्या शिक्षणासाठी कन्याश्री योजना, मुलींच्या विवाहासाठी रुपश्री योजना अशा योजना आसाममध्येही सुरु आहेत. तामिळनाडूमध्ये महिलांना विवाहासाठी दिली जाणारी मदत शिवाय मोफत प्रवास, केरळमध्ये कुटुंबश्री योजना शिवाय मोफत आरोग्य आणि महिलांसाठीची पेन्शन योजना राबविली जात आहे. मध्य प्रदेशात यापूर्वीच लाडली बहीण योजना सुरु आहे. दिल्लीतही महिलांसाठीचा मोफत प्रवास राबवला जातो.

महाराष्ट्रात देखील मध्य प्रदेशाच्या योजनेची अंमलबजावणी करून लाडकी बहीण योजना राबविली जात आहे. त्या कारणांमुळेच भारताच्या निवडणूक प्रक्रियेत महिला मतदारांचा वाढता असलेला टक्का हा एक महत्वपूर्ण बदल ठरतो.

आपल्या देशातील लोकशाही व्यवस्थेचा विचार केला तर ज्या ठिकाणी निष्पक्ष दाबावविरहित आणि कोणत्याही प्रलोभनाशिवाय मतदान होणे अभिप्रेत आहे त्या मतदानाची जागा आता वेगवेगळ्या प्रलोभन योजनांनी घेतलेली आहे. विशेष म्हणजे मतदारांचादेखील या सगळ्याच निवडणूक प्रक्रियेकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगाने बदलला आहे. कारण राजकीय लोक सत्ता आणि अधिकारांचा गडगंज वापर म्हणजे आमच्या मतावर ते निवडून येतात आणि भरमसाठ अमाप पैसा कमावतात. अशी एक राजकारण्यांविषयीची समजूत लोकांमध्ये निर्माण झालेली आहे. अशा परिस्थितीत जर सरकारी योजनांमधून आपलाही फायदा होत असेल तर तो करून घ्याला पाहिजे. आणि म्हणूनच जे सरकार अशा योजना जाहीर करेल, त्यांच्या बाजूने मतदान करण्याचीही एक विचित्र मानसिकता विकसित होते आहे. ही कितपत योग्य आहे किंवा त्यातून लोकशाही व्यवस्था भक्कम होण्याऐवजी आणखीनच कमजोर किंवा भ्रष्ट होण्याचा मोठा धोका आहे.

देशातील निवडणुका म्हणजे लोकशाहीचा मोठा उत्सव आहे असे म्हणून लोकांमधला उत्साह वाढवण्याचा प्रयत्न होत असतो. परंतु ज्या पद्धतीचा प्रचार, ज्या पद्धतीचे जाहीरनामे, मोठमोठी आश्वासने किंवा आमिषे दाखवली जातात. त्यावरून तो लोकशाहीचा उत्सव नसून एक प्रकारची यात्राच म्हणता येऊ शकेल असे वाटते. केवळ देशहित आणि त्यासाठी आवश्यक असलेली लोकशाही व्यवस्था अधिक संवर्धित कारण्याच्या प्रामाणिक हेतूने ज्यावेळी मतदान होईल, त्यावेळेला खऱ्या अर्थाने मतदानाचे कर्तव्य केल्याचे मोठे समाधान मिळू शकेल.पण प्रत्यक्षात राजकीय पक्ष ज्या पद्धतीने निवडणुका लढवतात किंवा त्यांचा एकमेकांविरुद्ध ज्या पद्धतीने प्रचार सुरु असतो. तो पाहिला तर प्रत्यक्ष लोकशाही प्रक्रियेपेक्षा राजकीय स्वार्थाचाच मोठा धिंगाणा अधिक प्रमाणात होत असलेला पाहायला मिळतो. गेल्या दहा वर्षांपासून ज्या ज्या काही निवडणुका देशात झालेल्या आहेत त्यात मतदारांना अधिक आकर्षित करण्याकरिता ज्या पद्धतीची आमिषे दाखवली जातात, ती पाहिल्यानंतर निवडणुका म्हणजे लोकशाही नावाने मतांच्या खरेदी-विक्रीचा मोठा बाजार असल्याचेच दिसून येते.

**प्रा. मधुकर चुटे**
मो.९४२०५६६४०४

# आखाती देशांमधील मृत्यूची आकडेवारी

परदेशांत कार्यरत असणाऱ्या भारतीय कामगारांच्या स्थिता विषयी अस्वस्थ करणारी आकडेवारी समोर आली. त्यानुसार, मागील ५ वर्षांत परकी भूमीत तब्बल ३७ हजार ७४० भारतीय कामगारांच्या मृत्यूची नोंद झाली. म्हणजेच, दररोज सरासरी २० जणांचा मृत्यू झाला. ते प्रमाण आखाती देशांत सर्वाधिक असल्याचे स्पष्ट झाले. भारत सरकार भारतीय कामगारांच्या सुरक्षेसाठी विविध देशांशी सामंजस्य करार करत आहे आणि ई-मायग्रेट पोर्टलद्वारे त्यांच्या सुरक्षेवर लक्ष ठेवण्याचा प्रयत्न करत आहे तरी देखील आखाती देशांमध्ये कामगारांचा मृत्यू मोठ्या प्रमाणात होत आहे ही अतिशय चिंताजनक बाब आहे.परदेशात जाऊन पैसे कमावण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारतीयांसाठी वास्तव अत्यंत विदारक असल्याचे सरकारी आकडेवारीवरून समोर आले आहे.



परराष्ट्र राज्यमंत्री किर्तीवर्धन सिंह यांनी राज्यसभेत एक लेखी उत्तर दिले. त्यामध्ये वर्ष २०२१ ते २०२५ या कालावधीतील आकडेवारी उपलब्ध करण्यात आली. मात्र, मृत्यूची नेमकी कारणे नमूद करण्यात आली नाहीत. परदेशांत २०२१ यावर्षी सर्वाधिक ८ हजार २३४ भारतीय कामगारांचे निधन झाले.त्यापुढील वर्षी ती संख्या घटून ६ हजार ६१४ इतकी नोंदली गेली. त्यानंतरच्या ३ वर्षांत त्या संख्येत वाढ झाल्याचे दिसते. त्यानुसार, वर्ष २०२३ मध्ये ७ हजार २९१, त्यापुढील वर्षी ७ हजार ७४७, तर मागील वर्षी (२०२५) परकी भूमीत ७ हजार ८५४ भारतीय कामगार दगावले.

भारतीय कामगारांच्या मृत्यूचे आखाती देशांतील एकुणात प्रमाण तब्बल ८६ टक्के आहे. मागील ५ वर्षांत संयुक्त अरब अमिरातीत(यूएई) सर्वाधिक १२ हजार ३८० भारतीय कामगार मृत्युमुखी पडले.त्याखालोखाल सौदी अरेबियात ती संख्या ११ हजार ७५७ इतकी नोंदली गेली. कुवेतमध्ये ३ हजार ८९०, ओमानमध्ये २ हजार ८२१, मलेशियात १ हजार ९१५, तर कतारमध्ये १ हजार ७६० भारतीय कामगारांनी प्राण गमावले.मागील ५ वर्षांच्या कालावधीत परदेशांतील कार्यस्थळी होणाऱ्या पिळवणुकीशी संबंधित भारतीय कामागारांच्या ८० हजार ९८५ तक्रारी भारतीय दूतावासांना प्राप्त झाल्या.त्यापैकी सर्वाधिक १६ हजार ९६५ तक्रारी यूएईशी संबंधित आहेत. परदेशांत भारतीय कामगारांना भेडसावणाऱ्या प्रमुख समस्यांमध्ये वेतनातील विलंब किंवा वेतन न मिळण्याचा समावेश आहे.सरकारी आकडेवारीमध्ये अनेक मृत्यूंची नोंद 'नैसर्गिक मृत्यू' म्हणून केली जाते.

कडक उन्हात दीर्घकाळ काम केल्यामुळे हृदय आणि श्वसनसंस्थेवर ताण येतो, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. अत्यंत उष्णता हे देखील एक महत्त्वाचे कारण आहे. आखाती देशांमधील तापमान अनेकदा ५० अंश सेल्सिअसच्या वर जाते. अशा हवामानात बाहेर काम केल्यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन उष्माघात होऊ शकतो. कामगारांना अनेकदा दिवसाला १४ तासांपर्यंत काम करावे लागते, ज्यामुळे त्यांना पुरेशी विश्रांती मिळत नाही.बांधकाम क्षेत्र किंवा धोकादायक उद्योगांमध्ये काम करताना सुरक्षिततेच्या साधनांचा अभाव असल्यामुळे अनेक कामगार अपघातात प्राण गमावतात.

कामगार ज्या ठिकाणी राहतात, तिथे अनेकदा गर्दी असते आणि स्वच्छतेचा अभाव असतो, ज्यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. मानसिक व आर्थिक ताण या मुळे देखील कामगारांचा मृत्यू होत आहे.पासपोर्ट जप्त करणे, पगार वेळेवर न मिळणे किंवा कामाचे अधिकार नाकारले जाणे अशा तक्रारी मोठ्या प्रमाणावर आहेत. वाढता मानसिक ताण, कर्ज आणि घरच्यांपासून दूर राहिल्यामुळे काही कामगार टोकाचे पाऊल उचलतात.

आखाती देशांमध्ये भारतीय कामगारांचे मृत्यू टाळण्यासाठी वैयक्तिक दक्षता, शासकीय हस्तक्षेप आणि कायदेशीर संरक्षण यांचा एकत्रित वापर आवश्यक आहे.कामगारांनी नेहमी भारत सरकारच्या ई-मायग्रेट पोर्टलद्वारेच परदेश प्रवास करावा. हे पोर्टल नियोक्ते आणि एजंट या दोघांसाठीही पारदर्शकता सुनिश्चित करते. फसवणूक आणि अवैध स्थलांतर टाळण्यासाठी केवळ परराष्ट्र मंत्रालयाने मान्यता दिलेल्या भरती एजंटांचीच सेवा घ्यायला पाहिजे.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
मो.९५६१५९४३०६

# धर्मांतर, अनुसूचित जातींचा दर्जा आणि घटनात्मक चौकटीचा विचार

भारतीय राज्यघटना ही विविध मूलभूत तत्त्वांवर आधारलेली आहे. न्याय , स्वातंत्र्य , समता आणि बंधुता ही तिची प्रमुख मूल्ये आहेत. या तत्त्वांपैकी सामाजिक न्याय हे एक महत्त्वाचे तत्त्व असून, ते विशेषतः ऐतिहासिकदृष्ट्या वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या उन्नतीसाठी केंद्रस्थानी आहे. याच उद्देशाने अनुसूचित जाती ही संकल्पना विकसित करण्यात आली. अस्पृश्यता , सामाजिक बहिष्कार आणि संरचनात्मक अन्याय यांचा दीर्घकालीन अनुभव लक्षात घेऊन या वर्गाला विशेष संरक्षण देण्यात आले आहे.

या संकल्पनेचा केंद्रबिंदू समजून घेतला, तर अनुसूचित जातींचा दर्जा हा केवळ सामाजिक ओळख नसून, तो एक घटनात्मक मान्यता आणि कायदेशीर पात्रता आहे. राज्यघटनेतील कलम ३४१ नुसार राष्ट्रपती अनुसूचित जातींची यादी अधिसूचित करतात आणि त्या यादीत कोणताही बदल करण्याचा अधिकार केवळ संसदेकडे असतो. याचा अर्थ असा की एण दर्जा हा वैयक्तिक दाव्याचा विषय नसून, तो राज्यघटनेने निश्चित केलेला एक औपचारिक दर्जा आहे.

१९५० च्या राष्ट्रपती आदेशाने या व्यवस्थेला स्पष्ट रूप दिले. सुरुवातीला हा दर्जा केवळ हिंदू धर्मीयांसाठी मर्यादित ठेवण्यात आला. त्यामागील तत्त्व असे की जातव्यवस्थेमुळे निर्माण झालेला भेदभाव हा मुख्यतः हिंदू सामाजिक रचनेशी संबंधित होता. नंतर सामाजिक आणि राजकीय वास्तव लक्षात घेऊन १९५६ मध्ये शीख आणि १९९० मध्ये बौद्ध धर्मीयांचा समावेश करण्यात आला. मात्र, ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्म स्वीकारणाऱ्यांना या यादीत समाविष्ट करण्यात आलेले नाही. यावरून हे स्पष्ट होते की एण दर्जा हा केवळ आर्थिक किंवा शैक्षणिक मागासलेपणावर आधारित नसून, तो विशिष्ट सामाजिक-ऐतिहासिक संदर्भाशी जोडलेला आहे.

याच संदर्भात आंध्र प्रदेशातील हे प्रकरण एक महत्त्वाचा टप्पा ठरते. चिंताडा आनंद, जे मूळतः अनुसूचित जातीतील होते, त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला आणि केवळ औपचारिक धर्मांतर करून थांबले नाहीत, तर जवळपास दहा वर्षांहून अधिक काळ पाद्री म्हणून कार्य केले. त्यांनी चर्चमधील धार्मिक कार्यक्रम, प्रवचन आणि समाजकार्यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. म्हणजेच, त्यांची धार्मिक ओळख केवळ कागदोपत्री नव्हती, तर ती त्यांच्या संपूर्ण जीवनपद्धतीत प्रतिबिंबित होत होती.

या पार्श्वभूमीवर त्यांनी अक्कला रामिरेड्डी आणि इतरांविरुद्ध अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत तक्रार दाखल केली. या तक्रारीत जातीय अपमान आणि मारहाणीचे आरोप करण्यात आले होते. मात्र, या प्रकरणाने एक अत्यंत मूलभूत प्रश्न निर्माण केला.धर्मांतरानंतर, विशेषतः दीर्घकाळ नव्या धर्मात राहिल्यानंतर, व्यक्तीला पुन्हा एण म्हणून कायदेशीर संरक्षण मागण्याचा अधिकार राहतो का?

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने या प्रश्नाचा सखोल आणि तर्कशुद्ध विचार केला. न्यायालयाने स्पष्ट केले की संबंधित व्यक्तीने दीर्घकाळ ख्रिश्चन धर्म स्वीकारून त्या धर्मानुसार जीवन व्यतीत केले आहे. त्यामुळे १९५० च्या राष्ट्रपती आदेशाच्या चौकटीत ती व्यक्ती अनुसूचित जातींच्या व्याख्येत बसत नाही. न्यायालयाने विशेषत्वाने नमूद केले की केवळ जात प्रमाणपत्र अस्तित्वात असल्याने एण दर्जा कायम राहतो, असे मानता येत नाही. कायदेशीर पात्रता ही प्रत्यक्ष सामाजिक आणि धार्मिक वास्तवावर आधारित असते.

या निरीक्षणाच्या आधारे न्यायालयाने संबंधित तक्रार रद्द केली. या निर्णयातून एक स्पष्ट संदेश समोर येतो.कायद्याचा लाभ हा त्याच्या मूळ उद्देशाशी सुसंगत असला पाहिजे.या निर्णयाचा पाया सर्वोच्च न्यायालयाने पूर्वी दिलेल्या निर्णयांमध्ये दिसून येतो. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की अनुसूचित जातींचा दर्जा हा ऐतिहासिक सामाजिक भेदभावाच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. हा भेदभाव मुख्यतः पारंपरिक जातव्यवस्थेशी निगडित आहे. त्यामुळे एखादी व्यक्ती हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्म सोडून इतर धर्म स्वीकारते, तेव्हा त्या सामाजिक संदर्भात मूलभूत बदल होतो आणि त्या अनुषंगाने एण दर्जा लागू राहत नाही.

याच ठिकाणी सर्वोच्च न्यायालय आणि आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या निर्णयांमधील संबंध अत्यंत स्पष्ट होतो. सर्वोच्च न्यायालयाने जे तत्त्व निश्चित केले, त्याच तत्त्वाचा प्रत्यक्ष वापर आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने केला. म्हणजेच, एकाने मार्गदर्शक चौकट दिली आणि दुसऱ्याने त्या चौकटीत राहून निर्णय दिला. न्यायव्यवस्थेतील ही सुसंगती लोकांच्या विश्वासाला बळकटी देते.

या चर्चेत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांतील भिन्नता समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. SC वर्गाची संकल्पना ही जातव्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या सामाजिक भेदभावावर आधारित आहे. अस्पृश्यता आणि सामाजिक बहिष्कार हे त्याचे मुख्य घटक आहेत. याउलट एऊ वर्गाची ओळख ही भौगोलिक, सांस्कृतिक आणि पारंपरिक जीवनशैलीवर आधारित आहे. आदिवासी समाजाची स्वतंत्र ओळख, त्यांची परंपरा, भाषा आणि जीवनपद्धती ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे ST वर्गासाठी धर्माची अट लागू होत नाही. एखाद्या व्यक्तीने धर्मांतर केले तरी तिची आदिवासी ओळख बदलत नाही, कारण ती धार्मिक नसून सांस्कृतिक आणि सामाजिक घटकांवर आधारित असते. हा फरक घटनात्मक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे.

धर्मांतराच्या संदर्भात एक सूक्ष्म पण महत्त्वाचा प्रश्न पुढे येतो. काही वेळा व्यक्ती प्रत्यक्षात धर्मांतर स्वीकारते, पण ते सार्वजनिकरीत्या जाहीर करत नाही. ती आपल्या वैयक्तिक जीवनात नव्या धर्माचे पालन करते, पण अधिकृत नोंदी बदलत नाही आणि समाजात पूर्वीचीच ओळख वापरते. अशा परिस्थितीत कायदेशीर मूल्यांकन करताना न्यायालये केवळ कागदोपत्री पुराव्यावर अवलंबून राहत नाहीत. ते प्रत्यक्ष वर्तन, सामाजिक ओळख आणि उपलब्ध पुरावे यांचा एकत्रित विचार करतात. त्यामुळे अशा परिस्थितीला एक 'ग्रेझोन' म्हणून पाहिले जाते, जिथे प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्रपणे आणि सखोल विचार करावा लागतो.

या सर्व चर्चेतून एक व्यापक निष्कर्ष पुढे येतो.अनुसूचित जातींचा दर्जा हा स्थिर नसून, तो विशिष्ट सामाजिक संदर्भाशी जोडलेला आहे. त्या संदर्भात बदल झाल्यास, त्याचे कायदेशीर परिणामही बदलतात. न्यायालयांनी या विषयावर दिलेले स्पष्टीकरण हे घटनात्मक मर्यादा आणि सामाजिक वास्तव यांचा समतोल राखणारे आहे.धर्मांतर आणि अनुसूचित जातींचा दर्जा हा विषय केवळ कायद्याचा मुद्दा नाही; तो भारतीय समाजाच्या गाभ्याशी संबंधित आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेली तत्त्वे आणि आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने केलेला त्यांचा उपयोग यामुळे या विषयाला स्पष्ट दिशा मिळते.

अखेरीस, सामाजिक न्याय ही केवळ सवलतींची रचना नाही; ती एक जबाबदारी आहे.ज्यात कायद्याचा उद्देश, त्याची अंमलबजावणी आणि सामाजिक वास्तव यांच्यातील संतुलन जपणे अत्यावश्यक असते. हे संतुलन जिथे राखले जाते, तिथेच लोकशाही अधिक सक्षम, अधिक विश्वासार्ह आणि अधिक न्याय्य बनते.आणि हाच या संपूर्ण चर्चेचा खरा अर्थ आहे.

**आशिष अ. गावंडे**
अमरावती
मो.९१७५६२८६८६

ऑपरेशन 'प्रहार'चा धडाका

# कोलंबी शिवारात अवैध डिझेल साठ्यावर छापा

## ७१ हजारांचा मुद्देमाल जप्त; एकावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू

■ प्रतिनिधी | अकोला ■

*जिल्ह्यात सुरू असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' मोहिमेला वेग आला असून, अवैध इंधन साठेबाजांवर पोलिसांनी पुन्हा एकदा कडक कारवाई केली आहे. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने बोरगाव मंजू पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोलंबी शिवारात छापा टाकत अवैध डिझेल साठा उध्वस्त केला.*



मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ३ एप्रिल २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली. पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने संयुक्त पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने धाड टाकली. यावेळी शेख मोहम्मद शेख इब्राहिम (वय २५, रा. कुरणखेड) हा इसम घटनास्थळी आढळून आला. त्याच्याकडे कोणतीही परवानगी नसताना मोठ्या प्रमाणात डिझेल साठवून ठेवण्यात आले होते.

छाप्यात ७५० लिटर डिझेल (अंदाजे किंमत ६७,५००) तसेच ७ रिकाम्या प्लास्टिक टाक्या (३,५००) असा एकूण ७१ हजारांचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत कलम ३ व ७ नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईत पोलिस उपनिरीक्षक विष्णु बोडखे, दशरथ बोरकर, हेड कॉन्स्टेबल गोकुळ चव्हाण, पोलीस कॉन्स्टेबल स्वप्निल खेडकर, अन्सार शेख, चालक पोलीस कॉन्स्टेबल मनीष ठाकरे यांचा सहभाग होता. तसेच पुरवठा विभागाकडून निरीक्षण अधिकारी विश्वजीत लिंगायत, विश्वजीत चांदोरकर, अतुल कोनापटे, तुषार चिंचोळे व तहसील पथकातील कर्मचाऱ्यांनीही सक्रिय भूमिका बजावली. दरम्यान, जिल्ह्यात सुरू असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अवैध साठेबाजांविरुद्ध अशाच धडक कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

# गंभीर रुग्णावर उपचारास नकार?

## मळसूर आरोग्य केंद्रातील धक्कादायक प्रकार

### - गुड फ्रायडेच्या सुट्टीचे कारण पुढे
### - दोन तास रुग्ण उपचाराविना तळफळला

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील मळसूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गंभीर रुग्णावर उपचार करण्यास नकार दिल्याचा धक्कादायक प्रकार शुक्रवारी (दि. ३ एप्रिल) सकाळी उघडकीस आला आहे. या घटनेमुळे आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित डॉक्टरवर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

मळसूर येथील दिनेश सुपाची बघे (वय ३४) यांची गुरुवारी मध्यरात्री अचानक प्रकृती खालावली. रक्तदाब कमी होणे, छातीत वेदना, हात-पाय दुखणे तसेच श्वास घेण्यास त्रास अशी गंभीर लक्षणे दिसत होती. दरम्यान, रात्री वादळी वाऱ्यामुळे त्यांना तत्काळ रुग्णालयात जाता आले नाही.

शुक्रवारी सकाळी सुमारे ८ वाजता ते उपचारासाठी मळसूर आरोग्य केंद्रात पोहोचले. मात्र, त्या दिवशी गुड फ्रायडेची शासकीय सुट्टी असल्याने डॉक्टर उपलब्ध नसल्याचे कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात आले. नातेवाईकांनी संबंधित डॉक्टरांशी संपर्क साधला असता, सुट्टीचे कारण देत उपचार करण्यास नकार दिल्याचा आरोप रुग्णाने केला आहे.

दरम्यान, तब्बल दोन तास रुग्ण उपचारासाठी तळमळत होता. अखेर केंद्रातील एका महिला कर्मचाऱ्यांनी तात्पुरते उपचार करून रुग्णाला दिलासा दिला. मात्र, गंभीर रुग्णालाही सुट्टीचे कारण देत उपचार नाकारणे हा गंभीर प्रकार असल्याने संबंधित डॉक्टरवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

या घटनेमुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून प्रशासनाने तत्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.




**'माझ्यासोबतच नव्हे, अनेक वेळा असे प्रकार घडले'**

'छातीत दुखत होते, श्वास घेण्यास त्रास होत होता. सकाळी रुग्णालयात गेलो असता सुट्टी असल्याचे सांगून डॉक्टरांनी उपचार नाकारले. दोन तास वाट पाहिल्यानंतर महिला कर्मचाऱ्यांनी तात्पुरता उपचार केला. हा प्रकार केवळ माझ्यासोबतच नाही, यापूर्वीही अनेकदा घडला आहे.'

**दिनेश बघे,** रुग्ण, मळसूर

**'सुट्टीत ओपीडी बंद, मात्र गंभीर रुग्णांवर उपचार होतात'**

'सुट्टीच्या दिवशी ओपीडी बंद असते, मात्र गंभीर रुग्णांवर उपचार केले जातात. त्या दिवशीही दोन गंभीर रुग्णांवर उपचार करण्यात आले. ओपीडी बंद असताना सर्वसाधारण रुग्णांवर उपचार करणे शक्य नसते.'

**डॉ. अंश अग्रवाल,** आरोग्य केंद्र मळसूर

**'सुट्टीचा हवाला देत डॉक्टरांनी येण्यास नकार'**

'घटनेची माहिती मिळताच मी डॉक्टरांना फोन करून उपचार करण्याची विनंती केली. मात्र त्यांनी 'सुट्टी आहे, मी येणार नाही' असे स्पष्ट सांगितले. 'आलो तर सुट्टीचा काय फायदा' अशी भाषा वापरली. अशा डॉक्टरांची हकालपट्टी करणे गरजेचे आहे.'

**शुभम थिटे,** सामाजिक कार्यकर्ते, मळसूर

# पहाडसिंगी बससेवा ठप्प : विद्यार्थ्यांची पायपीट

## अतिदुर्गम भागातील प्रवाशांचे हाल; महामंडळाचे दुर्लक्ष

■ प्रतिनिधी | खेट्री ■

अकोला जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या पातूर तालुक्यातील अतिदुर्गम पहाडसिंगी येथे राज्य परिवहन महामंडळाची बससेवा गेल्या महिनाभरापासून ठप्प असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. बसच्या तिन्ही फेऱ्या बंद असल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दररोज पायपीट करावी लागत असून, प्रवाशांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत.



बससेवा बंद असल्याचा सर्वाधिक फटका शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बसत आहे. अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी लांब अंतर पायी चालत जावे लागत असल्याने त्यांच्या उपस्थितीवर परिणाम होत असून, शिक्षणावरही विपरीत परिणाम होत आहे.

दरम्यान, बससेवा बंद असल्याने रुग्ण, शेतकरी आणि कामगार वर्गालाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत दवाखान्यात पोहोचविणे कठीण झाले असून, शेतकऱ्यांना शेतमाल बाजारपेठेत नेण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत.

ग्रामस्थांनी याबाबत संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी केल्या; मात्र अद्याप कोणतीही दखल घेतली नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. बसफेऱ्या तात्काळ सुरू कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

'पहाडसिंगी येथे येणाऱ्या तिन्ही बस फेऱ्या महिनाभरापासून बंद आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची शिक्षणासाठी पायपीट सुरू असून प्रवाशांचे हाल होत आहेत. वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे.'

**सदाशिव चव्हाण,** ग्रामस्थ

## शिवर येथे हनुमान जयंती उत्साहात

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगर पालिका प्रभाग क्रमांक १४ अंतर्गत येणाऱ्या शिवर येथील अतिशय प्राचीन व जागृत श्री हनुमान मंदिर संस्थान येथे हनुमान जयंती निमित्त गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन उत्साहात करण्यात आले.

याप्रसंगी सकाळी श्री हनुमान मूर्तीचे विधिवत पूजन, अभिषेक व सामूहिक आरती करण्यात आली. यानंतर शेगाव येथील हभप कैलास महाराज गावंडे यांचे कीर्तन पार पडले.

## सह दुय्यम निबंधक पातूर कार्यालयाची महसूल उद्दिष्टपूर्ती शंभर टक्केच्या पार



■ प्रतिनिधी | पातूर ■

गेल्या आर्थिक वर्ष २०२५-२०२६ साठी नोंदणी व मुद्रांक विभागाकडून सह दुय्यम निबंधक, पातूर कार्यालयाला सात कोटी रुपयांच्या महसूल वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले होते.या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हे उद्दिष्ट १०१.९५ टक्क्यांपर्यंत पूर्ण करण्यात यश आले आहे. एकूण ७ कोटी १३ लाख रुपयांचा महसूल जमा करण्यात आला असून,हे यश उल्लेखनीय मानले जात आहे.या महसूलात मुद्रांक शुल्क,नोंदणी शुल्क,ई-फायलिंगद्वारे मिळालेला महसूल,मुद्रांक विक्री तसेच चुकविलेला मुद्रांक शुल्क वसुली यांचा समावेश आहे.विविध माध्यमांचा प्रभावी वापर करून महसूल वाढवण्यात आला आहे.कार्यालयाच्या या यशामागे सक्षम नियोजन,नियमित आढावा बैठका आणि नागरिकांना दिली जाणारी जलद व पारदर्शक सेवा यांचा मोठा वाटा आहे.तसेच,ऑनलाइन प्रणालींचा वाढता वापर आणि ई-फायलिंग प्रक्रियेमुळे व्यवहार अधिक सुलभ झाले असून,त्याचा सकारात्मक परिणाम महसूल वाढीवर दिसून आला आहे.

# 'प्रोजेक्ट त्रिनेत्र'चा राष्ट्रीय सन्मान : अकोला पोलीस दलाचा झेंडा देशपातळीवर फडकला

### ६९ व्या अखिल भारतीय पोलीस ड्युटी मीटमध्ये 'बेस्ट आयटी प्रोजेक्ट ट्रॉफी'; एसपी अर्चित चांडक यांचा नागपूर येथे सत्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■

आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्याच्या दिशेने अकोला पोलीस दलाने उचललेले पाऊल देशभरात गाजले आहे. 'प्रोजेक्ट त्रिनेत्र' या अभिनव उपक्रमाला ६९ व्या अखिल भारतीय पोलीस ड्युटी मीट (AIPDM) २०२५-२६ मध्ये 'बेस्ट आयटी प्रोजेक्ट ट्रॉफी' मिळाल्याने अकोला जिल्ह्यासह महाराष्ट्र पोलिसांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

नागपूर येथे ३ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या समारोप समारंभात केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांच्या हस्ते, महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक सदानंद दाते व अतिरिक्त पोलीस महासंचालक (सीआयडी) सुनील रामानंद यांच्या प्रमुख उपस्थितीत अकोला पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

अखिल भारतीय पोलीस ड्युटी मीट अंतर्गत संगणक जागरूकता स्पर्धेतील इव्हेंट-ष्ट मध्ये राज्य व केंद्रशासित प्रदेश श्रेणीमध्ये महाराष्ट्र राज्याला 'एनसीआरबी रनिंग ट्रॉफी' देण्यात आली. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या 'प्रोजेक्ट त्रिनेत्र'ची सर्वोत्कृष्ट आयटी प्रकल्प म्हणून निवड करण्यात आली.

एनसीआरबी, नवी दिल्लीकडे पाठविण्यात आलेल्या पाच आयटी प्रकल्पांमधून 'त्रिनेत्र'ची अंतिम निवड झाली होती. त्यानंतर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी दिल्ली येथे या प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले होते. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्वतः या प्रकल्पाचे प्रभावी सादरीकरण केले होते.



**गुन्हेगारी नियंत्रणासाठी प्रभावी तंत्रज्ञान**

'प्रोजेक्ट त्रिनेत्र' हा अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प असून, गुन्हेगारांची ओळख पटविणे, गुन्हे प्रतिबंध करणे आणि पोलीस कार्यक्षमता वाढविणे या उद्देशाने विकसित करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे पोलीस यंत्रणेला जलद व अचूक माहिती मिळत असून, गुन्हे उघडकीस आणण्याचा वेग वाढला आहे.

विशेष म्हणजे, या प्रकल्पाच्या अंमलबजावणीनंतर अवघ्या सहा महिन्यांत सराईत गुन्हेगारांच्या गुन्हेगारीत तब्बल ४८ टक्क्यांनी घट झाल्याचा उल्लेखनीय परिणाम समोर आला आहे.

**स्थानिक युवा उद्योजकाचे मोलाचे योगदान**

या यशामागे अकोल्यातील युवा उद्योजक किसन पनपालिया यांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे अधोरेखित करण्यात आले. स्थानिक पातळीवर विकसित झालेला हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर झेपावल्याने 'मेक इन लोकल'ची प्रभावी झलक पाहायला मिळाली.

**पारदर्शक व गतिमान पोलीस सेवा**

'त्रिनेत्र'मुळे पोलीस सेवांमध्ये पारदर्शकता वाढली असून, नागरिकांच्या सुरक्षिततेत लक्षणीय सुधारणा झाली आहे. माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून पोलीस दल अधिक गतिमान व उत्तरदायी बनल्याचे चित्र दिसत आहे.

**अकोला व महाराष्ट्राचा गौरव**

या उल्लेखनीय यशामुळे अकोला जिल्ह्याचे नाव देशपातळीवर झळकले असून, महाराष्ट्र पोलीस दलाची प्रतिमा अधिक भक्कम झाली आहे. या यशाबद्दल पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी प्रकल्पात योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# उष्माघातावर प्रतिबंधासाठी होमिओपॅथी औषधांचे वितरण

## डॉ. संदीप चव्हाण यांचे आरोग्य मार्गदर्शन



■ प्रतिनिधी | अकोला ■

वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर आरोग्याची काळजी घेणे अत्यावश्यक बनले असताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला येथे आरोग्यविषयक जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी होमिओपॅथी तज्ञ डॉ. संदीप चव्हाण यांनी उपस्थितांना उष्णतेपासून बचावासाठी आवश्यक उपाययोजना, आहारातील बदल तसेच जीवनशैली कशी असावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या प्रसंगी उष्माघात प्रतिबंधासाठी सनकुल होमिओपॅथीक औषधीचे वितरण करण्यात आले. तीव्र उन्हाळ्यात उष्माघाताचा धोका लक्षात घेता हा उपक्रम राबविण्यात आला असल्याचे आयोजकांनी सांगितले.(कार्यक्रमाला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या प्रभारी सचिव न्यायाधीश सौ. रोशनी बन्सल, तसेच चौथे संयुक्त दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर व अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी श्री. निखिल बन्सल यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय प्राधिकरणातील अधिकारी, कर्मचारी, वकील बांधव व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत, अशा आरोग्यविषयक जनजागृती मोहिमांची गरज अधोरेखित केली. या कार्यक्रमामुळे कर्मचारी व वकीलांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढण्यास मदत होणार असून, उष्णतेच्या दुष्परिणामांपासून बचाव करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे.- उगवा येथील भू-मापन गट क्र - ६०० याचे एकूण क्षेत्र ०१ हे. ५१ आर, यापैकी लिहून देणार **१) प्रकाश मनोहर इंगळे** यांचे मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. ४/०४/२०२६

**उपरोक्त अशिलातर्फे**
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला, शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२ / १क/ २. शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १२०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अकोल्यात गुड फ्रायडे भक्तीभावाने साजरा



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरासह अकोला जिल्ह्याच्या विविध भागांमध्ये शुक्रवारी ख्रिश्चन धर्मियांचा पवित्र सण गुडफ्रायडे मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. शहरातील आठ प्रार्थनास्थळांमध्ये (चर्च) यावेळी प्रार्थनासभांचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, प्रभू येशू खिस्तांच्या पुनरुत्थानानिमित्त उद्या, रविवारी ख्रिश्चन धर्मीय ईस्टर संडे हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करणार आहेत.

प्रभू येशू ख्रिस्तांनी अखिल मानवजातीच्या पापक्षालनासाठी क्रूसखांबावर दिलेल्या बलिदानाची आठवण म्हणून जगभरात गुडफ्रायडे (उत्तम शुक्रवार) हा सण साजरा केला जातो. अकोल्यातही शुक्रवारी हा सण मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. यावेळी शहर आणि जिल्ह्यातील सुमारे ३० चर्चेसमधून प्रार्थनासभांचे सकाळी आणि दुपारी आयोजन करण्यात आले. खदान ख्रिश्चन कॉलनी येथील बेथेल सेव्हिअर्स अलायन्स चर्चमध्ये शुक्रवारी दुपारी १२ ते ३ या वेळात आयोजित प्रार्थनासभेमध्ये, प्रभू येशू ख्रिस्तांनी क्रूसखांबावर लटकविण्यात आले असता उच्चारलेल्या सात वाक्यांवर बायबलच्या अभ्यासकांनी प्रकाश टाकला. यामध्ये यांनी आपले विचार मांडले. येशू काल, आज आणि उद्या सर्व दिवस एक समान आहे.

उद्या अर्थात रविवारी प्रभू येशू खिस्तांच्या पुनरुत्थानानिमित्त जगभरात ईस्टर संडे हा सण साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी विदर्भातील एकमेव अशा ख्रिश्चन कॉलनी मधील बेथेल सेव्हिअर्स चर्चच्या प्रांगणात शनिवारी रात्रीच एक मोठे रिंगण तयार करण्यात येते. रविवारी पहाटे सहा वाजता अकोल्यातील सर्वच चर्चचे सदस्य तेथे उपस्थित होऊन प्रात:कालच्या प्रार्थनासभेत सहभागी होतात. त्यानंतर चर्चमध्ये विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## ईस्टर संडेनिमित्त विविध कार्यक्रम

आज जगाला प्रभू येशूच्या शांती, त्याग, बलिदान आणि बंधुत्वाच्या शिक्षणाची गरज आहे, येशूने सांगितले की, संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा म्हणून प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने देवाच्या राज्याची घोषणा केली पाहिजे, असे प्रतिपादन चर्चच्या असिस्टंट पास्टर सौ वैशाली डोंगरदिवे यांनी यावेळी केले. याप्रसंगी जस्टिन मेश्रामकर, एस्तेर खंडारे, कुमुद कदम, शीतल ठाकूर, राजेश ठाकूर, फिल्मोन ठाकूर, वैशाली डोंगरदिवे, वंदना गजभिये, ट्वीनकल कुल्कर्णी आदी सदस्यांनी गुडफ्रायडेवर आधारित गीते सादर केली. संचालन सचिव सरला मेश्रामकर यांनी केले.

गेल्या चाळीस दिवसांपासून ख्रिश्चन धर्मियांचा पवित्र लेन्थ महिना सुरु होता. या चाळीस दिवसांच्या काळात ख्रिश्चन बंधू-भगिनी उपवास आणि प्रार्थना करतात. घरोघरी कॉटेज प्रेअर्सचे आयोजन केले जाते. गुरुवारी मौंदी गुरुवारनिमित्त प्रार्थनासभा होते. गुडफ्रायडेच्या दिवशी या उपवासांची सांगता होते.

**जलसंपदेचा बेजबाबदार कारभार!**

# २५ एकर पीक पाण्यात; अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाने शेतकरी उध्वस्त

**हिंगणघाट/मोझरी (शेकापूर)/जनमाध्यम**

निम्न वर्धा प्रकल्पाअंतर्गत नांदगाव वितरिकेच्या भोंगळ आणि निष्काळजी कारभारामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. वितरिकेला आवश्यक खोली नसल्याने पाणी ओव्हरफ्लो होऊन थेट शेतात शिरले आणि सतीश गणपतराव ठाकरे यांच्या तब्बल २५ एकर शेतीतील उभे पीक अक्षरशः सडून गेले. लाखोंचे नुकसान सहन करत असताना प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याने शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला आहे.

मागील खरीप हंगामात झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि शेजारच्या नाल्याच्या पुरामुळे नांदगाव वितरिकेतील पाण्याचा प्रवाह अनियंत्रित झाला. वितरिकेची खोली अपुरी असल्याने पाणी ओसंडून शेतात घुसले. या पाण्याच्या प्रचंड दाबामुळे शेतातील विहीर पूर्णतः खचून जमीनदोस्त झाली. परिणामी शेतीत सतत ओलावा राहून पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सुमारे चार लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप ठाकरे यांनी केला आहे.या गंभीर घटनेबाबत सतीश ठाकरे यांनी २९ सप्टेंबर २०२५ रोजीच तलाठी, नायब तहसीलदार, मंडळ निरीक्षक तसेच जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी सादर केल्या होत्या. मात्र, सहा महिने उलटूनही संबंधित विभागाकडून कुठलीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. प्रत्यक्ष पाहणीसुद्धा न करता कागदोपत्री कामे चालू असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. अर्ज देऊनही कोणीही दखल घेत नाही, आमचे ऐकणारे कोणी नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया ठाकरे यांनी व्यक्त केली.दरम्यान, वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिलेल्या सूचनांकडेही संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे समोर आले आहे.



यामुळे प्रशासनातील ढिसाळपणा आणि जबाबदारीचा अभाव पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. वातानुकूलित कार्यालयात बसून आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष शेतातील परिस्थितीची कल्पनाच नसल्याची टीका ग्रामस्थांकडून होत आहे.

नांदगाव शिवारातील सर्वे क्रमांक ४०१, ४०७ व ४०८ मधील शेतीत दरवर्षी पाण्याचा त्रास होत असून, नाल्याची अपुरी रुंदी आणि खोली ही मुख्य समस्या असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे नाल्याचे तातडीने खोलीकरण व रुंदीकरण करण्यात यावे, अशी मागणी वारंवार करण्यात येत आहे. मात्र, संबंधित विभागाकडून केवळ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्ष कृती शून्य असल्याची खंत व्यक्त होत आहे.नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे शेती उद्ध्वस्त होत असताना आता तरी शासन जागे होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# शेतकऱ्यांनी स्वत:कडील सोयाबीन बियाण्यांचा वापर करावा

## कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

सोयाबीन या पिकाचे सर्वच वाण सरळ वाण आहेत. त्यामुळे दरवर्षी बियाणे बदलाची आवश्यकता नाही. एकदा प्रमाणित बियाणे वापरल्यानंतर त्याच्या उत्पादनातून येणारे बियाणे पुढील २ वर्षापर्यंत वापरता येतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी स्वत:कडील सोयाबीन बियाण्याचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी स्वत:कडील बियाणे वापरल्यास उत्पादन खर्च कमी होईल. मागील दोन वर्षात शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या प्रमाणित बियाण्यांपासून उत्पादित झालेले सोयाबिन चालुवर्षी बियाणे म्हणुन शेतकरी वापरु शकतात. तसेच ग्रामबिजोत्पादन, पिक प्रात्याक्षिके योजनेंतर्गत शेतकरी समुहांकडून आलेल्या उत्पन्नातून बियाण्यांची निवड करता येते. प्रमाणित बियाण्यांपासून वरील प्रमाणे उत्पादनातून चाळणी करुन चांगल्या प्रतीच्या सोयाबीनची बियाणे म्हणून निवड करावी.

बियाणे अत्यंत नाजुक असून त्याचे बाह्य आवरण पातळ असते. त्यामुळे त्याची उगवणक्षमता अबाधित राखण्यासाठी बियाणे हाताळतांना काळजी घ्यावी.बियाण्यांसाठी साठवणूक करतांना आर्द्रतेचे प्रमाण १० ते १२ टक्क्यापेक्षा जास्त नसावे. साठवणूकीसाठी प्लास्टीक पोत्याचा वापर करु नये. बियाणे साठवतांना त्याची थप्पी ७ फुटापेक्षा जास्त उंच असणार नाही तसेच बियाणे हाताळतांना जास्त प्रमाणात आदळआपट होणार नाही याची दक्षता घ्यावा. प्रति हेक्टरी बियाणे दर ७५ किलोवरुन ५० ते ५५ किलोवर आणण्यासाठी टोकन, रुंद वरंभा सरी पध्दतीने किंवा प्लॅन्टरचा वापर करुन पेरणी करावी.

सोयाबिनची उगवणक्षमता ७० टक्केपक्षा कमी असल्यास उगवण क्षमतेच्या प्रमाणात अधिकचे बियाणे पेरणीसाठी वापरण्यात यावे.

७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच सोयाबिनची पेरणी करावी. बियाण्यांची पेरणी ३ ते ४ सेंटीमीटर खोलपर्यंत करावी. पेरणीपुर्वी प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅमची प्रत्येकी २०० ते २५० ग्रॅम प्रति १० ते १५ किलो बियाण्यास पेरणीपूर्वी तीन तास अगोदर बिजप्रक्रिया करुन सावलीत वाळवावे व नंतर त्याची पेरणी करावी, असे कृषि विकास अधिकारी यांनी कळविले आहे.

# आयसीआरपीच्या प्रश्नांवर पालकमंत्र्यांची दखल

## मागण्यांवर पाठपुरावा करण्याचे आश्वासन

**वर्धा/जनमाध्यम**

महिला समुदाय संशोधन व्यक्ती (आयसीआरपी) यांच्या मानधनवाढीसह विविध प्रलंबित मागण्यांवर पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी गांभीर्याने दखल घेतली. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत त्यांनी आयसीआरपी महिलांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीस जिल्हाधिकारी वान्मथी सी., अप्पर जिल्हाधिकारी संजय तेली, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी गितांजली निकम, समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त अंकेश केदार तसेच संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष आशिष कुचेवार उपस्थित होते.बैठकीदरम्यान आयसीआरपी महिलांनी मानधन वाढ, ऑनलाईन कामासाठी मोबाईल व रिचार्ज सुविधा, मानधन थेट खात्यात जमा करण्याची व्यवस्था, ड्रेसकोड व ओळखपत्र तसेच प्रवास भत्ता देण्याच्या मागण्या मांडल्या. या सर्व मागण्यांवर शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले.यावेळी बोलताना डॉ. भोयर यांनी महिलांना बचत गटांच्या माध्यमातून स्वावलंबी होण्याचे आवाहन केले. बचत गट अधिक सक्रिय ठेवून महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले.आयसीआरपीची नियुक्ती महिला बचत गटांना सक्षम करण्यासाठी करण्यात आली असून, जिल्ह्यातील या चळवळीला अधिक बळकटी देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले. बैठकीस आयसीआरपी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# युवक काँग्रेसच्या कार्यकारिणीत विदर्भाचा ठसा

## अफजल बेरा यांची प्रदेश सचिवपदी निवड

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या विस्तारित कार्यकारिणीत वर्धा जिल्ह्याला प्रतिनिधित्व मिळाले असून, सिंदी (रेल्वे) येथील अफजल फिरोजजी बेरा यांची प्रदेश सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीमुळे विदर्भातील युवकांना संघटनात्मक पातळीवर नवे बळ मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानु चिब, महाराष्ट्र प्रभारी अजय छिकारा तसेच नवज्योत सिंह सिधू यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्या नेतृत्वाखाली निवडीची प्रक्रिया पूर्ण झाली.अफजल बेरा यांनी २०१८ मध्ये NSUI मधून आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. सुरुवातीपासूनच युवकांमध्ये सक्रिय राहून त्यांनी संघटनात्मक कामात सातत्य राखले आहे.



कोरोना काळात त्यांनी सिंदी परिसरात सॅनिटायझेशन मोहिमा राबवत नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पुढाकार घेतला. युवक काँग्रेसच्या माध्यमातून जनजागृती उपक्रम राबवत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली.त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे आणि प्रभावी जनसंपर्कामुळे त्यांनी युवकांमध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे. या नियुक्तीमुळे वर्धा जिल्ह्यासह विदर्भातील युवक काँग्रेसला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत असून कार्यकर्त्यांकडून त्यांचे स्वागत करण्यात येत आहे.

# पोलिसांची तत्पर कारवाई; बैल चोरीचा गुन्हा उघड

## ६.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यातील आंजी (मोठी) येथील बैल चोरी प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही तासांत छडा लावत आरोपीस अटक केली. या कारवाईत दोन बैलांसह बोलेरो पिकअप आणि मोबाईल असा एकूण ६ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तुळशीराम पंढरीनाथ गांजुडे (वय ४४, रा. आंजी मोठी) यांच्या शेतातील दोन पांढरे बैल २९ मार्चच्या रात्री अज्ञात व्यक्तीने चोरी करून नेले होते. याप्रकरणी खरांगणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू ठेवत मुखबिर व तांत्रिक माहितीच्या आधारे संशयिताचा माग काढला. येळाकेळी-वर्धा मार्गावरील इको पार्कजवळ नाकाबंदी करत संशयित बोलेरो पिकअप (श्प४०५२०४८) अडविण्यात आली. तपासणीदरम्यान गाडीत हिरव्या जाळीत लपवून ठेवलेले दोन बैल आढळून आले.



या प्रकरणी रोशन गुलाबराव वंजारी (वय ३६, रा. आंजी मोठी, ता. आर्वी) यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यानेच चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून दोन बैल (७० हजार रुपये), बोलेरो पिकअप (६ लाख रुपये) व अँड्रॉइड मोबाईल (१० हजार रुपये) असा एकूण ६.८० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. पुढील तपास खरांगणा पोलिस करीत आहेत.

# आरोही पटेवारची निवड

**वर्धा/जनमाध्यम**

नुकत्याच जाहीर झालेल्या नवोदय विद्यालयाच्या प्रवेशपूर्व परीक्षेत स्थानिक गांधी सिटी पब्लिक स्कूल ची विद्यार्थिनी आरोही पटेवार हिने यश संपादन केले. त्यामुळे तिची जवाहर नवोदय विद्यालय सेलू काटे येथे प्रवेशासाठी निवड झाली आहे.वैशाली मेंढेवार यांच्या मार्गदर्शनात तिनी यश संपादन केले.आरोही ने आपल्या यशाचे श्रेय शिक्षिका वैशाली मेंढेवार वडील सामजिक कार्यकर्ते व मंच संचालक किरण पटेवार आई दिपाली पटेवार यांना दिले आहे.आरोहीच्या या यशाबद्दल कुटुंबीयासह शिक्षक व मित्र परिवारात आनंदाचे वातावरण असून तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



# वुशू चॅम्पियनशिप स्पर्धेत राहुल यादवचे यश

**देवळी(वर्धा)/जनमाध्यम**

मारिया कला व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी राहुल अनिल यादव याने वुशू चॅम्पियनशिप २०२५-२६ मध्ये द्वितीय क्रमांक पटकावत महाविद्यालयाचा मान उंचावला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने १ एप्रिल २०२६ रोजी आयोजित या स्पर्धेत त्याने उल्लेखनीय कामगिरी केली.

बी.ए. प्रथम वर्षात शिक्षण घेणाऱ्या राहुलने क्रीडा क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध करत प्रतिस्पर्ध्यांना जोरदार टक्कर दिली. त्याच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत भर पडली आहे.आपल्या यशाचे श्रेय राहुलने संस्थेचे संस्थापक हाजी अब्दुल हमीद, सचिव अब्दुल रहेमान, व्यवस्थापकीय संचालक प्रकाश वनकर यांच्यासह कार्यकारी प्राचार्या विशाखा लोहकरे, प्राचार्य संजय सूरसे, व्यवस्थापक रिजवान तंवर, मुख्याध्यापक अनुप झाडे, कनिष्ठ लिपिक आदेश तोडसे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिले आहे. राहुलच्या या यशाबद्दल महाविद्यालयात समाधान व्यक्त होत असून, त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यातही तो क्रीडा क्षेत्रात अधिक यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



# लहानग्यांची किमया; राज्यस्तरावर वर्धेचा झेंडा फडकला

## पालकमंत्री भोयर यांच्याकडून चिमुरड्यांचा गौरव

**वर्धा/जनमाध्यम**

छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय जिमनास्टिक स्पर्धेत वर्ध्यातील चिमुकल्या खेळाडूंनी अप्रतिम कामगिरी करत पदकांची लयलूट केली. या यशस्वी खेळाडूंचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

एक्सेल इंडिया जिमनास्टिक स्पोर्ट्स अकॅडमी'च्या विद्यार्थ्यांनी राज्यभरातून आलेल्या स्पर्धकांशी जोरदार मुकाबला करत आपली छाप पाडली. २२ मार्च रोजी झालेल्या या स्पर्धेत प्रत्येक जिल्ह्यातील खेळाडू सहभागी झाले होते. अशा कडव्या स्पर्धेत वर्ध्याच्या खेळाडूंनी दाखवलेले कौशल्य खरोखरच कौतुकास्पद ठरले.६ ते ८ वयोगटात मितांश रामटेके याने सुवर्णपदक पटकावत अव्वल स्थान मिळवले, तर साऱ्या बुरांडे हिने रजत पदक जिंकले. मिस्टी गजबिये आणि अवंती भोसकर यांनीही उल्लेखनीय कामगिरी नोंदवली. अंडर-१० गटात आरोग्य बाळसराफ आणि अधिरा ढोणे, अंडर-१२ मध्ये मीत डोडानी तसेच अंडर-१४ गटात दिव्य सोलंकी व गाथा मून यांनी कांस्यपदक मिळवून वर्ध्याच्या क्रीडा परंपरेला उजाळा दिला.या यशामागे प्रशिक्षक प्रणय वैद्य यांची मेहनत ठळकपणे दिसून येते. अकॅडमीचे अध्यक्ष प्रितेश रामटेके व संजय दुग्धबले यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. तसेच प्राचार्य डॉ. सोनाली शिरपूरकर व जिल्हा जिमनास्टिक असोसिएश नचे सचिव राजेश बनमारे यांनी खेळाडूंचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.वर्धेच्या या चिमुरड्यांनी केवळ पदकेच जिंकली नाहीत, जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर जिल्ह्याचे नाव राज्यभर उज्ज्वल केले आहे.



जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १२७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

**कोर्ट विद्यमान श्री. योगेश शिंदे, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे न्यायालय**

**- प्रेस विज्ञप्ती -**

आपणास याव्दारे सुचीत करण्यांत येते की, **अर्जदार दिपक विठ्ठल धारुकर, रा. उमरी ता. हिंगणघाट जि. वर्धा.** यांनी कलम १३(३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचा भाऊ हिचा जन्म हिंगणघाट येथील असून नामे **मोहन विठ्ठल धारुकर यांची जन्म तारीख २६/०५/१९९६ ची नोंद नगरपरिषद कार्यालय हिंगणघाट** यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकेमध्ये घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज / प्रकरण सादर केलेला आहे.

वर नमुद जन्म नोंदणीबाबत हितसंबधीत व्यक्तीचे आक्षेप/ हरकती असल्यास ते त्यांनी स्वतः किवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वेळेत जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे ८ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणारे किंवा पुरावे नसणारे आक्षेप / हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी,

**ठिकाण :-**
**दिनांक :- ०४/०३/२०२६**

**(योगेश शिदे)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**हिंगणघाट**

शिक्का

# गळफास घेऊन वृद्धाचा मृत्यू

**कारंजा(घाडगे)** - तालुक्यातील नारा येथे घडलेल्या घटनेत एका वृद्धाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने परिसरात शोककळा पसरली. भुराजी बकाराम गोरे (वय ७५, रा. नारा) असे मृताचे नाव आहे.मिळालेल्या माहितीनुसार, भुराजी गोरे यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेत टोकाचे पाऊल उचलले. ही बाब उघड होताच नातेवाईक व ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली.

**नावात बदल**

माझे पूर्वी **HATAGALE VISHNU GOVINDRAO** असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील **VISHNU GOVINDA HATAGALE ns** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**-:पत्ता:-**
साई मंदिर जवळ, अशोक नगर वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी **SHEIKH NILOFAR AJIJ** असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील **NILOFAR AJIT SHEIKH** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**-:पत्ता:-**
वॉर्ड नं १, खरांगणा ता आर्वी वर्धा ४४२१०६

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर N7937409 वरील माझे **HUSSAIN ALI ALI** असे नाव होते. माझ्या आधार व मतदान कार्ड वरील **HUSSAIN ABBAS ALI** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**-:पत्ता:-**
महादेवपुरा, वर्धा ४४२००१

# पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा

**हिंगणघाट/जनमाध्यम**

येथील नी.मु. घटवाई विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वडनेर येथे इको क्लब, राष्ट्रीय हरित सेना व कौशल्य बोध उपक्रमांतर्गत पर्यावरण जन जागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य राजेश सातपुते होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून निसर्ग सेवा समिती, वर्धाचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांमध्ये मुख्याध्यापक रवींद्र गोडे, उपमुख्याध्यापक मंगेश चवडे, उपप्राचार्या स्मिता बोंडे व पर्यवेक्षिका मनीषा चव्हाण उपस्थित होत्या.कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविकात रवींद्र गोडे यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. विद्यार्थिनी देवकर हिने सादर केलेल्या पर्यावरणगीताने वातावरण भारावून गेले.मुरलीधर बेलखोडे यांनी आपल्या मार्गदर्शनात वृक्षलागवड, पर्यावरण संवर्धन आणि निसर्गपूरक जीवनशैली यांचे महत्त्व अधोरेखित केले. पर्यावरणाचे संवर्धन ही पुढील पिढ्यांसाठीची अमूल्य देणगी आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना सक्रिय सहभागाचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात राजेश सातपुते यांनी शालेय स्तरावरील पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती दिली.यावेळी पर्यावरण विषयावर चित्रकला प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी साकारलेल्या चित्रांतून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज तळवेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन रवींद्र मुकावार यांनी मानले.

# आगीत दोन घरे खाक, वृद्ध महिलेचा मृत्यू चिखलदऱ्यात आकी गावातील घटना



**धारणी/प्रतिनिधीः-** चिखलदरा तालुक्यातील आकी गावात बुधवारी (दि.१) रात्री अचानक लागलेल्या भीषण आगीत दोन घरे पूर्णतः जळून खाक झाली. या दुर्घटनेत एका वृद्ध महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. मनकाय गनसा बेलसरे (वय ८५) असे मृतक महिलेचे नाव आहे. घटनेच्यावेळी वृद्ध महिला घरात एकटीच होती. या महिलेला दृष्टी नव्हती. तिचा नातू घरात दिवा लावून गावात मित्रांसोबत बसला होता. दरम्यान बेलसरे यांच्या घराला अचानक आग लागली.

आगीने क्षणार्धात रौद्ररूप धारण करत शेजारील दुसऱ्या घरालाही वेढा दिला. घटनेनंतर गावकऱ्यांनी तत्परता दाखवत घराघरातून पाणी आणून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. सरपंचांनी स्वतःचा टँकर आणून मदत केली. गावकऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे काही वेळात आग आटोक्यात आणण्यात यश आले. दरम्यान, अचलपूर येथून अग्निशामक दलाची गाडीही घटनास्थळी दाखल झाली व त्यांनी आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले. या आगीत मोठे आर्थिक नुकसान झाले तसेच वृद्ध महिलेचा देखील मृत्यू झाला.

तुळशीराम गनसा बेलसरे व अजय बाबू धांडेकर यांचे घर जळून खाक झाले. ग्रामसेवकांनी घटनेची नोंद घेतली आहे. घरकुल योजनेतून नवीन घर मंजूर करावे, अशी मागणी दोन्ही कुटुंबांनी केली आहे.

# पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकीतील विद्यार्थ्यांची 'कंपास ग्रुप' मध्ये निवड

**अमरावती/प्रतिनिधीः-** पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. नुकत्याच पार पडलेल्या कॅम्पस प्लेसमेंट प्रक्रियेत गुरुग्राम, हरियाणा येथील नामांकित 'कंपास ग्रुप' कंपनीत महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या यशामुळे महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील अंशुल पोटे आणि निसील वाकोडे या विद्यार्थ्यांची या कंपनीत निवड झाली असून, त्यांना लाखोंच्या आकर्षक पॅकेजची ऑफर मिळाली आहे. ही यशस्वी कामगिरी त्यांच्या मेहनतीचे तसेच महाविद्यालयाच्या दर्जेदार प्रशिक्षण पद्धतीचे फलित मानले जात आहे. विद्यार्थ्यांनी कंपनीच्या विविध मुलाखत फेऱ्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम निवडीत स्थान मिळवले.





कंपास इंडिया ही 'कंपास ग्रुप पीएलसी' या जगातील अग्रगण्य फूड आणि फॅसिलिटी मॅनेजमेंट सेवा पुरवणाऱ्या कंपनीचा एक भाग असून, ही कंपनी सुमारे ३० देशांमध्ये कार्यरत आहे. भारतात कंपास इंडिया व्यवसाय, शिक्षण, आरोग्य व औद्योगिक क्षेत्रात विविध सेवा पुरवते.

आपल्या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्लेसमेंट टीम आणि कुटुंबीयांना दिले आहे. त्यांनी सांगितले की, महाविद्यालयात मिळालेल्या तांत्रिक ज्ञानासोबतच व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षणामुळेच ही यशस्वी कामगिरी शक्य झाली. विशेषतः सादरीकरण कौशल्य, संवाद कौशल्य आणि आत्मविश्वास यांचा मुलाखतीदरम्यान मोठा फायदा झाला.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मो. झुहेर, कॉर्पोरेट रिलेशन डीन प्रा. मोनिका जैन, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रतीक भट्टड तसेच इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. संजय बी. वरकड आणि प्लेसमेंट कोऑर्डिनेटर प्रा. सचिन जळीत यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पोलीस आयुक्तालयात सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा सन्मान

## -कौटुंबिक वातावरणात निरोप समारंभ

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील नियत वयोमानानुसार ३१ मार्च २०२६ रोजी सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी व अंमलदारांचा निरोप समारंभ बुधवारी (दि. १ एप्रिल) पोलीस आयुक्तालयाच्या मीटिंग हॉलमध्ये उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. या प्रसंगी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या दीर्घ सेवेला सलाम करत त्यांचा सन्मान करण्यात आला.

या समारंभात जीपीएसआय संजय महादेवराव गुरमाळे (विशेष शाखा), गजानन शामराव कवडे (नांदगाव पेठ), संजय उत्तमराव कोहळे (पोलीस मुख्यालय), संजय अमृतराव तंतरपाळे (विशेष शाखा), सुरेश नारायणराव पुसाम (कोतवाली पोलीस ठाणे) तसेच एएसआय बलराम झिंगुजी भास्कर (वलगाव), प्रदीप रघुसा जयसिंगपुरे (नक्षल सेल) आणि सुरेंद्र शेषराव तिनखेडे (पोलीस मुख्यालय) यांचा गौरव करण्यात आला. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या हस्ते सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदारांना पोलीस महासंचालकांचे शुभेच्छापत्र, स्मृतिचिन्ह, शाल-श्रीफळ, पेन्शन ऑर्डर व सेवानिवृत्ती प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांच्या पत्नींनाही साडी व कुंडीतील रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम कौटुंबिक वातावरणात पार पडला. यावेळी पोलीस आयुक्तांनी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या अनुभवाचा लाभ भविष्यातही पोलीस विभागाला मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच निवृत्तीनंतर मिळणाऱ्या आर्थिक लाभांची गुंतवणूक करताना सावधगिरी बाळगून विश्वासार्ह पर्याय निवडण्याचा सल्लाही त्यांनी दिला. शासकीय सुविधांबाबत कोणतीही अडचण भासल्यास संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमाला पोलीस उपायुक्त शाम घुगे, गणेश शिंदे, रमेश धुमाळ, पोलीस निरीक्षक निलेश करे, प्रशासकीय अधिकारी सविता ठेवले, कार्यालय अधीक्षक आरती आठवले यांच्यासह सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय तसेच इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डिग्रीसोबत किमान कौशल्य विकासाची जोड मिळवा -आ.सुलभा खोडके

## क्लिनिकल रिसर्च असोसिएट प्रशिक्षण कार्यक्रमाचे आ.संजय खोडके यांच्या हस्ते उदघाटन

## रेडियंट सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल येथे मोफत कौशल्य प्रशिक्षण

**अमरावती/प्रतिनिधी :-** किमान कौशल्य विकास कार्यक्रमा अंतर्गत रेडियंट सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, अमरावती येथे मोफत कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे औपचारिक उद्घाटन आ. संजय खोडके यांच्या हस्ते शुक्रवार दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावतीच्या आ.सुलभा खोडके तसेच प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावतीच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर , कौशल्य विकास अधिकारी अभिषेक ठाकरे, रेडियंट सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. आनंद काकाणी, डॉ. पवन अग्रवाल, डॉ. माधुरी अग्रवाल, डॉ. सिकंदर अडवाणी, डॉ. सीमा अडवाणी, डॉ. अनुराधा काकाणी, प्रशासकीय अधिकारी सारंग लकडे, आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.





किमान कौशल्य विकास कार्यक्रमाचे उद्घाटक आमदार संजय खोडके यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, 'बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात तांत्रिक क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची मोठी गरज आहे. ग्रामीण भागातील युवकांना अशा आधुनिक प्रशिक्षणातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.' अध्यक्षीय भाषणात आ. सुलभा खोडके यांनी युवकांना सांगितले की नुसती डिग्री घेऊन होणार नाही तर त्यासोबत कौशल्य असणे खूप गरजेचे आहे. त्यामुळेच तुम्हाला रोजगार मिळण्यास सहाय्य होणार आहे. तसेच या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले, जेणेकरून ते स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनतील. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन राहुल कुकळकर यांनी केले, तसेच आभार प्रदर्शन डॉ. पवन अग्रवाल यांनी केले.

केंद्रात सध्या बाजारपेठेत मोठी मागणी असलेले लाइफ सायन्स या सेक्टरमधील क्लिनिकल रिसर्च असोसिएट हा प्रमुख अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. अमरावतीचे जिल्हाधिकारी, आशिष येरेकर, (भा.प्र.से). यांच्या विशेष मार्गदर्शना अंतर्गत सुरू झालेल्या या प्रशिक्षणासाठी कोणतेही शुल्क किंवा अनामत रक्कम घेतली जाणार नाही. सदर प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरीच्या संधी आणि स्वरोजगारासाठी मार्गदर्शन दिले जाईल.

उद्घाटन कार्यक्रमकरिता कौशल्य विकास अधिकारी अभिषेक ठाकरे, रेडियंट सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. आनंद काकाणी, डॉ. पवन अग्रवाल, डॉ. माधुरी अग्रवाल, डॉ. सिकंदर अडवाणी, डॉ. सीमा अडवाणी, डॉ. अनुराधा काकाणी, प्रशासकीय अधिकारी सारंग लकडे, प्रशिक्षक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामधील आणि रेडियंट सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी प्रशिक्षक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या हनुमान जयंतीतून 'राष्ट्रीय एकतेचा' संदेश

## -विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग : भक्ती आणि शक्तीचा संगम साधत जपली परंपरा

**पाहिजे**

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
--पत्ता--
सी-१२, सातुर्णा, एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड, अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/८००७३४२३३५

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे हनुमान जयंती उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. विशेष म्हणजे, मंडळात शिक्षण घेणाऱ्या विविध राज्यांतील हजारो विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत राष्ट्रीय एकतेचा अनोखा संदेश दिला.

मंडळाच्या प्रवेशद्वाराजवळील हनुमान मंदिरात सकाळी विधिवत होमहवन व पूजन करण्यात आले. मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांनी जपलेला भक्ती आणि शक्तीचा वारसा पुढे नेत, सचिव डॉ. माधुरीं चेंडके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कोषाध्यक्ष तसेच डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.



श्री रामभक्त हनुमान हे मंडळाचे आराध्य दैवत असल्याने पूजनानंतर सर्व क्रीडा विभागांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. शूटिंग, जिम्नॅस्टिक, व्यायामशाळा, कुस्ती, ज्युडो आदी विविध क्रीडा विभागांमध्ये क्रीडा साहित्याचे पूजन करण्यात आले. यामध्ये प्रशिक्षक, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विविध राज्यांमधून आलेल्या विद्यार्थ्यांनी एकत्र येत साजरी केलेली ही हनुमान जयंती केवळ धार्मिक उत्सव न राहता राष्ट्रीय एकात्मतेचा जिवंत अनुभव ठरली. भाषा, संस्कृती आणि परंपरा वेगवेगळ्या असल्या तरी 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या भावनेचा प्रत्यय या सोहळ्यातून आला. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाने जपलेली भक्ती आणि शक्तीची परंपरा, शिस्तबद्ध आयोजन आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश यामुळे हा उत्सव समाजासाठी आदर्श ठरला आहे.

# डॉ.राजु डागे यांना राष्ट्रीय आदिवासी धनगर साहित्य संमेलनात राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

स्थानिक अमरावती आमचे सहकारी राज्यस्तरीय धनगर समाज उप- वधुवर परीचय मेळाव्यात,अमरावती चे सक्रिय पदाधिकारी तथा मंगलयोग परीचय पुस्तिका प्रकाशन प्रमुख देवा संघटनेचे माजी उपाध्यक्ष व सचिव डॉ.एड.राजुभाऊ डांगे खरोखरच हरहुन्नरी, सर्वगुणसंपन्न व्यक्तीमत्व असुन ते सतत योग प्रशीक्षण,वेगवेगळ्या विषयावर व्याख्यान तसेच कुठल्याही सामाजीक कार्यकमात सतत व्यस्त असतात. त्यांना शिक्षणाचा जबरदस्त ध्यास असल्यामुळें त्यांनी नोकरी करुन इतक्या व्यस्ततेत सुद्धा आतापर्यंत १४ पदव्या प्राप्त केल्या. त्यामध्ये ४ डॉक्टरेट,७ स्नातकोत्तर, व ३ स्नातक पदव्यांचा समावेश आहे.त्यामध्ये पिएचडी,एलएलएम सारख्या पदव्यांचा समावेश आहे.याच बरोबर ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे तत्वज्ञानात ग्रामगिताचार्य हि पदवी सुद्धा त्यांनी प्राप्त केली आहे.ते स्वत:आंतरराष्ट्रीय योग ट्रेनर तसेच जेसीआयचे रास्ट्रीय प्रशिक्षक असल्यामुळे त्यांनी आतापर्यंत हजारो ट्रेनिंग, प्रशिक्षण कार्यक्रम घेऊन हजारो विद्यार्थी तसेच प्रक्षिक्षणार्थी यांना प्रशीक्षीत केले आहे. आता सुद्धा आठवड्यांतुन ३ दिवस रोज सकाळी online योग शिबीर घेत असुन त्यामध्ये भारत तसेच भारता बाहेरील योग साधक सहभागी होऊन त्यांच्या शिबीराचा लाभ घेत असतात. त्यांचे सदर सामाजिक योगदान,योग शिबीरे,विविध विषयावरील व्याख्याने, त्यांनी लिहिलेले संशोधन पत्र, जनहिता करता केलेले कार्य,जेसीआय चे अध्यक्ष म्हणुन केलेले उल्लेखनिय कार्यामुळेच त्यांना आतापर्यंत राज्यस्तरीय,राष्ट्रीय स्तरावरील, आंतरराष्ट्रीय पातळीवरील तसेच ईतरही क्षेत्रातिल विवीध पुरस्कार मिळाले आहेत. ते आमच्या राज्यस्तरीय धनगर समाज ऊप- वधुवर परिचय मेळाव्याचे सुद्धा प्रमुख आधारस्तंभ असुन सतत १५ वर्षापासुन मंगलयोग परीचय पुस्तिकेच्या प्रकाशनाची जबाबदारी ते लिलया पार पाडतात.तसेच दरवर्षी अमरावती येथे होणा-या राज्यस्तरीय धनगर समाज उप- वधुवर परीचय मेळाव्याच्या कार्यकमाचे ते स्वत: सुत्रसंचालन सुद्धा करीत असून सदर कार्यक्रम भारदस्त व अतिशय सुत्रबद्ध होत असल्यामुळें महाराष्ट्रातुन सर्वच स्तरावरुन सदर कार्यक्रमाची स्तुति होत असते. असे आमचे राजाभाऊ डांगे सर्वच क्षेत्रात सर्वगुणसंपन्न असुन त्यांचे बाबत जेवढे लिहावे तेवढे कमीच पडते.त्यांना राष्ट्रीय आदिवासी धनगर साहीत्य सम्मेलनामध्ये राज्यस्तरीय पुरस्कार जाहिर झाल्याबद्धल त्यांचे राज्यस्तरीय धनगर समाज उपवधुवर परिचय मेळावा आयोजन समीती अमरावती तसेच धनगर एंप्लॉईज वेलफेयर असोशिएशन (देवा संघटना) अमरावती तर्फे खुप खूप अभिनंदन.



**- ज्ञानेश्वर ढोमणे,**
अध्यक्ष, देवा संघटना तथा संयोजक, राज्यस्तरीय धनगर समाज उप- वधुवर परीचय मेळावा,अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र. २५७/२०२६ ने.ता. ०५.०५.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती संध्या गुरुदेव भुयार, वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.तुषार गुरुदेव भुयार, वय ३४ वर्षे, धंदा - शेती
दोन्ही रा.चिखलसावंगी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. राजश्री अजयराव धोटे, वय ३६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.हैदतपूर, ता.चांदूरबाजार जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ यांचे पती तर अर्जदार नं.२ व ३ याचे वडील नामे **गुरुदेव नारायणराव भुयार** हे दि.**२९.०२.२००८** रोजी **चिखलसावंगी,** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०२.०४.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र. २५५/२०२६ ने.ता. ०४.०५.२०२६

**अर्जदार -**
१. रावसाहेब अंबादासराव ढोंगे, वय ५९ वर्षे, धंदा - शेती
रा.रोहणखेड, पो.विचोरी, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. कु.साक्षी रावसाहेब ढोंगे, वय २६ वर्षे, धंदा - शिक्षण
रा.परशुराम नगर, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. कु.रिया रावसाहेब ढोंगे, वय २४ वर्षे, धंदा - शिक्षण
रा.रोहणखेड, पो.विचोरी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ यांची प त्नी तर अर्जदार नं.२ व ३ यांची आई नामे **शारदा रावसाहेब ढोंगे** हे दि.**१८.११.२०२४** रोजी ऐम्स हॉस्पीटल, खापरी नागपूर, ता.जि.नागपूर येथे मयत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २७.०४.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर सुचना

या जाहीर नोटीस द्वारे सर्व लोकांना सुचित वजा कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली **नंदकिशोर बाळासाहेब झाडे,** रा.गगलानी नगर, वडाळी नाका, अमरावती, ता.जि.अमरावती यांच्या मालकीची व ताब्यातील मालमत्ता खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे. सदर मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मालमत्तेचे वर्णन** - मौजे-कोळवन, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं. व भूमापन क्र.१००, एकुण क्षेत्रफळ १.२६ हे.आर. आकार रु.२.७२ रु.पैसे ही शेतजमीन विकत घेण्याचा सौदा झालेला आहे.

तरी आम जनतेस सुचित करण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मालमत्तेसंबंधी खरेदी-विक्रीचा सौदा झाला असून सदर शेतजमिनी संबंधी इतर कोणासही कोणताही आक्षेप, हरकत असल्यास किंवा हितसंबंध, बोझा, कर्ज, ईतर अधिकार असल्यास त्यांनी ०८ दिवसांचे आत सदर नोटीसमधील पत्त्यावर रितसर लेखी स्वरुपात कळवावे. त्यानंतर सदर मालमत्तेसंबंधी कोणासही कोणत्याही प्रकारचा उजर राहणार नाही व सदर मालमत्तेची खरेदी खत नोंदवून घेण्यास मोकळे राहतील. कृपया सर्वानी दक्षता व नोंद घ्यावी.

करीता याची नोंद घ्यावी.

**दिनांक ०२.०४.२०२६**
**अमरावती**

(ॲड.कार्तिक आर.गजभिये)
पत्ता- आशियाना पोलीस क्लबजवळ, वडाळी रोड, अमरावती, ता.जि.अमरावती
मो.९५९५६६१११३

## जाहीर सुचना

या जाहीर नोटीस द्वारे सर्व लोकांना सुचित वजा कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली **प्रमिला बाळासाहेब झाडे,** रा.आंबेडकर गेट, राहुल नगर, बिच्छु टेकडी, अमरावती, ता.जि.अमरावती यांच्या मालकीची व ताब्यातील मालमत्ता खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे. सदर मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मालमत्तेचे वर्णन** - मौजे-कोळवन, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं. व भूमापन क्र.१३२, एकुण क्षेत्रफळ २.७३ हे.आर. अधिक पोट खराब ० हे.२० आर, असे एकुण २.९३ हे.आर, आकार रु.३.५० रु.पैसे ही शेतजमीनी पैकी माझ्या मालकीची व ताब्यातील १ हे.१८ आर व पोट खराब ० हे.१० आर अशी एकुण १ हे.२८ आर, आकार रु.१.५१ पैसे ही शेतजमीन विकत घेण्याचा सौदा झालेला आहे.

तरी आम जनतेस सुचित करण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मालमत्तेसंबंधी खरेदी-विक्रीचा सौदा झाला असून सदर शेतजमिनी संबंधी इतर कोणासही कोणताही आक्षेप, हरकत असल्यास किंवा हितसंबंध, बोझा, कर्ज, ईतर अधिकार असल्यास त्यांनी ०८ दिवसांचे आत सदर नोटीसमधील पत्त्यावर रितसर लेखी स्वरुपात कळवावे. त्यानंतर सदर मालमत्तेसंबंधी कोणासही कोणत्याही प्रकारचा उजर राहणार नाही व सदर मालमत्तेची खरेदी खत नोंदवून घेण्यास मोकळे राहतील. कृपया सर्वानी दक्षता व नोंद घ्यावी.

करीता याची नोंद घ्यावी.

**दिनांक ०२.०४.२०२६**
**अमरावती**

(ॲड.कार्तिक आर.गजभिये)
पत्ता- आशियाना पोलीस क्लबजवळ, वडाळी रोड, अमरावती, ता.जि.अमरावती
मो.९५९५६६१११३

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २०६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# हत्येचा कट रचल्याप्रकरणी माजी मंत्री बच्चू कडू यांच्यावर गुन्हा दाखल

## -पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांची पत्रकार परिषदेत माहिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार बच्चू कडू यांच्या सह त्यांच्या दोन सहकाऱ्यांविरुद्ध चांदूरबाजार पोलीस ठाण्यात गंभीर गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. विद्यमान आमदार प्रवीण तायडे यांचे चुलत बंधू अभिजीत तायडे यांना अपघाताचा बनाव करून जिवानिशी ठार मारण्याचा कट रचल्याचा खळबळजनक आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी आज शुक्रवार ३ एप्रिलच्या सकाळी आयोजित पत्रकार परिषदेत या प्रकरणाची अधिकृत माहिती दिली.





तक्रारीनुसार, डिसेंबर महिन्यात बच्चू कडू यांच्या 'कुरळपूर्णा' येथील निवासस्थानी एक बैठक पार पडली होती. या बैठकीत बच्चू कडू, शुभम उर्फ गोलू माहोरे आणि एका अनोळखी इसमाने मिळून अभिजीत तायडे यांना अपघातात ठार मारण्याबाबत चर्चा केली होती. या संभाषणाचे रेकॉर्डिंग एका गोपनीय साक्षीदाराने आपल्या मोबाईल मध्ये केले होते, जे आता पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले आहे.चांदूरबाजार पोलिसांनी याप्रकरणी फौजदारी स्वरूपाचा कट रचल्याप्रकरणी माजी आमदार बच्चू कडू (वय ५६, रा.कुरळपूर्णा) गोलू माहोरे (वय ५०रा. आसेगांव) व (पान २ वर)

### ■ ऑडिओ क्लिपचा दिला पुरावा-

तक्रारदार अभिजीत तायडे यांनी संभाषणाची रेकॉर्डिंग असलेला पेन ड्राईव्ह पोलिसांना दिला आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्पष्ट केले की प्रथमदर्शनी रेकॉर्डिंग मधील तथ्य लक्षात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संभाषणाची सत्यता पडताळण्यासाठी ते न्याय वैद्यकीय प्रयोग शाळेकडे पाठवण्यात येणार आहे. ज्या मोबाईलमध्ये हे रेकॉर्डिंग झाले, तो ओरिजनल डिव्हाइस जप्त करून फॉरेन्सिक तपासासाठी पाठवला जाईल. आमदार बंधू प्रवीण तायडे आणि त्यांच्या निकटवर्तीयांच्या जीविताला धोका आहे, त्यामुळे संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी,' अशी मागणी अभिजीत तायडे यांनी आपल्या तक्रारीतून केली आहे.

# बालकांसोबत अनैसर्गिक कृत्य करणाऱ्या आरोपीची कारागृहात रवानगी

**तिवसा/प्रतिनिधीः-** अल्पवयीन बालकासोबत वारंवार अनैसर्गिक कृत्य करणाऱ्या आरोपीची आज न्यायालयाने कारागृहात रवानगी केली.तिवसा पोलीस स्टेशन हद्दीत हे प्रकरण उघडकीस आले होते.न्यायालयाने ३ एप्रिल पर्यंत आरोपीस पोलीस कोठडी सुनावली होती.त्यानंतर आज पुन्हा आरोपीस न्यायालयात हजर केले असता त्याची कारागृहात रवानगी करण्यात आली.

संजय काजळकर (वय ५३) असे त्या आरोपीचे नाव आहे.त्याने परिसरातील २ बालकांवर अनैसर्गिक कृत्य केल्याची बाब उघडकीस येताच तिवसा पोलिसांनी याप्रकरणी पोस्को ॲक्ट अंतर्गत विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल करून त्यास अटक केली होती.आरोपी संजय काजळकर याने १० वर्षीय बालक हा चक्कीवर जात असताना व खेळण्यासाठी जात असताना दोनदा अडवून त्यास एका रूमवर नेऊन अनैसर्गिक कृत्य केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस येताच पीडितांच्या फिर्यादी वडिलांनी याप्रकरणी तिवसा पोलिसात तक्रार दाखल केली होती.२० ते २७ मार्च दरम्यान पीडितासोबत घडलेल्या या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तिवसा पोलिसांनी तातडीने आरोपीस अटक केली.त्यानंतर या प्रकरणाचा आणखी तपास करण्यासाठी पोलिसांनी १ एप्रिल रोजी आरोपीस न्यायालयात हजर करून पोलीस कोठडीची मागणी केली होती.तेव्हा ३ एप्रिल पर्यंत न्यायालयाने आरोपीला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले होते. आज पुन्हा आरोपीला पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपी संजय काजळकर याची कारागृहात रवानगी केली.

## 'शासनाचे उद्दिष्टे पूर्ण, पण आमच्यावर अन्याय का?

# अप्पर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्यावर स्टोन क्रशर धारकांचा लाचखोरीचा आरोप

## एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली तक्रार

**अकोला/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील स्टोन क्रशर व्यावसायिकांकडून बेकायदेशीररित्या पैशांची उकळपट्टी केल्याचा गंभीर आरोप अप्पर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्यावर करण्यात आला असून या प्रकरणामुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे. अकोला जिल्हा खाण व क्रशर उद्योजक संघटनेचे कार्यकारी अध्यक्ष विवेक बिजवे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करत संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हा नोंदवून कठोर कारवाईची मागणी केली आहे.




तक्रारीनुसार, जिल्हाधिकारी कार्यालयातील पदाचा गैरवापर करत संबंधित अधिकाऱ्यांनी संघटनेतील सदस्यांकडून प्रत्येकी १५ हजार रुपयांची बेकायदेशीर मागणी केल्याचा आरोप आहे. 'शासनाची उद्दिष्टे पूर्ण होत आहेत, पण आमच्यावर अन्याय का?' असा सवाल उपस्थित करत व्यवसायिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. तक्रारदार विवेक बिजवे यांनी नमूद केले की, १९ मार्च रोजी गुढीपाडव्याच्या दिवशी त्यांना मोबाईलवरून कॉल करून शासकीय निवासस्थानी बोलावण्यात आले. यावेळी 'तुमच्या संघटनेतील सदस्यांकडून किती रक्कम गोळा करून देता?' असा थेट सवाल करण्यात आला. यावर बिजवे यांनी सर्व (पान २ वर)

### आरोप बिनबुडाचे - गायकवाड

स्टोन क्रशर धारकांनी केलेले सर्व आरोप हे बिनबुडाचे आहेत. मी कोणत्याही प्रकाराचे अतिरिक्त पैसे मागितले नाही. शासनाचे उद्दिष्टपूर्ती करिता मी सर्वच स्टोन क्रशर धारकांची बैठक घेतली त्याचे प्रोसिडिंग सुद्धा आहेत. उद्दिष्ट पूर्तीसाठी त्यांच्याकडून रीतसर रॉयल्टी भरून घेतली आहे, अशी माहिती गायकवाड यांनी दिली.

# पंचायत समिती अमरावतीत 'नियमबाह्य कारभार'

## -आमरण उपोषणाचा इशारा

**अमरावती/प्रतिनिधीः-** पंचायत समिती अमरावतीतील शिक्षण विभागात सुरू असलेल्या कथित नियमबाह्य कारभारामुळे वातावरण चांगलेच तापले असून शासन मान्यता प्राप्त महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, मुंबई ३२ जिल्हा शाखा अमरावती यांनी प्रशासना विरोधात तीव्र भूमिका घेतली आहे. संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित यांनी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अमरावती, शिक्षणाधिकारी अमरावती, मुख्य कार्यकारी अधिकारी अमरावती यांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट आरोप केला आहे की शासनाच्या नियमांना सरळ धाब्यावर बसवून काही शिक्षकांना केंद्रप्रमुख पदाचा प्रभार देण्यात आला आहे. हा प्रकार केवळ नियमभंग नसून शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकतेवर थेट आघात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



'पात्रता, ज्येष्ठता व शासन नियमांचा पूर्णपणे अवमान करून काही जणांना लाभ देण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा प्रकार तात्काळ थांबवून संबंधितांचे प्रभार काढून घेण्यात यावेत, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल,' असा इशारा संघटनेने दिला आहे. दरम्यान, प्रशासनाने त्वरित कारवाई न केल्यास दिनांक ८ एप्रिल २०२६ पासून पंचायत समिती कार्यालयासमोर अमरावती आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा थेट इशारा महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित यांनी दिला आहे.

# चांदूर बाजारात १६ लाखांचा गुटका साठा जप्त

## -पोलिसांची मोठी कारवाई



**चांदूर बाजार/प्रतिनिधीः-** चांदूर बाजार पोलिसांनी गुरुवारी रात्री २ वाजता गस्तीदरम्यान मोठी कारवाई करत मध्य प्रदेशातून अमरावतीकडे अवैधरित्या जाणा-या गुटख्याचा मोठा साठा पकडला आहे. जप्त केलेला गुटका आणि वाहनाची एकूण किंमत सुमारे १६ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस पथक गस्तीवर असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की मध्य प्रदेशातून पिकअप वाहनामार्फत मोठ्या प्रमाणात गुटका अमरावतीकडे आणला जात आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी नेताजी चौक परिसरात सापळा रचला. ठरलेल्या ठिकाणी पिकअप वाहन (पान २ वर)

# तळागाळातून नेतृत्व निवडीवर काँग्रेसचा भर

## -संघटन सृजन अभियानांतर्गत ग्रामीण बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद

### -निरीक्षक अफताब अहमद आणि आ.भाई जगताप यांचे मार्गदर्शन

**अमरावती/प्रतिनिधीः-** काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी 'संघटन सृजन अभियान' अंतर्गत जिल्ह्यात विविध ठिकाणी बैठका आयोजित करण्यात येत असून, ग्रामीण भागात झालेल्या बैठकीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनीही कार्यकर्त्यांना संघटन बळकट करण्याचे आवाहन केले.




या अभियानाअंतर्गत जिल्हाध्यक्ष व शहराध्यक्ष निवडीची प्रक्रिया पारदर्शक व लोकशाही पद्धतीने राबविण्यात येत असून, पारंपारिक शिफारशींपेक्षा तळागाळातील कार्यकर्त्यांच्या मतांना प्राधान्य दिले जात आहे. निरीक्षक अफताब अहमद आणि आ. भाई जगताप यांनी यावेळी स्पष्ट केले की, इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवून १४ ते १७ एप्रिलदरम्यान विधानसभानिहाय बैठका घेऊन कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला जाणार आहे.

बैठकीत कार्यकर्त्यांना संघटन सशक्त करण्याबाबत मार्गदर्शन करताना, पक्षाची धोरणे आणि आगामी नियोजन याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. 'तळागाळातून नेतृत्व' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यावर भर देण्यात आला.

या प्रसंगी अफताब अहमद, आ. भाई जगताप, खासदार बळवंतराव वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, प्रा. वीरेंद्र जगताप, राजकुमार पटेल, संजय खाडे, (पान २ वर)

# सालेपुरात विहिरीत आढळला महिलेचा मृतदेह

**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा - बैतूल मार्गावरील सालेपुर गावातील आकाश पाटील यांच्या शेत विहिरीत एका महिलेचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली. नीलिमा उर्फ राधा शेषराव परोकार (वय ४८) असे, मृतक महिलेचे नाव आहे. ही घटना गावात आगी सारखी पसरली. गावातील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी दाखल झाले. मृतक महिलेचे भाऊ मोहन दशरथ काकड हे घटनास्थळी पोहोचले. त्यांनी बहिणीची ओळख पटविली. माहिती नुसार मृतक नीलिमा उर्फ राधा परोपकार मानसिक रुग्ण होती. गेल्या काही वेळापासून ती आजारी राहत होती. बुधवारी रात्री १२ वाजता ती कोणाला न सांगता घरून निघाली होती, पण गुरुवारी सकाळी गावातील काही नागरिकांनी (पान २ वर)




# प्रशासकीय गतिमानता, कार्यक्षमता वृद्धी व ज्ञानसंवर्धनासाठी 'महा-साधना सप्ताह

## - विभागीय आयुक्त नयना गुंडे

### -विभागातील सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण पूर्ण करण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्र शासनाचा क्षमता विकास आयोग आणि 'कर्मयोगी भारत' यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२ ते ८ एप्रिल, २०२६ या कालावधीत देशभरात 'साधना सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने राज्यभर 'महा-साधना सप्ताह' उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे ठरवले आहे. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या अंगभूत कर्मक्षमतेचा विकास व्हावा आणि त्यांच्या निरंतर ज्ञानसंवर्धनातून प्रशासकीय कार्यात गुणात्मक वाढ व्हावी, हा या सप्ताहाचा मुख्य हेतू आहे. यानुषंगाने विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी 'महा-साधना सप्ताहात' सक्रियरित्या सहभाग नोंदवून 'iGOT कर्मयोगी' पोर्टलवर उपलब्ध असलेले विविध अभ्यासक्रम पूर्ण करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले. या सप्ताहाअंतर्गत अमरावती विभागातील (पान २ वर)



# तपोवनमध्ये ६०० रहिवाशांच्या जेवणावर संकट

## -खा.वानखडे यांनी प्रत्यक्ष भेट देत परिस्थितीचा घेतला आढावा

### -जिल्हा प्रशासनाच्या हलगर्जीपणावर तीव्र नाराजी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील तपोवन परिसरातील विदर्भ महारोगी सेवा मंडळ येथे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची दखल घेत खासदार बळवंत वानखडे यांनी प्रत्यक्ष भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. गॅस सिलेंडरच्या तीव्र टंचाईमुळे मागील जवळपास महिनाभर सुमारे ६०० रहिवाशांच्या अन्नव्यवस्थेवर संकट निर्माण झाले होते. खासदार वानखडे यांच्या हस्तक्षेपानंतर तत्काळ गॅस सिलेंडर उपलब्ध करून देण्यात आले.



कुष्ठरोगी बांधवांच्या सेवेसाठी कार्यरत असलेल्या या संस्थेत गॅस अभावी चहा व जेवण बनविणे कठीण झाले होते. परिणामी, रहिवासी आणि कार्यकर्त्यांना जुन्या लाकडी चुलींचा (पान २ वर)

# जुळ्या शहरात इंडेन गॅसच्या तक्रारी वाढल्या ऑनलाइन बुकिंग होत नसल्याने नागरिक त्रस्त

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर - परतवाडा या जुळ्या शहरातील इंडेन गॅस एजन्सीच्या कारभाराविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरत असून एजन्सीच्या व्यवस्थापनातील ढिसाळपणा आणि मनमानीमुळे सर्वसामान्य ग्राहकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वेळेवर गॅस सिलेंडर न मिळणे, ग्राहकांच्या कॉलला प्रतिसाद न देणे आणि कर्मचाऱ्यांकडून योग्य माहिती न दिली जात असल्याने या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत.




ऑनलाइन बुकिंग होत नसल्याने नागरिकांनी नेमके काय करावे? हा प्रश्न सुद्धा निर्माण झाला आहे. जुळ्या शहरातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार,इंडेन गॅस ची बुकिंग तांत्रिक अडचणीमुळे होत नाही आणि बुकिंग केल्यानंतरही तब्बल ३० ते ३५ दिवसांपर्यंत प्रतीक्षा करावी लागत आहे.तरीही सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. जुळ्या शहरातील इंडेन गॅस एजन्सीच्या तक्रारी वाढल्या आहेत. शासनाच्या नियमानुसार (पान २ वर)

# तडीपार गुन्हेगाराकडून सार्वजनिक ठिकाणी चाकूची दहशत

## -फ्रेजरपुरा पोलिसांची तात्काळ कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग दरम्यान पोलिसांनी एका तडीपार गुन्हेगाराला ताब्यात घेऊन मोठी कारवाई केली आहे. ही कारवाई संजय गांधी नगर परिसरात करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस पेट्रोलिंग करत असताना पोलीस स्टेशन भातकुली हद्दीतील तडीपार इसम महेंद्र उर्फ तुफान भगवान चेंडकापुरे (वय ३२, रा. भातकुली, अमरावती) हा सार्वजनिक ठिकाणी हातात चाकू घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.



आरोपी हा परिसरात भीतीचे वातावरण निर्माण करत असल्याने पोलिसांनी तत्काळ हालचाल करत त्याला जागीच ताब्यात घेतले. झडतीदरम्यान आरोपीकडून (पान २ वर)

# छळाला कंटाळून अल्पवयीन मुलीची आत्महत्या

## -चांदूर बाजार परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूर बाजार पोलीस ठाणे हद्दीत एक अत्यंत दु:खद आणि संतापजनक घटना घडली असून, सततच्या छेडछाडीमुळे त्रस्त झालेल्या एका अल्पवयीन मुलीने विषारी औषध प्राशन करून आपले जीवन संपवले आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ आणि संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गावातीलच एका तरुणाकडून सदर युवतीचा दीर्घकाळापासून सतत पाठलाग व छेडछाड केली जात होती. शाळेत जाताना-येताना आरोपी तिचा पाठलाग करत असे. तसेच शाळा सुटल्यानंतर तो तिच्या घराजवळ थांबून मानसिक (पान २ वर)

# घरात घुसून चाकू हल्ला; सासरे-दिर गंभीर जखमी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील संजय गांधी नगर परिसरात किरकोळ कारणावरून शेजाऱ्यांनी घरात घुसून चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना १ एप्रिल रोजी समोर आली आहे. या घटनेत सासरे व दिर गंभीर जखमी झाले असून, फ्रेजरपुरा पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी उमा संघपाल बोरकर (वय ३८, रा. संजय गांधी नगर क्र. २) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्या सासरे हिरामन बोरकर, सासु शांता बोरकर, पती संघपाल बोरकर, दिर धम्मपाल बोरकर, वनिता बोरकर व मुलांबाळासह एकत्र राहतात. त्यांच्या शेजारी आनंद आडोळे हे त्याच्या कुटुंबीयांसह राहतात. ३१ मार्च रोजी रात्री सुमारे ९ वाजताच्या सुमारास घरासमोर कटला (हातगाडी) लावल्याच्या कारणावरून शेजारी आनंद आडोळे, त्यांची पत्नी, मुलगा सुमीत उर्फ चुहा आडोळे व त्याचे काही मित्र यांनी अचानक त्यांच्या घरात घुसून वाद घालत हल्ला चढविला. वाद वाढताच सुमीत उर्फ चुहा याने चाकू काढून फिर्यादींचे सासरे हिरामन बोरकर यांच्या पोटावर वार केला. त्यांना वाचविण्यासाठी पुढे आलेल्या धम्मपाल बोरकर (दिर) यांच्यावरही आनंद आडोळे यांनी चाकूने पोट व पाठीवर वार केले. याशिवाय इतरांनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. या हल्ल्यात धम्मपाल (पान २ वर)